# भारत–भ्रमण

: लेखक :

श्री. रामकृष्ण गोपाळ भिडे,

सहसंपादक, केसरी.

प्रस्तावनाकार

प्रसिद्ध इतिहाससंशोधक

दत्तो वामन पोतदार, पुणें.

REFBK-0006604
REFBK-0006604

मूल्य दीड रुपया.

मुद्रक व प्रकाशकः—श्री. दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए., (टिळक)
चित्रशाळा छापखाना, १०२६ सदाशिव पेठ, पुणें २.

एकमेव विक्रेतेः—द. के. गोंधळेकर, ३३० अ,
सदाशिव पेठ, पुणें २.

# अनुक्रमणिका

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| प्रवेश ... ... ... | |
| प्रारंभीं ... ... ... | |
| धर्मक्षेत्र—कुरुक्षेत्र ... ... ... | १ |
| हिंदु साम्राज्याचें शक्तिपीठ ... ... ... | ११ |
| जुनी दिल्ली व नवी दिल्ली ... ... ... | २२ |
| श्रीक्षेत्र काशी येथलि महाराष्ट्रीय समाज ... | ३४ |
| आसाम ... ... ... | ४५ |
| आमचे अज्ञात देशबांधव ... ... ... | ५८ |
| दक्षिण कानडांतील चित्तपावन बंधु ... ... | ७० |
| दक्षिण भारताचें ओझरतें दर्शन ... ... | ७३ |
| कराचींतील मराठी वसाहत ... ... | ८८ |

REFBK-0006604

REFBK-0006604

॥ श्री ॥

## चि. श्यामराव (देवदत्त) व चि. सुधाराणी यांसः—

" मी बाहेर गांवीं जाऊं लागलों म्हणजे तुमची सारखी भुण भुण कीं, 'तुम्हीं नेहमीं गांवाला जातां, आम्हांला मात्र कुठेंच नेत नाहीं.' तुम्ही जाणते झाल्यावर देशपर्यटन करावें, तुमची चौकसबुद्धि वाढावी, यासाठीं हीं वर्णनें एकत्र करून "भारत—भ्रमण' तुमच्या हातीं देत आहे. तुम्ही म्हणणारच कीं, काकांनीं दुधाऐवजीं ताक दिलें, पण या भ्रमणांत तुम्हांला पुष्कळ गमती आढळतील. त्यांत इतिहास आहे, स्थलमाहात्म्य आहे व आपला हा हिंदुस्थान केवढा अफाट व केवढा संपन्न आहे हेंहि तुम्हांला समजेल. त्यांतिल कांहीं पुण्यधामांचें शब्ददर्शन मी तुम्हांस घडवीत आहे व तें तुम्हांस आवडेल अशी माझी अपेक्षा आहे. "

तुमचा,

काका.

# प्रारंभीं:—

" भारत–भ्रमण " हें रूढ अर्थानें केवळ प्रवासवर्णन नाहीं. यांत वर्णित स्थलांचे रेल्वे भाड्याचे दर सांपडणार नाहींत वा मैलांचें अंतरहि सांपडणार नाहीं. कारण त्या गोष्टी कोणासहि अल्प प्रयासानें रेल्वेच्या वेळापत्रकांत मिळूं शकतात.

यांत त्या त्या स्थळांची थोडी फार आजची माहिती आहे; पण मुख्य भर आहे तेथिल ऐतिहासिक माहितीवर. तेथील इतिहासकालीन अवशेष पाहावे व गतकालीन वैभवांत मन रमवावें, इकडेच मनाची मुख्य ओढ. अर्थात् पुढील शब्द–चित्रांत त्याच गोष्टी चित्रित व्हाव्या हें क्रमप्राप्त. त्याचबरोबर आपली संस्कृति व आपलें गतवैभव कोणत्या परमोच्च बिंदूला पोहोंचलें होतें यासंबंधीं संकलित केलेल्या माहितीचा लाभ मजसारख्याच इतर जिज्ञासूंनाहि द्यावा ही इच्छा; त्यांतच दुसरीहि एक गोष्ट सहज साधून गेली, ती म्हणजे भारताचें अखंडत्व नि अभंगत्व. अनादि कालापासून कसें सिद्ध आहे, हेंहि सांगतां आलें; पण हें सांगतांना एक गोष्ट मात्र ध्यानीं घेतली पाहिजे ती ही कीं, ज्या वेळीं हे लेख लिहिले गेले त्या वेळीं भारतविच्छेदनाची भाषाहि नव्हती. अशा वेळीं ते लिहिले गेले असल्यानें यांत लेखकाची प्रचारकी भूमिका नाहीं, हें ध्यानीं यावें; कारण भारताचें अखंडत्व स्वतःसिद्धच आहे.

' भारत–भ्रमणां' त कराची ते आसाम व कुरुक्षेत्र ते कन्याकुमारी अशा चारहि दिशांच्या महत्त्वपूर्ण स्थलांची माहिती दिली आहे व ती देतांना ऐतिहासिक सत्याचा जाणून अपलाप केला नाहीं.

हे लेख मूळ केसरी, चित्रमयजगत्, सह्याद्रि इत्यादि नियतकालिकांत प्रसिद्ध झाले. त्यांतील कराची, काशी, द. कानडा यासंबंधींचे लेख

केवळ महाराष्ट्रीय दृष्टीनें लिहिले आहेत, हें वाचकांच्या ध्यानीं येईल व तीं गोष्ट हेतुतः केली आहे हेंहि चटकन् लक्षांत येईल.

हा प्रयत्न वाचकांस रुचला तर भ्रमणाचा दुसरा भाग परमेश्वर-कृपेनें वाचकांच्या हातीं देण्याची उमेद आहे.

हल्लींच्या दिवसांत पुस्तक प्रसिद्ध करणें हें एक दिव्य आहे. परंतु सुहृदांच्या साहाय्यानें अशक्यप्राय दिसणारी गोष्ट शक्य झाली याबद्दल श्री. नानासाहेब गोंधळेकर व चित्रशाळा छापखान्याचे व्यवस्थापक श्री. दामुआण्णा जोशी यांना धन्यवाद देणें अत्यावश्य आहे.

प्रा. दत्तो वामन पोतदार यांना प्रस्तावनेबद्दल विनंति करतांच त्यांनीं नेहमींच्या आपुलकीच्या भावनेनें ती लिहून देऊन मला उपकारबद्ध करून ठेवलें आहे.

पुणें. दिनांक ५-११-४४

रा. गो भिडे.

**याच लेखकाचीं इतर पुस्तकें:—**

निकोलाय लेनिन; स्वातंत्र्य–दीप; सुभाषचंद्र बोस; पं. जवाहरलाल; श्रीनारायणमहाराज; पं. मालवीयजी; इंग्रजांनीं हिंदुस्थान कसा घेतला ? हिंदुमहासभेचा इतिहास; इत्यादि.

# प्रवेश

'केसरी' संस्थेंतील एक अनुभवी संपादक, लेखक आणि हिंदु-समाजसेवक या नात्यानें रा. रा. गो. भिडे आज अनेक वर्षें महाराष्ट्रास परिचित आहेतच. त्यांचाच हा नवा छोटा 'भारत-भ्रमण' नांवाचा ग्रंथ आज प्रसिद्ध होत आहे. या ग्रंथांतील लेख कांहीं नवे नाहींत. ते रा. भिडे यांनीं पूर्वींच लिहून स्फुटरूपानें प्रसिद्ध केले होते. त्यांतील 'मुंढाजें' या दाक्षिण कानडांतील चित्तपावनी ग्रामाचा वृत्तांत तर लोकांस केवळ अभिनव वाटला होता. दूर प्रांतीं असलेल्या आम्हां महाराष्ट्रीयांच्या ह्या वसाहतीचें वृत्त वाचून सर्वांस फार कौतुक वाटलें आणि रा. भिडे यांस अनेकांनीं मनांतून धन्यवाद दिले.

असे लेख वर्तमानपत्रांत किंवा मासिकांत छापून आले तरी त्यांस टिकाऊ स्वरूप प्राप्त होत नाहीं, म्हणून ग्रंथरूपानें ते प्रसिद्ध करणें अगत्याचें असतें. तसें घडून आलें म्हणून रा. भिडे यांचे आभार मानले पाहिजेत.

आपण नकाशांत आपल्या भारतवर्षांतले अनेक देश पाहातों. शाळें-तील पाठांतून त्यांविषयीं कांहीं माहितीहि आपण पढतों. पण पाठिक माहिती आणि प्रत्यक्ष दर्शन यांत केवढें महदंतर असतें याची खरी कल्पना प्रवास करून तीं तीं स्थळें डोळ्यांनीं पहावीं तेव्हांच, आणि तेव्हांच येतें! एरव्हीं नाहीं! गंगा-यमुनांचीं विस्तीर्ण पात्रें प्रथम ज्या वेळीं आम्ही डोळ्यांनीं अवलोकिलीं त्या वेळीं मनावर त्यांच्या विशालत्वाचा झालेला परिणाम दगडावर कोरल्याप्रमाणें कायमचा खोदला गेला! चंबळ नदीचे मातीचे प्रचंड भेगाळ तट जेव्हां प्रथम दिसले तेव्हां मराठ्यांच्या लष्करी इतिहासांत मराठ्यांनीं ती जागा थांबण्या-थबकण्याला कां पसंत केली हें जसें मनांत उतरलें तसें तो देखावा दिसला

नसता तर कधींच यथार्थपणें गळीं उतरलें नसतें ! प्रत्यक्ष दर्शनाचें माहात्म्य असें केवळ अपूर्व आहे !

रा. भिडे यांनीं प्रस्तुत पुस्तकांत दिल्ली, कुरुक्षेत्र, गुआहाटी (गोहत्ती), आणि वाराणसी या पूर्वोत्तर भारतांतील पांचचार ठळक ठळक ठिकाणांची प्रथम माहिती दिली आहे आणि दक्षिण भारतांतील रामेश्वर, तंजावर, मदुरा, श्रीरंगम्, त्रिवेंद्रम् आणि कन्याकुमारी अशा कांहीं वेंचक स्थळांचा परिचय करून देऊन पश्चिम भारतांतील कराचीच्या वर्णनानें आपल्या भारतभ्रमणाचा पहिला टप्पा पुरा केला आहे. काशी ते कराची आणि कामाख्या ते कुमारी अशा रेषा जर नकाशावर आपण काढल्या तर भारतमातेच्या देहावर सुंदर स्वस्तिकाप्रमाणें त्या शोभतील ! मग 'भारत–भ्रमण' हें या लहानशा पुस्तकाचें नांव यथार्थ ठरणार नाहीं काय ?

आमचा भारतवर्ष एक अति प्राचीन, सुसंपन्न, विपत्तिसंपत्तीचे अनेक उन्हाळे–पावसाळे पाहिलेला 'जुनाट पुरुष' च म्हटला तरी चालेल ! त्याच्या जीवनाच्या, सुखदुःखाच्या शेंकडों खुणा आणि हजारों कथा सर्वत्र दिसतात आणि ऐकूं येतात ! त्यांतील कांहीं कांहीं तरी प्रत्येक भारतीयानें अवलोकिल्या पाहिजेत आणि त्यांचा यथार्थ परिचय करून घेतला पाहिजे.

एक काळ असा होता कीं त्या वेळीं या देशांत अनेक "माहात्म्य" ग्रंथ रचले गेले आणि स्थळोस्थळींच्या देव, देवता आणि तीर्थस्नानें यांजविषयींच्या अशा कथा प्रचलित केल्या गेल्या कीं, त्यायोगें भोळ्याभाबड्या आणि भाविक श्रोत्यांचीं चित्तें चमत्कारानें भरून जावीं ! मानवी वस्तुस्थितीचा मात्र संपूर्ण लोप या माहात्म्यप्रक्रियेनें घडून आला ! पण आजचें युग मानवी प्रक्रियांच्या पुनरुत्थानाचें आहे. या काळांत सर्व दैवी आवरणांचीं कवचें आणि माहात्म्यकथांच्या खोळी सत्यसंशोधनाच्या

तीव्र तापानें तडकून खालीं निखळून पडत आहेत ! सत्यसंशोधनाचा बुरखा घेऊन अहंकार आणि अभिनिवेश यांनींहि अधूनमधून गडबड चालविलेली आपल्या दृष्टीस पडते. अशा स्थितींत निर्मळ आणि चखोट सत्याचा संग्रह आणि संरक्षण करणें हें एक मोठें जोखमीचें, कष्टाचें आणि कठीण काम होऊन बसलें आहे. माहात्म्यांचीं जुनीं आवरणें फाडून काढून त्या जागीं नव्या अभिनिवेशांचीं आधुनिक आवरणें आणि आभरणें चढविण्याच्या या उद्योगांत सत्याच्या उपासकांना मोठ्या सावधपणें आणि धैर्यानेंच आपलें कार्य करावें लागेल हें उघड आहे.

रा. भिडे यांचें भ्रमण नैमित्तिक झालें. सांप्रतकाळीं हिंदुत्वाभिमानी असा जो पक्ष आपणांस म्हणवितो त्या पक्षांत रा. भिडे हे मोड-तात. ती विशिष्ट दृष्टि त्यांच्या या लिखाणांत दिसून आली तर त्यांत विपरीत असें कांहीं नाहीं. आपल्या 'भारत–भ्रमणां' त वर्णि-लेल्या तीर्थक्षेत्रांची माहिती देतांना 'माहात्म्य'–ग्रथित कथा व आख्यायिका रा. भिडे यांनीं सारांशानें दिल्या आहेत. ऐतिहासिक पद्धतीची माहिती देतांनाहि अभिनिवेशाला रा. भिडे यांनीं जागजागीं वाव दिला आहे. हा अभिनिवेश मात्र एका बाजूनेंच प्रकट होत असतो असें नाहीं. हिंदु, मुसलमान आणि त्या दोघांच्या मागाहून या भूमीचे स्वामी बनलेले इंग्रज या प्रत्येक गटाच्या अभिनिवेशानें आणि अज्ञानानें सत्याचें स्वरूप मलिन आणि विकृत करण्याचा प्रयत्न झालेला आहे. मुसलमानांचा अभिनिवेश कडवा, इंग्रजांचा अभिनिवेश चलाख आणि हिंदूंचा दुबळा अशी या अभिनिवेशांची विशिष्टता सांगतां येण्यासारखी आहे. या तिरंगी अभिनिवेशांचीं लिंपणें दूर करावीं तेव्हांच शुद्ध सत्याचें निर्मळ दर्शन होईल. व्यवहारांत सत्य कोणत्या तरी अभिनिवेशाचा पोषाख धारण करूनच वावरणार यांत शंका नाहीं. हा पोषाखहि जितका साधा, मूळच्या सत्याच्या अंगापिंडाला नि ठेवणीला जुळेल असा त्याच्या मोजमापाचाच असेल तेवढा तो आदरणीय होईल. मुसलमानी

व इंग्रजी अभिनिवेशाचें लिहिणें विपुल झालेलें आहे. हिंदु अभिनिवेशाचें नुकतेंच जोरावूं लागलें आहे. हा हिंदु अभिनिवेश रा. भिडे यांच्या या पुस्तकांतहि जागजागीं उतरलेला आहे.

याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं, जेथें जेथें रा. भिडे हे हिंदूंच्या महत्त्वाचें दिग्दर्शन करतांना दिसतात तेथें तेथें नुसता अभिनिवेशच आहे. शास्त्रें आणि कला यांच्या प्रांतांत हिंदूंनीं एके काळीं केलेली कामगिरी इतकी अपूर्व झालेली आहे कीं, त्याचा अभिमान मान उंच करून त्यांनीं निरंतर वाहावा. मुसलमानांनाहि अभिमान वाहण्याजोग्या गोष्टी आपण केल्याचें दाखवूंन देतां येईल आणि तसेंच इंग्रजांनाहि. कोणत्या गोष्टीचें निर्मळ श्रेय कोणास किती हें चौकशीनेंच ठरवावें लागतें. मुसलमान-पूर्वकालांतील भारतीय शिल्प घेतलें तर त्यांतहि भव्यता, कुशलता नि ऐश्वर्य भरलेलें आपणांस आढळून येईल. परंतु यवन ( ग्रीक ) किंवा असुर ( असीरियन ) किंवा चीन या देशांशीं जो प्राचीन काळीं आमचा संबंध आला त्याचाहि परिणाम एकमेकांवर होऊन देवाणघेवाण कांहीं झालेंच नसेल असें उपलब्ध पुराव्यावरून कधींच म्हणतां येणार नाहीं. प. वा. सर ऑरेल् स्टाईन् प्रभृति संशोधकांनीं जमविलेलीं प्राचीन साधनें किंवा मोहनजोडारो वगैरे स्थळीं नवीं हातीं लागलेलीं साधनें प्रत्यहीं आपल्या ज्ञानांत नवी भर घालून विचारांत बदल घडवून आणणें आप-णांस भाग पाडीत आहेत. जिज्ञासूंनीं स्वतःची खात्री होण्याजोगा पुरावा पाहण्याची आणि तपासण्याची नेहमीं तयारी ठेवावी म्हणजे झालें.

आजच्या दिल्लीच्या परिसरांत जुन्या अनेक नगरांच्या सीमा सांपड-तात. कोणी त्यांत दडलेल्या सात नगरींचीं नांवें सांगतात तर कोणी बारांचीं सांगतात! ज्यास इंद्रप्रस्थ म्हणतात, तेथें पांडवांचे अवशेष अद्यापि तरी सांपडले नाहींत. परंतु इंदरपत नांवाचें खेडें ज्या जागेवर नांदत आहे, तेंच पूर्वीचें इंद्रप्रस्थ असलें पाहिजे. त्या दृष्टीनें उत्खनन आणि शोध

अद्यापीहि सख्त असे झालेले नाहींत. निगमबोध घाट—जेथें नुक्ताच यज्ञ झाला—तेथें तर समजतात तशी पांडवांची शिल्पी निशाणी एकहि दिसत नाहीं. याच घाटावर ' नीली छत्री ' म्हणून जें छोटें देऊळ मराठ्यांचें म्हणून सांगतात तें नीट पाहिलें असतां त्या देवळावर मुसलमानी चित्रें काढलेल्या भाजक्या रंगीत विटा बसाविलेल्या दिसतात त्या पाहिल्या म्हणजे ही सर्व समजूत निराधारच वाटूं लागते. गांवांतील गौरीशंकराचें देऊळ आप्पा गंगाधरशास्त्री यानें बांधलें म्हणतात. हिंदुरावाचा वाडा—आजचें हिंदुराव हॉस्पिटल—हा मूळचा फ्रेझरचा बंगला. पुढें तो हिंदुरावानें विकत घेतला. असो. नुसत्या दिल्लीची माहिती सांगणारे पांच सहा तरी जुने इंग्रजी ग्रंथ आहेत. पण सर्वांत चांगलें पुस्तक सर सय्यद अहमद यांचेंच आहे. हिंदूंचे अभिमानी यांनीं अवश्य पहाण्याजोगी, पण कधींहि सहसा पाहण्यांत न येणारी जागा म्हणजे ' सूर्यकुंड '. हें तुघ्लकाबादेपलीकडे आहे. शेजारींच अनेकपूर आहे, तें कदाचित् अनंगपूर असल्यास—हें सुरजकुंड अनंगपालानें बांधलें म्हणतात—ह्यास दुजोरा येईल. दिल्लीस हिंदुरावाड्याच्या रस्त्यावर एक अशोक स्तंभ आहे. अशा हिंदु निशाण्या आहेत, पण थोड्या आहेत. शोध करून होईल तर अधिक सांपडतील.

कुतुबमिनार हा हिंदूंच्या जागा मोडून मिळालेल्या मसाल्यानें मुसलमानांनीं बांधला असेंच आमचें मत झालें आहे. जवळील विष्णुस्तंभ हें एक भारतीयांच्या लोहशिल्पाचें अद्भुत उदाहरण आहे ! कुतुबच्या परिसरांत जी एक जुनी वापी आहे ती राय पिठोराच्या वेळची असावी.

कुरुक्षेत्रासहि अपेक्षेप्रमाणें प्राचीन निशाण्या आढळल्या नाहींत. काशीस आतां राजघाटावर कितीतरी नव्या मूर्ति वगैरे सांपडल्या आहेत ! अहिछत्रपूर, पैठण वगैरे स्थळांचें उत्खनन चालू आहे; आणखी शेंकडों स्थळीं हीं कामें होतील तेव्हां प्राचीन हिंदू—

जैन–बुद्ध वगैरेंनीं केलेलीं अनेक सुंदर कामें–देवळें, मूर्ति–आपणांस आढळतील ! बुंदेलखंडांत खजूराहोप्रमाणेंच जागोजाग मोडके तलाव व शिल्पकामें आहेत. हा सारा भव्य इतिहास कितीहि लुप्त झाला असला तरी नष्ट होऊं देतां कामा नये. आमच्या गौरवाचीं स्मारक-चिन्हें आम्हांस केव्हांहि आदरणीय वाटलीं पाहिजेत. अद्यापि देशी संस्थानांचें इकडे फारच कमी लक्ष आहे; आणि विद्वानांचेंहि यथातथाच आहे. पण पूर्वीची उदासीनता हळू हळू नष्ट होणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. रा. भिडे यांच्या पुस्तकासारखीं पुस्तकें देशी भाषांतून जेव्हां शेंकडों प्रसिद्ध होतील तेव्हां सामान्य वाचकांची जिज्ञासा अधिक जागी होईल आणि सांचलेलें ज्ञान याप्रमाणें खपूं लागलें म्हणजे नवीन ज्ञानाची निपज होण्यासहि वाव मिळत जाईल.

'मोंगलांनीं मराठ्यांचें आधिराज्य मान्य केलें' (पृ. २८) आणि केव्हां, तर थोरल्या बाळाजीपंत नानांनीं सनदा आणल्या तेव्हां, असें रा. भिडे लिहितात. पण त्याच वेळीं इ. इं. कंपनीलाहि सनदा मिळाल्या होत्या ! निव्वळ अभिनिवेश म्हणतों आम्ही तो हा असाच !

दक्षिण भारत हें हिंदु–द्राविड–शिल्पाचें केवळ आगरच आहे. काय तीं विस्तीर्ण देवळें, ते त्यांतले सहस्रस्तंभी मंडप, कल्याणमंडप, ते सप्तस्वरांचे दगडी खांब, तीं प्रचंड गगनभेदी गोपुरें, त्यांवरील तीं पुराणकथांचीं रंगीत मूर्तिचित्रें, तीं अच्छोद सरोवरें, ते कलाकुसरीचे रथ, ते ब्रह्मोत्सव नि रथयात्रा, सारेंच विलक्षण ! ! रा. भिडे यांनीं त्रिवेंद्रमचा पद्मनाभ पाहिला, पण पुढें वाटेंत पद्मनाभपुर आणि कुमारीला वरण्यास निघालेला शुचींद्र यांचीं देवळें आणि नगरें नाहीं पाहिलीं. पण आपण पहाणार तरी काय काय ? पहाणाराच दमून जाईल ! ! एवढे मूर्तिभंजक मुसलमान ! परंतु त्यांचेहि हात शिणले आणि आज हळेबिड नि बेलूर येथील स्वर्गीय शिल्प आणि द्वारसमुद्र नि विष्णुसमुद्र यांसारखे

सागराकार जलाशय अजून आमच्या वैभवाची साक्ष देत उभेच आहेत! ती बारा कोसांवरून दिसणारा, पहाडावर शांतपणें उभा असलेला दहा बारा पुरुष उंचीचा अखंड पाषाणाचा जैनांचा गोमतेश्वर! अजून उभाच आहे!! जणूं कांहीं सांगत आहे कीं, आम्ही असेच अचल उभे राहणार!!

जों जों आठवण करावी तों तों तीं तीं आम्ही पाहिलेलीं ठिकाणें मनासमोर उभीं राहतात. आणि अशीं रा. भिडे यांच्या पुस्तकासारखीं खरोखरीच शंभर पुस्तकें लिहिलीं तरी आपल्या शिल्पाची, कलेची नि वैभवाची वरवरची कल्पनाहि देण्यास तीं पुरी पडणार नाहींत अशी खात्री होते!

रा. भिडे कांहीं मुद्दाम सप्रमाण इतिहास किंवा रेखीव स्थल-वर्णन देण्यासाठीं पुढें आलेले नाहींत. त्यांचा हेतू स्थूल परिचय करून देण्याचा व जिज्ञासा जागृत करून ती अल्पांशानें तृप्त करण्याचा आहे. तो त्यांनीं तडीस नेला आहे. अशा वेळीं लहानसहान चुका न राहिल्या तर नवल!

पृ. २६ वर 'महीपति' यांचा उल्लेख आहे. पण संशय वाटतो कीं हें नांव 'महीधर' असावें.

रेसीना हें नांव बरोबर कीं रायझीना? गोहत्ती हें नांव बरोबर नाहीं—गुआहट्टी हें पाहिजे.

आसाम—खरें नांव असम—आणि तेथील प्रख्यात नद—नदी नव्हे—तो ब्रह्मपुत्र, ब्रह्मपुत्रा नव्हे.

आमच्याच देशांतलीं नांवें आम्हीं खरीं असतील तींच घेण्याची प्रथा सुरूं केली पाहिजे. इंग्रजांच्या सहवासांतली ही भ्रष्टता भरीला नको. आमचे प्रांतिक भेद पूर्वीचेच आहेत तेवढे पुरेत!!

रा. भिडे यांनीं वर्णिलेलीं बहुतेक स्थळें आम्ही पाहिलेलीं आहेत आणि त्यांच्या दर्शनाचें वैभव आणि स्मरणाचें सुख आम्ही अनुभविलें आहे आणि अनुभवीत आहोंत ! असा हा आमचा भव्य, प्राचीन, पवित्र, सुंदर भारत दिनप्रतिदिनीं अधिक प्रिय, आदरणीय आणि लोभनीय वाटो, हीच इच्छा !

कार्तिक शु॥ ८,
शके १८६६, पुणें

—दत्तो वामन पोतदार

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
क्र. ६६०४


# भारत भ्रमण

## १ धर्मक्षेत्र–कुरुक्षेत्र

अखिल हिंदु जातीला कुरुक्षेत्र हें धर्मक्षेत्र म्हणून आदरणीय व सुपरिचित आहे व 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' या शब्दद्वयाने प्रारंभ झालेला जगमान्य गीताग्रंथ विद्यमान असेंपर्यंत कुरुक्षेत्राचें विस्मरण हिंदुमात्राला होणें अशक्य आहे.

कुरुक्षेत्र हें अनेक दृष्टींनीं प्रसिद्ध आहे. भगवन्तांनीं अर्जुनाला याच क्षेत्रावर गीतोपदेश करून त्याला कर्तव्यप्रवृत्त केलें व त्याच्या द्वारें अखिल मानवजातीला कर्मयोग शिकविला. या गोष्टीनें या स्थानाला आलेलें महत्त्व इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां जास्त आहे.

या महत्त्वाच्या गोष्टीखेरीज पुराणेतिहासांतहि या स्थानाला कांहीं विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे म्हणून यंदाच्या गीताजयंत्युत्सवानिमित्त त्या पुण्य-क्षेत्राचें प्राचीन व अर्वाचीन संकीर्तन करण्याचें योजिलें आहे.

भारतवर्षाची राजधानी दिल्ली, इच्या उत्तरेस सुमारें ७०।७५ मैलांवर हें कुरुक्षेत्राचें विस्तृत मैदान आहे. कुरुक्षेत्र हें स. १८५४ पर्यंत जिल्ह्याचें मुख्य ठिकाण होतें, परंतु त्यानंतर कर्नाळ हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण

करण्यांत आल्याकारणानें हें ठिकाण एका तहशिलीचें—दुय्यम प्रतीचें ठाणें झालें. प्रसिद्ध पानिपत हें गांव जवळच असून या गांवाभोंवतीं एक सामान्य प्रतीचा कोट आहे व त्याला बारा वेशी आहेत परंतु इतर इतिहासप्रसिद्ध ठिकाणाप्रमाणें या ठिकाणाचीहि दुर्दशा उडू लागली आहे.

या क्षेत्राचा सर्वच इतिहास अत्यंत रोमांचकारी असून हिंदुस्थानांत जीं क्रान्तिकारक युद्धें झालीं, तीं सर्व या भूमीवरच लढलीं गेलीं आहेत ही गोष्ट इतिहासज्ञांस ज्ञात आहे. या क्षेत्राप्रमाणेंच दिल्ली अगर इंद्रप्रस्थ या राजधानीलाहि महत्त्व आहे. या क्षेत्रावर जीं जीं युद्धें झालीं तीं तीं सर्व इंद्रप्रस्थाच्या राजमुकुटासाठींच झालीं. असा या उभयक्षेत्रांचा अन्योन्यसंबंध आहे. इंद्रप्रस्थ—दिल्ली—ही राजधानी रुधिरप्रिया मानण्यांत येते व ही गोष्टहि सर्वथैव सत्याहि आहे. तथापि तेथील राजलक्ष्मी हस्तगत करण्यासाठीं रुधिराचे अलोट पाट वाहिले ते सर्व या कुरुक्षेत्राच्या भूमीवर व तेथील जयापजयावर दिल्लीच्या राजमुकुटाखालील शिरबदल होई. यावरून इतिहास-दृष्ट्याहि या क्षेत्राला कसें महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे हें दिसून येईल. या भूमीवर झालेल्या अशा क्रान्तिकारक युद्धांची नुसतीं नामावलीच या गोष्टीची साक्ष देईल.

पहिलें घनघोरयुद्ध कौरवपांडवामधील. कौरवांचा राजमुकूट पांडवांनीं हरण केला.

इतिहासकाळांतील महत्त्वाचीं युद्धें महमद घोरी व पृथ्वीराज चव्हाण यांमध्यें झालीं व इंद्रप्रस्थाचा राजमुकूट महमद घोरीच्या शिरावर चढला.

नंतर १५२६ मध्यें दिल्लीपति इब्राहिमखान लोदी याच्या एक लक्ष सैन्याचा बाबरानें आपल्या मूठभर हस्तकांकरवीं पराजय करून दिल्लीची राजलक्ष्मी आपली अंकित केली.

यानंतर १७६१ मध्यें अहमदशाह अबदली व मराटे यांमध्यें घनघोर युद्ध होऊन मराठी सत्तेच्या वाढीला प्रचण्ड धक्का बसला. या भूमीची वास्तुदेवता सदैव बुभुक्षित, हपापलेली असून तिला मधूनमधून मानवी

रुधिरप्राशनाची लहर येते व तिच्या पायीं आतांपावेतों लक्षावधी मनुष्यांचा ग्रास येथील क्षेत्रदेवतेनें घेतलेला आहे. असो.

## क्षेत्रमहात्म्य

कुरुक्षेत्रीं अनेक महर्षींनीं व राजर्षींनीं यज्ञयाग केलेले आहेत. याच क्षेत्रीं गीतोपदेश करण्यांत आला. याच ठिकाणीं भारती युद्धांत शरशय्येवर पडले असतांना भीष्माचार्यांनीं शांतिपर्व कथन केलें. या भूमींतील प्रत्येक कण हिंदु जातीला परमपावन वाटतो. कुरु+क्षेत्र या दोन शब्दांनीं कुरुक्षेत्र हा संयुक्त शब्द बनला आहे व कुरु राजामुळें त्या भूमीला कुरुक्षेत्र हें नामाभिधान प्राप्त झालें असलें तरी कुरु राजापूर्वींपासूनहि हें क्षेत्र सुप्रसिद्ध गणलें जात आहे.

कुरुक्षेत्र देवतांची यज्ञभूमी आहे असा शतपथब्राह्मणांत उल्लेख आहे. परम पावन सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांमधील प्रदेश देवतांनीं तयार केला म्हणून त्यास ब्रह्मावर्त असें म्हणतात ( मनुस्मृति ). याखेरीज महाभारत, वामनपुराण, स्कन्दपुराण, अग्निपुराण, गरुडपुराण, कूर्मपुराण, सौरपुराण, इ० ग्रंथांत याचें महत्त्व गायलें आहे.

या प्रकारानें सर्व हिंदु शास्त्रें व पुराणें या क्षेत्राचें महत्त्व मुक्तकंठानें गात आहेत व कुरुक्षेत्रं गमिष्यामि कुरुक्षेत्रं वसाम्यहम् । य एवं सततं ब्रूयात सोऽमलः प्राप्नुयाद् दिवम्. ' अशी म्हण रूढ झालेली आहे.

## ' कुरुक्षेत्र ' नांव कां पडलें ?

या क्षेत्राला कुरुक्षेत्र नांव पडण्याचें कारण असें:—

एकदां राजा कुरूच्या मनांत असें आलें कीं, आपण असें कांहीं काम करावें कीं जगांत आपलें नांव अमर राहिलें पाहिजे. तेव्हां त्यानें एक नांगर तयार केला व शंकरापासून नंदी व यमराजापासून महिष मागून घेऊन स्यमंत-पंचकक्षेत्रांत औरस चौरस ७ कोस भूमि नांगरून काढली. इतक्यांत भगवान विष्णु प्रगट होऊन म्हणाले, ' राजन् हें काय करतोस ? ' कुरु म्हणाले,

' भगवान् तप, सत्य, क्षमा, दया, शौच, दान, योग व ब्रह्मचर्य अशा अष्टांगांनीं परिपूर्ण अशा महाधर्माची प्राणप्रतिष्ठा 'मी करीत आहे.

भगवन्ः— ठीक ठीक, पण त्याला बीज कोठें आहे ?

राजाः— कां ? हें माझें शरीर.

भगवान्ः— बरं तर आण तें इकडे. मी तें पेरतों. कुरु राजानें आपले दोन्ही हात पुढें केले ; त्याचे भगवंनांनीं तुकडे करून ते सर्वत्र विखुरले. पायाचीहि तीच अवस्था झाली. पुढें कुरूनें आपलें शीर पुढें केलें. तेव्हां भगवान् त्याची धर्मनिष्ठा पाहून मुग्ध झाले व म्हणाले, ' राजा मी तुजवर प्रसन्न आहे. इच्छित वर माग. '

राजाः— आपण जर वर देण्यासाठीं प्रसन्न झाला आहां, तर माझें मागणें इतकेंच कीं, जितकी भूमि मी आतां नांगरली आहे, ती भूमि धर्मक्षेत्र व माझ्या नांवानें प्रसिद्ध व्हावी. आपण स्वतः, शंकर, व इतर देवतांचा वास येथें व्हावा व ही भूमि अक्षय पुण्य देणारी व्हावी. भगवंतांनीं ' तथास्तु ' असें आशीर्वचन दिलें व तेव्हांपासून या भूमीला 'धर्मक्षेत्र व कुरुक्षेत्र' असें म्हणण्यांत येत आहे, व याच कारणासाठीं श्रीमद्भगवद्गीतेमध्यें गीतारंभ ' धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेत्ता युयुत्सवः ' असा करण्यांत आला आहे.

सत्ययुगांत-या भूमीला ब्रह्मदेवाची उत्तरवेदी म्हणत. त्रेतायुगांत स्यमंत-पंचक क्षेत्र म्हणत व याचप्रमाणें, ब्रह्मर्षिक्षेत्र, ब्रह्मक्षेत्र, कुरुजांगल व दीर्घक्षेत्र इत्यादि अनेक नामांनीं हें क्षेत्र प्रसिद्ध असलें तरी द्वापारयुगांपासून या क्षेत्राला कुरुक्षेत्र असेंच नांव असून, तेंच आजतागायत रूढ आहे. या कारणांसाठीं तें महान तीर्थ गणलें जातें व हें तीर्थ केवळ एकाच युगांत मान्य आहे असें नसून सर्व युगांत तें महातीर्थ म्हणून गणलें जात आहे.

पुराणकालीं या क्षेत्राला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व असलें तरी इतिहास-कालींहि त्याला दुसरें महत्त्व प्राप्त झालें. भारतवर्षाच्या स्वातंत्र्यलक्ष्मीचें निवासस्थान म्हणून इंद्रप्रस्थ—आजची दिल्ली—अनादिकालापासून गाजत

आहे. या स्वातंत्र्यलक्ष्मीचें हरण करण्यासाठीं आजपर्यंत कांहीं थोडथोडके झगडे झाले नाहींत व ते सर्व झगडे याच कुरुक्षेत्रावर लढले गेले आहेत. इतिहासकालाला आरंभ झाल्यापासूनचा इतिहास अवलोकन केल्यास असें दिसून येईल कीं, दिल्लीच्या रक्तपिपासु राजसिंहासनापायीं कुरुक्षेत्राच्या अघोरी वास्तुदेवतेनें इतकें रुधिरप्राशन केलें आहे कीं, इतिहासांत त्याला तोड क्वचितच सांपडेल. भारतवर्षावर ज्या ज्या स्वाऱ्या झाल्या त्या बहुतेक सर्व उत्तरेकडून झाल्या व भारतवर्षाच्या सम्राटाची राजधानी दिल्ली इचें प्रवेशद्वार कुरुक्षेत्र असल्यानें हिंदी स्वातंत्र्याचा सोक्षमोक्ष याच भूमीवर होई.

कौरवपांडवांच्या महाभारतानंतर महंमद घोरी व महाराज पृथ्वीराज यांजमध्यें जीं घनघोर युद्धें झालीं तीं याच रणभूमीवर. पुढें पृथ्वीराजाला दिल्ली राजनगरी विटून तिनें महंमद घोरीला कवटाळलें. त्यानंतर इब्राहिम लोदी व बाबर यामध्यें युद्ध होऊन भारताचा स्वामी बाबर हा निर्णयहि याच रणभूमीनें दिला. पुढें अबदाली व मराठे यांच्या घनघोर संग्रामांत दिल्ली नगरीनें मराठ्यांविरुद्ध कौल दिला व मराठ्यांच्या अप्रतिबंध गतीला पायबंद लागला याच भूमीवर. तो न लागता, तर विश्वासरावाची स्थापना दिल्लीच्या सिंहासनावर झाल्याखेरीज राहतीना. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे भारत-वर्षाच्या विधिलिखिताचे सर्व खेळ या भूमीवर खेळले गेले असल्यानें धार्मिक क्षेत्रमहात्म्या इतकेंच ऐतिहासिक दृष्ट्याहि या क्षेत्राला मोठें महात्म्य प्राप्त झालें आहे व अशा अनेक दृष्टींनीं हें क्षेत्र एकवार दर्शनीय आहे.

कुरुक्षेत्राचा एकंदर विस्तार ४८ कोसांचा आहे. व यांत जिकडेतिकडे अनेक तीर्थें पसरलीं आहेत. त्या सर्वांची संख्या ३६० असल्याचें सांगतात. त्यांतील कांहीं प्रमुख स्थळांचें वर्णन येथें देण्यांत येत आहे.

## स्थानेश्वर

' परमेश्वराचें निवासस्थान ' या नांवापासून स्थानेश्वर हें नांव निघालें आहे. याची कथा शिवपुराणांत पुढीलप्रमाणें दिली आहे:—

दधीची नांवाचा ब्राह्मण व क्षुर नांवाचा राजा हे दोघे स्नेही होते. एके दिवशीं उभयतामंध्यें कांहीं विषयावर वाद चालला असतां प्रकरण हातघाईवर येऊन दोघांची चांगली जुंपली. दधीची हा दुर्बल ब्राह्मण असल्यानें हटला. परंतु याचा वचपा काढल्याखेरीज राहणार नाहीं, असें त्यानें क्षुर राजाला बजावलें व लागलीच तो शंकराची आराधना करूं लागला. पुढें शंकर प्रसन्न झाल्यावर त्यानें दधीचीस तीन वर दिले. पहिल्या वरानें दधीचीच्या अस्थींचें वज्र होईल, दुसऱ्या वरानें तो अजिंक्य होईल व तिसऱ्या वरानें त्याला कोणी जिंकूं शकणार नाहीं. अशी वरप्राप्ती होतांच त्यानें क्षुर राजाला आव्हान दिलें. उभयतांचें युद्ध सुरूं झालें. त्यांत क्षुराचा पराजय झाला. परंतु तो विष्णुभक्त असल्यानें विष्णूच्या मागें लपला व विष्णु आणि दधीची यांचें युद्ध सुरूं झालें. त्यांत विष्णूच्या कसल्याच अस्त्रांचा दधीचीवर परिणाम होईना. विष्णूंनीं अंतर्ज्ञानानें यांतील मर्म जाणलें. या ठिकाणीं दधीचीनें विष्णूचा पराजय केला. म्हणून येथील तीर्थ प्रसिद्ध आहे.

स्थानेश्वरची आजहि दशा अत्यंत दीन झाली आहे. तथापि एके काळीं या ठिकाणला राजधानीचा मान प्राप्त झाला होता. शहराच्या आसमंत भागांत जे शिलाखण्ड पसरले आहेत, त्यावरून ही गोष्ट पटते. शहराच्या पश्चिमभागीं एक मोठा उंचवटा दिसतो. तेथें दिलीप राजाचा किल्ला होता, असें म्हणतात. स ६३४ मध्यें चिनी प्रवाशी ह्यूएनत्संग हिंदुस्थानांत आला असतांना त्यानें या राजधानीला भेट दिल्याचें वर्णन आहे. त्यावेळीं तेथें एक वैश्य वंश राज्य करीत होता व त्याचा राज्यविस्तार द० पंजाब व राजपुताना येथपर्यंत होता.

## सरस्वती

हिंदु लोकांत ज्या पवित्र असा सप्त नद्या मानल्या जातात, त्यांतील सरस्वती ही एक आहे. स्थानेश्वराचे उत्तरेस एक मैलावरून ती वाहत आहे. तिच्या दक्षिण तीरावर अनेक प्रसिद्ध अशीं मंदिरें व देवस्थानें

आहेत. वेद पुराणांतून देवता मानून इची फार स्तुति केलेली आढळते. महामुनी मार्कंडेय एकदां देवी सरस्वतीजवळ गेले व तिची प्रार्थना करून भूमीवर येण्याबद्दल तिची त्यांनीं प्रार्थना केली. ती तिनें मान्य केली व त्यांनीं तिला या स्थानीं आणली असें वर्णन आहे.

## स्थाणुसर

सरस्वतीच्या दक्षिणभागीं स्थाणुसर नांवाचें प्रसिद्ध सरोवर आहे. याच्या पश्चिम किनाऱ्यावर स्थाणु महादेवाचें सुंदर मंदिर आहे. हें मंदिर व सरोवराचा घाट श्री अहिल्याबाईनीं बांधला. वामनपुराणांत या तीर्थाचें पुढीलप्रमाणें वर्णन आहे.

एकदां वेन राजा कुष्ठानें पीडित झाला तेव्हां या रोगावर कांहीं उपाय आहे कां याचा सर्वत्र तो तपास करीत हिंडू लागला असतां, दैववशात स्थाणूसराच्या तटाकीं येऊन पोहोंचला. त्या सरोवरांतून एक श्वान बाहेर पडून अंग झाडूं लागलें तेव्हां त्याच्या पाण्याचे कांहीं थेंब राजाच्या अंगावर पडले; तों राजाचें तितकेंच अंग पूर्ण निरोगी झालें. हा चमत्कार पाहतांच त्यानें पाण्यांत मनःपूर्वक स्नान केलें. त्याचा रोगपरिहार झाला. तेव्हां राजानें तेथें स्थाणु महादेवाचें मंदिर बांधलें.

## भद्रकाली

स्थानेश्वराच्या उत्तरेस अर्ध्या मैलावर हें मंदिर आहे. कुरुक्षेत्रांत जी अनेक प्राचीन मंदिरें आहेत. त्यांतील हें मंदिर आहे, या मंदिरांत दुर्गाकूप ऊर्फ देवीकूप म्हणून तीर्थ आहे. येथें देवीला मृत्तिकेचा अश्व अर्पण केला असतां पुत्रप्राप्ती होते, अशी कथा प्रचलित आहे.

## पंचप्राची.

श्रीभद्रकालीच्या उत्तरेस पंचप्राची नांवाचें एक सरोवर आहे. सरो-

वरावर एक उत्तम बांधीव घाटहि आहे. याठिकाणीं भागीरथी वर्षांतून एकदां येते अशी दंतकथा आहे.

## कुरुक्षेत्र सरोवर

स्थानेश्वरच्या दक्षिणेस एक मैलावर कुरुक्षेत्र सरोवर आहे. पूर्वकालीं या सरोवराला, ब्रह्मसर, वायुसर, वायव्यसर व पवनसर अशीं अनेक नांवें होतीं. राजा पुरूरवा यानें आपली स्त्री उर्वशी इला याच ठिकाणीं अप्सरासह क्रीडा करीत असतांना पाहिली अशी पुराणकथा आहे. या सरोवराची पूर्वपश्चिम लांबी ३५४६ फूट व रुंदी १९०० फूट आहे. याच्या चौफेर पक्कया पायऱ्या बांधल्या आहेत. व बाजूंनीं विश्रांति घेण्यासाठीं जागोजाग आरामस्थळें बांधिलीं आहेत. या सरोवराचे दोन भाग असून ते दोन पुलांनीं जोडण्यांत आले आहेत. हे पूल राजा बिरबलानें बांधले असें म्हणतात.. याच्या तीरावर सर्वेश्वर महादेवाचें मंदिर असून एका बाजूस कुरुक्षेत्र पुस्तकालयाची मनोहर इमारत आहे. या पुस्तकालयांत जगांत गीताग्रंथाचें जितक्या भाषांतून भाषांतर झालें आहे त्याच्या प्रती, गीतेवर झालेलीं सर्व भाष्यें,टीका ग्रंथ यांचा मोठा अमूल्य संग्रह असून पुण्याच्या गीताधर्ममंडळाच्या विनंतीवरून याठिकाणीं मार्गशीर्ष शु. ११ ते १५ पर्यंत गीताजयंतीचा मोठा उत्सव होत असतो.

## सन्निहित सरोवर

जो मनुष्य सन्निहित सरोवरीं स्नान करून सरस्वती तीरीं वास करतो त्यास ब्रह्मज्ञान प्राप्त होतें असा उल्लेख वामनपुराणांत आहे. पद्मपुराणांतहि या तीर्थाचा उल्लेख आहे. हें सरोवर कुरुक्षेत्राच्या पूर्वोत्तर कोपऱ्यांत आहे. या सरोवरावरहि बरेच घाट बांधले असून नाभाच्या महाराजांनीं श्रीलक्ष्मीनारायणाचें सुंदर मंदिर बांधलें असून पतियाळाचे महाराज व काली कमलीवाला यांचे प्रशस्त वाडे असून तेथें सदावर्ते आहेत.

## बाणगंगा

भीष्माचार्य शरपंजरीं पडले असतांना त्यांची तृष्णा भागविण्यासाठीं अर्जुनानें बाण मारून पाताळांतून गंगेला वर खेचून काढिली ती बाणगंगा प्रसिद्ध असून स्थानेश्वरापासून दक्षिण-पश्चिम दिशेला साडे तीन मैल दूर आहे.

## पृथूदक

कुरुक्षेत्रांवरील तीर्थांत हें तीर्थ बरेंच महत्त्वाचें गणलें जातें. पृथ्वीवर सर्वत्र अराजकता पसरली असतां पृथ्वीनें पृथूला जन्म दिला त्यावेळीं दुःख-हर्ता जन्माला आला म्हणून सर्वत्र आनंदी आनंद झाला. त्याच्या नांवावरून जगाला पृथ्वी हें नामाभिधान प्राप्त झालें. पृथूच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र वेन यानें बारा दिवस या ठिकाणीं बसून उदकाचें दान दिलें म्हणून याला पृथू-दक हें नांव प्राप्त झालें. या ठिकाणीं पृथूनें आपल्या नांवानें एक नगरहि वसविलें होतें. त्याचें विद्यमान नांव पृथूदक अथवा पोहवा हें आहे.

## ज्योतिसर

कुरुक्षेत्राला आज जें विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे, तें या क्षेत्रावर श्रीकृष्णांनीं अर्जुनास गीतोपदेश केला म्हणून व तो गीतोपदेश ज्या स्थळीं केला तें स्थान ज्योतिसर असें मानलें जातें. म्हणून हिंदुमात्राला हें स्थान परम पवित्र असें सहजच वाटतें. या ठिकाणीं दरभंग्याच्या महा-राजांनीं एक संगमरवरी सुंदर मंदीर बांधलें असून दुसरें एक हनुमानजीचेंहि छोटें मंदीर आहे.

## कुरुक्षेत्राची आजची स्थिति

कुरुक्षेत्र हें क्षेत्र परम पवित्र व हिंदु जातीला अत्यंत आदरणीय असलें तरी अनेक शतकें त्याची एकसारखी हेळसांड होत गेली व त्यामुळें पुराण-

काळचीं मंदीरें व इतर अवशेष यांची अत्यंत दुःस्थिति झाली. परंतु या गोष्टींकडे सुदैवानें कांहीं हिंदुधर्माभिमानी लोकांचें लक्ष वेधलें व या पावन क्षेत्राचा पुनरुद्धार करण्यासाठीं श्री. कुरुक्षेत्र जीर्णोद्धार समिति स्थापन करण्यांत आली. या समितीच्या उत्साहि व चिकाटीच्या कार्यकर्त्यांनीं मोठमोठ्या धनिकांची, राजेरजवाड्यांचीं मनें वळवून या क्षेत्राचा पुनरुद्धार करण्याचें कार्य हातीं घेतलें. या समितीनें केलेली कामगिरी सर्वथैव अभिनंदनीय आहे. कुरुक्षेत्र सरोवर बरेंचसें बुजून गेलें होतें. तें उकरून घाट बांधण्यांत आले. त्याचप्रमाणें सन्निहित सरोवर, बाणगंगा, भीष्मकुंड, ज्योतिसर, सूर्य कुंड ( या ठिकाणीं अभिमन्यूला वीरगती प्राप्त झाली. ) इत्यादि तीर्थें उकरून दुरुस्त केलीं. कुरुसरोवरावर मोठें पुस्तकालय बांधलें. पुराणवस्तु-संशोधक खात्याची मदत घेऊन जुनीं नगरें उकरून तेथील जुन्या वस्तूंचा संग्रह करण्यांत आला. अनेक मंदीरें, घाट, धर्मशाळा, इत्यादि बांधिल्या. एक संस्कृत पाठशाळा स्थापन केली. अशा रीतीनें जीर्णोद्धाराचें पवित्र काम हातीं घेऊन क्षेत्राला आज जिवन्त स्वरूप आणलें आहे. हें अखिल हिंदु जातीवर समितीचे निस्संशय अगणित उपकार आहेत. परंतु या क्षेत्राचा अफाट विस्तार, तेथील ३६० तीर्थें, त्याचें प्राचीन महत्त्व, हें लक्षांत घेतां तेथील अणुरेणुहि अत्यंत पावन असा अभिमान हिंदु जातीला वाटतो व त्या सर्वांचा पुनरुद्धार करणें हें काम मोठ्या खर्चाचें असल्यानें अखिल हिंदू जातीनें त्या पवित्र कार्यास हातभार लावला पाहिजे.

भगवान् श्रीकृष्णांनीं ज्या पावन ठिकाणीं गीतोपदेश केला त्याचें पुण्य-स्मरण मार्गशीर्ष शु० ११ च्या दिवशीं—गीताजयंतीच्या दिवशीं—करण्याच्या हेतूनें धर्मक्षेत्र–कुरुक्षेत्र वर्णन केलें. प्रत्यक्ष शरीरानें न झालें तरी मनानें तरी वरील पुण्यभूमीचें दर्शन घेतां यावें, या हेतूनें महाराष्ट्र वाचकांच्या चरणीं ही कथा निवेदन केली, व ती त्यांस रुचेल अशी आशा आहे.

# २ हिन्दु साम्राज्याचे शक्तिपीठ

"हनोज़ देहली दूर आस्त "* असे उद्गार पूर्वकालीं नेहमीं ऐकूं येत. सुवर्णभूमीच्या ऐश्वर्याची कीर्ति दिगंत पसरलेली ऐकून तुर्कस्थान-इराण मार्गे व्यापारी लमाणांचे तांडे सतत हिंदुस्थानांत येत. दूरचा प्रदेश, वाहतुकीचीं साधनें अत्यल्प, डोंगराळ मुलूख, त्यांतून अनंत अडचणी सोशीत मार्गक्रमण करीत असता श्रांत लमाण नेहमीं विचारीत कीं 'दिल्ली अजून किती दूर आहे ?' आणि 'दिल्ली नगरी अजून पुष्कळ दूर आहे,' असे उद्गार त्या श्रान्त लमाणांस नेहमींच ऐकावे लागते. आणि म्हणूनच या उद्गारांना कालांतरानें म्हणीचें रूप प्राप्त झालें आहे. एखादें अत्यंत मोठें कार्य हातीं घेतलें आणि यश दूर असलें तर या म्हणीचा उपयोग करतात. अलीकडे मात्र या म्हणीला राजकीय स्वरूप प्राप्त झालेलें आहे.

---

* या संबंधानें दुसरी एक कथा रूढ असल्याचें दिल्ली येथून श्री. दत्तात्रय धोंडो वझे कळवितात ती अशीः— " स. १३२४ मध्यें ग्यासुद्दिन तघलख बंगाल प्रांतांतील बंडाळी मोडून स. १३२५ चे सुरवातीस दिल्लीस परत येत होता. त्याच्या अनुपस्थितींत त्याचा पुत्र जोन्हा ( महमद तघलख ) हा दिल्लीचा कारभार पाहात होता. त्याला राज्यलोभ सुटून त्यानें ग्यासुद्दिनास ठार मारण्याचें योजिलें. या कामीं त्याला निझामउदीन औलियाचें साहाय्य असावें असें म्हणतात. बादशहाच्या स्वागतासाठीं यमुनेच्या पलिकडील तीरावर मोठा मंडप उभारला होता. बादशहा व औलिया यांचें सख्य नसल्यानें औलियास दूर जाण्यास सुचविलें असतां त्यानें उद्गार काढले, 'हनोझ देहली दूर आस्त.' त्याप्रमाणें दुसरे दिवशीं मंडपांत बादशहा गेला असतां तो कोसळून त्यांत तो मारला गेला. ही अशी एक कथा आहे; त्याचप्रमाणें आणखीहि ऐकण्यांत आहेत.

# हिंदु राज्याची प्राचीन राजधानी

दिल्ली ही भारतवर्षाची पुरातन राजधानी. इतकी पुरातन कीं, तिच्या-इतकी पुराणी राज-नगरी या पृथ्वीतलावर आज तरी दुसरी नाहीं. सहस्त्रों वर्षे या नगरीनें राजधानीचें वैभव उपभोगिलें, मध्यंतरी तिचें तें भाग्य लुबाडण्यांत आलें असलें तरी आजच्या राज्यकर्त्यांनाहि याच प्राचीन नि इतिहासाशीं अनेक शतकांचा निकट संबंध जडलेल्या नगरीलाच राजधानीचा मान द्यावा लागला. या पुराणेतिहासप्रसिद्ध नगरीला राजधानीचा मान प्राप्त झाला असला, तरी पुराणकालांत या नगरी विषयी ज्या भावना भारतीय अंतःकरणांत वास करीत होत्या; त्या भावना मात्र आजच्या नगरीबद्दल नाहींत. मॅाँटफर्ड सुधारणा सुरू होताच लोकमान्यांनीं त्या संबधानें मत व्यक्त करतांना ' हनोज देहली दूर आस्त ' असेच उद्‌गार काढले. सुधारणांपासून स्वराज्य फार दूर आहे; असेंच त्यांनी प्रतिपादिलें.

परंतु ती स्थिति प्रवासाच्या बाबतींत मात्र निर्विवादपणें राहिली नाहीं. आता दिल्ली फार दूर आहे असे उद्‌गार कोणी काढणार नाहीं. विमानानें तर हें अंतर कांहीं तासांवर आणून ठेवलें आहे. आणि कोठलाहि यात्रेकरू आपल्या इच्छेप्रमाणें अगदीं सुखानें अल्पावधींत दिल्लीची यात्रा करू शकतो. मोठमोठ्या पर्वतांचा हृदयभेद करून त्यांतून सुंदर राजपथ निर्माण झाले. गंभीर गर्जना करून पांथाचे मार्ग अडवून धरणाऱ्या नदनद्यांना लोहशृंखलांनीं बद्ध करून त्यांच्या छातीवरून दिमाखानें, कोणत्याहि ऋतूंत जाता येईल असे लोहमार्ग सिद्ध करण्यांत आले, आणि ज्या दिल्ली नगरींत जाण्यास ४।६ महिने लागावयाचे तेथें चेंडू फेकला जावा, त्याप्रमाणें मनुष्य त्याच्या पोटांतलें पाणीहि न हलता अवघ्या २४ तासांत मुंबईतून दिल्लींत फेकला जातो. इतकी कालानें निदान प्रवासाच्या बाबतींत तरी प्रगति करून दिल्ली अजून दूर आहे ही म्हण साफ खोटी पाडली आहे.

## रम्य रोमहर्षण इतिहास

या नगराचा इतिहास अत्यंत रम्य, वीरश्रीयुक्त, भयोत्पादक, करुणास्पद, नि रोमहर्षण आहे. या नगरीच्या वस्तूदेवतेनें इतके देखावे पाहिले आहेत कीं, असे विचित्र आणि अद्‌भुतरम्य देखावे कोणत्याहि राजनगरीनें देखिलेले नाहींत. या नगरांतील दगडांना, अवशेषांना, जर, कांहीं अद्‌भुत प्रकारानें वाचा फुटली तर या भूमींत किती दीर्घकालाचा इतिहास दडून बसला आहे याची कल्पना येईल. कालमहर्षींच्या उदरांत या नगरीच्या जन्मापासूनचा चित्रपट छपून बसला असला, तरी इतिहासानें आणि इतिहासकालीन वस्तूंनीं केलेली नोंद तेवढीच मानवी दृष्टीला गोचर असणार हें उघड आहे.

दिल्लीपासून सुमारें ६५ मैलांवर पूर्वोत्तरभागीं गंगाकिनारीं हस्तिनापूर हें पुराणप्रसिद्ध नगर होतें. पुढें कौरवपांडवांमध्यें वाद उत्पन्न झाल्यानंतर पांडवांनीं खांडववन स्वच्छ करून आपली इन्द्रप्रस्थ ही नगरी यमुनातीरीं, आजच्या ठिकाणीं प्रथमतः स्थापन केली. त्या घराण्यांतील शेवटचा राजा राजपाल हा होता. त्याच्यानंतर उज्जयिनीच्या विक्रमादित्याच्या स्वामित्वाखालीं ही नगरी गेली. नंतर खि. पू. ३२१ ते २९३ चंद्रगुप्त मौर्य यांच्या आधिपत्याखालीं; पुढें खि. पू. तिसऱ्या शतकांत अशोक या नगरीचा स्वामी होता. इ. स. ५५० त हर्षानें सर्व उत्तर—हिंदुस्थान पादाक्रान्त केलें, त्याच्या छत्राखालीं ही नगरी गेली नंतर पहिला व दुसरा अनंगपाल आणि नंतर इ. सन ११६४–९३ शेवटचा हिंदु राजा पृथ्वीराज इतक्या हिंदु राजांनीं या नगरींत राज्य केलें. हा सर्वच काल मोठ्या भाग्याचा, वैभवाचा, हिंदुधर्माचा आणि संस्कृतीचा गौरव वाढविणारा आणि अभिमानास्पद होता.

## पुराणकाल व इतिहासकाल

विख्यात इंद्रप्रस्थ नगरी यांच ठिकाणीं होती. याच ठिकाणीं प्रातः—स्मरणीय युधिष्ठिर आणि त्याचे विजयशाली बंधु होते. याच जागेवर त्या पुण्यकालीं अनेक भाग्यवन्तांनीं दीर्घ काल राज्यें करून सर्वत्र आर्यगौर=

प्रसृत केला. महर्षी वेदव्यास, भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कर्ण, अर्जुन इत्यादि वीरवृंदानें आपापलें वीर्य प्रकाशित करून अक्षय्य कीर्ति याच ठिकाणीं संपादन केली. ते देवतुल्य पुण्यपुरुष गेले आणि त्याबरोबर आमचे बाहुबल नि विजिगीषुवृत्तिहि पण गेली. आमच्या डोळ्यांवर पडदे आले आहेत. आमचीं मनें दुबळीं बनलीं आहेत. हे पुण्यपुरुषांनो, आम्हास असें ज्ञान नि बल द्या कीं, जेणेकरून हिंदूंचें नांव उन्नत करण्याची शक्ति आम्हांस येईल.

पांडवापासून पृथ्वीराजापर्यंतचा सर्वत्र इतिहास सुसंगत नाहीं. परंतु त्यानंतरचा इतिहास मात्र सुसंगतवार सांपडतो. हिंदु साम्राज्य नष्ट होऊन, त्याच्या रक्षेवर मुसलमानांनीं आपली सत्ता स्थापित केली आणि हा काल ६६४ वर्षांचा म्हणजे ११९३ ते १८५७ इतका समजला, तरी या नगरीच्या पंचक्रोशींत सात नगरें वसविलीं आणि अखेरीस मोगलांनीं वसविलेलें नगर नि लाल किल्ला हीं आज त्यांचीं स्मारकें म्हणून विद्यमान आहेत. हीं सात नगरेः—कुतुब, सिरी, तबलकबाद, जहापनाह, फिरोजाबाद, पुराण किल्ला आणि शहाजहानाबाद या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. यांपैकीं पुराणा किल्ला हा मूळ पांडवांचा, त्या वास्तूवर मागाहून हुमायून बादशहानें नवे महाल बांधले.

## रुधिरप्रियानगरी

या नगरीला रुधिरप्रिया, मोठी दफनभूमि, थडग्यांचें शहर, असें अत्यंत सार्थतेनें संबोधण्यांत येते. दिल्लीच्या तख्तावर ५२ बादशहांनीं राज्य केलें. यांपैकीं २८ तुरुंगवासांत गेले अगर त्यांचे खून झाले. दोन रणभूमीवर कामीं आले. दोघांचे डोळे काढून त्यांना अंध करण्यांत आले. आणि कित्येकांना जबरदस्तीनें सिंहासनावरून ओढून पदच्युत करण्यांत आले. १८५७ चा रणसंग्रामहि या ठिकाणीं मोठ्या अटीतटीचा झाला. या नगरीची वास्तुदेवता रक्तपिपासु असून तिनें कित्येक राजवंशजांचा फन्ना उडविला. परंतु हें दुर्भाग्य ज्याप्रमाणें तिच्या नशिबीं, त्याचप्रमाणें जगाला मार्गदर्शक होणाऱ्या गीतेचा

पहिला मंजुळ स्वरहि याच नगरीनें ऐकला. येथून अवघ्या ९० मैलांवर धर्मक्षेत्र व कुरुक्षेत्र असें मानलेलें पुण्यक्षेत्र आहे. श्रीकृष्णाच्या पदरजांनीं ही भूमि पावन झालेली आणि त्याचे मित्र पांडव यांच्या साहचार्यात त्यानें घालविलेले दिवसहि येथेच. सुख–दुःख अशा संमिश्र भावनांनीं युक्त असाच तिचा इतिहास घडलेला आहे.

आज दिल्ली नगरीचे दोन प्रमुख भाग आहेत. जुनी दिल्ली मोगलांची आणि तिच्या दक्षिणेस ब्रिटिशांनीं वसवलेली नवी दिल्ली. या नव्या दिल्लीच्या दक्षिणेस पुराणा किल्ला, कुतुब वगैरे जुन्या राजधान्यांचे अवशेष सर्वत्र विखुरलेले आढळतात. नवी दिल्ली ही जुनी मोगली दिल्ली आणि पुराण्या राजधान्या यांमधील रायझाना या खेड्याच्या मैदानावर वसविण्यांत आली आहे. पौराणिक महत्त्व, अनेक राजधान्यांचीं ठिकाणें, अमुप ऐतिहासिक अवशेष आणि आजहि राजधानीचें केंद्र झालेल्या या भारताच्या राजनगरीचें जुनें नि नवें शब्दचित्र येथें रेखाटण्यांत येणार आहे.

## पुराणा–पांडव–किल्ला

प्रथमतः सर्वांत जुन्या राजधानींत म्हणजे इंद्रप्रस्थ या जागेकडे पाहिलें असतां इस्लामधर्मानुयायांनीं हिंदुधर्मविध्वंसनाचें कार्य करून हिंदुत्वाची नांवनिशाणीहि उरू द्यावयाची नाहीं हा जो अत्याचार सर्वत्र केला त्याचेंच दृश्य पुराणा किल्ल्यांत दिसतें. हें नगर पांडवांनीं वसविल्याचें सुप्रसिद्ध आहे. नव्या दिल्लीच्या दक्षिणेस पूर्व बाजूला त्याचा अवशेष दृष्टीस पडतो. या ठिकाणीं जुन्या वास्तूचा अवशेष बिलकुल नाहीं. फक्त किल्ल्यांत एक मोडकळीस आलेलें देवीचें नि हनुमानजींचें मंदिर असून तेथें एक पुजारी असतो. याच किल्ल्यांत मूळ वास्तूवर शेरशहा सुरी यानें दोन मशिदी बांधिल्या त्या अद्याप विद्यमान आहेत. याच शेरमंडलाच्या जिन्यावरून हुमायून पडून त्या दुखण्यांत त्याचा अंत झाला.

पुराणा किल्ल्यांतील जुनी वास्तु नष्ट झाली असली, तरी एक गोष्ट मात्र

अद्याप तेथें आढळून येते. मोठ्या हौदांत लहान लहान दीपमाला लावून त्यावरून पाण्याची चादर सोडण्याची कल्पना पांडवकालीन आहे. असे चादरीचे हौद या किल्ल्यांत असून ते मुस्लीम कलाकौशल्याचे नमुने म्हणून सांगण्यांत येतात, परंतु ही कल्पना निश्चित पांडवकालीन आहे. आणि पेशव्यांनीं बांधलेल्या शनिवारवाड्यांत पांडवांच्या या कल्पनेचेंच अनुकरण केलें आहे. कित्येक इतिहासकार लिहितात त्याप्रमाणें मुस्लीम कलानुकरण नव्हे. त्याचप्रमाणें शनिवारवाड्याचें जें सिंहद्वार आहे त्यावर चंद्र सूर्य आहेत. तेंहि या पुराणकिल्ल्याचें पश्चिमाभिमुखी महादरवाजाप्रमाणेंच हुबेहूब अनुकरण आहे आणि ते अनुकरण मोगलांचें नसून पांडवांच्या कलेचें आहे.

## पृथ्वीराजाची राजधानी

या पुराण कालावरून इतिहासकालाकडे वळलों म्हणजे प्रथमतः महाराजा पृथ्वीराज यांच्या राजधानीचें स्मरण सहजच होतें. पृथ्वीराजाची ही राजधानी नव्या दिल्लीच्या दक्षिणेस पश्चिम अंगास आहे आणि या दिल्लीच्या पायथ्याशीं पूर्व अंगाला योगेश्वरी मंदिर, पृथ्वीस्तंभ, विष्णुमंदिर हीं हिंदु संस्कृतीची जागती ठिकाणें होतीं. परंतु इस्लामीयांनीं त्यांचें पूर्ववैभव हिरावून घेऊन पृथ्वीस्तंभाला कुतूबमिनार, विष्णूस्तंभाला लोहस्तंभ आणि विशाल आणि नयनमनोहर असलेल्या विष्णुमंदिराचे रूपांतर कुतुब मशिदींत केलें.

पृथ्वीराजाच्या याच किल्ल्यांत महंमद घोरी नऊ वेळां दातीं तृण धरून शरण आला आणि पृथ्वीराजानें त्याच्या दानशूरतेला बळी पडून त्याला दरवेळेला जीवदान दिलें आणि पुढें याच घोरीच्या हातून पृथ्वीराजाचा वध झाला ! ज्यांनीं हिंदु राजांचा अशा निंद्य प्रकारें अपमान केला त्यांनीं हिंदु देवतांची विटंबना करण्यांत कां भूषण मानू नये ? त्यांनीं केलेल्या भयंकर पापांची साक्ष अद्यापि अचेतन असलेले दगडहि देत आहेत. त्या पापाची शुद्धी आहे कोणाला ?

## विष्णुमंदिर

ज्या ठिकाणीं आज लोहस्तंभ उभा आहे तो मोठा चौक असून चारहि बाजूला हिंदु संस्कृतिनिदर्शक अत्यंत कलाकौशल्यानें भरलेला भव्य मंडप आहे. त्याच्या स्तंभांवर हिंदु देवतांचीं चित्रें कोरलेलीं आहेत. यांतील प्रत्येक मूर्तीचें तोंड छिन्नविच्छिन्न करण्यांत आलें आहे. हिंदु देवतांची आम्ही कशी वासलात लावतो हें सदैव जनतेच्या डोळ्यांसमोर नाचावें म्हणून हा उपक्रम केलेला असावा. त्यामुळें हिंदु धर्माचा अपमान सदैव टोंचत कायम राहाणार आहे. हिंदूंच्या अधःपाताचें आणि यवनांच्या गौरवाचें हें चिन्हच होऊन बसलें आहे. या ठिकाणींच पूर्वीं विष्णुमंदिर होतें. त्या जागची मूर्ति गेली, तेथें झाली कुतुब मशीद, राहिले आहेत सभोवतालचे साक्षीरूप स्तंभ हिंदूंना कांहीं जागृती होते कीं काय हें पाहण्याला; आणि आपला अपमान सांगण्याला !

विष्णुमंदिराच्या या चौकांत जो स्तंभ उभा आहे त्याच्यामागें फार विशाल असा इतिहास आहे; त्याला कोणी पांडवस्तंभ म्हणतात. कोणी माधवस्तंभ म्हणतात. युधिष्ठिराच्या वंशांत एक माधव राजा होऊन गेला( खि. पू. ८९५), त्यानें हा स्तंभ उभारला असें म्हणतात. परंतु अनेकांच्या नांवें तो मोडत असला तरी त्यावर जो लेख कोरला आहे तो आधारभूत धरणें प्राप्त आहे. आणि तसा तो धरल्यास हा स्तंभ कोणी उभारला याचा बोध होण्यास पुष्कळ साहाय्य होईल. तो श्लोक असाः—

यस्याद्वर्तयतः प्रतीपमुरसा शत्रून्समेत्यागतान्वङ्गेष्वा इव वर्तिनो भिलिखिता खड्गेन कीर्तिर्भुजे तीर्त्वा सप्तमुखानि येन समरे सिंधोर्जिता बाह्लिका यस्या-द्याप्यधिवास्यते जलनिधिर्वीर्यो निलैर्दक्षिणा खिन्नस्येव विसृज्य गां नरपतेर्ग्रा-मश्रितं स्येतरां मूर्त्या कर्मजितावनिं गतवतः कीर्त्या स्थितस्य क्षितौ शान्तस्येव महावने हुतभुजो यस्य प्रतापो महान् नाद्याप्युत्सृजति प्रणाशितरिपोर्यत्नस्य शेषः क्षितिम्प्राप्तेन स्वभुजार्जितञ्च सुचिरश्चैकाधिराज्यं क्षितौ चंद्राह्वेन

समग्रचंद्रसदृशीं वक्त्रश्रियं बिभ्रता तेनायं प्रणिधार्य भूमिपतिना भावेन विष्णौ मति प्रांशुर्विष्णुपदे गिरौ भगवतो विष्णोर्ध्वजः स्थापितः ।

## विष्णुस्तंभ

चंद्र या महाराजानें बाल्हिकांचा पराजय केला त्या स्मरणार्थ श्रीविष्णुचरणीं हा स्तंभ समर्पण केला. महाराजा चंद्र हा खि. श. चौथ्या शतकांत असावा असा कांहीं आंग्ल इतिहासकारांचा समज आहे. या ध्वजावर विष्णुवाहन गरुडाचें चित्र होतें, ही गोष्ट दिसून येण्यासारखी आहे. आणि स्तंभावरील लेखांतच उल्लेखिल्याप्रमाणें हा विष्णुचरणीं अर्पण केला असल्यानें त्यास विष्णुस्तंभ म्हणजेच उक्त आहे. हा स्तंभ मूळ कोठें होता या संबंधानेंहि अनेक कथा रूढ आहेत. असेंहि म्हणतात कीं महाराजा अनंगपालानें इंद्रप्रस्त नगरींतून हा स्तंभ काढून या विष्णुमंदिरांत श्रीविष्णूपुढें स्थापन केला. परंतु तेंव्हांपासून या वेळपर्यंत मात्र तो कोणास हालवितां आला नाहीं म्हणा कीं कोणी हालविला नाहीं आणि विष्णुमंदिराची कुतुबशहानें कुतुब मशीद बनविल्यानंतरहि तो जागच्या जागींच राहिला. कुतुबानें हा स्तंभ उखडण्याचा मनस्वी प्रयत्न केला पण त्याच्यानें तो निवाला नाहीं. नादीरशहानें हा स्तंभ उपटण्याचा प्रयत्न केला परंतु त्यालाहि यश आलें नाहीं. अनेक उत्पात झाले, गुलामकादिरनें तो नष्ट करण्यासाठीं त्यावर तोफाहि डागल्या परंतु तो अभंग राहून हिंदु राष्ट्राचें भवितव्य पाहत खडा आहे. याची उंची २३ फूट ८ इंच आहे.

## पृथ्वीस्तंभ

या स्तंभाच्या उजव्या बाजूस कुतुब मशीद आहे. सन ११९३ मध्यें मुस्लीमांनीं दिल्ली हस्तगत केल्यानंतर पहिलें कांहीं कार्य केलें असेल तर तें हिंदु मंदिरांच्या विध्वंसनाचें. पृथ्वीराज, अनंगपाल यासारख्या पुण्यवन्तांच्या पदधूळीनें पावन झालेल्या विष्णुमंदिराला मशिदीचें स्वरूप देण्यांत आलें.

अजमेर येथेंहि ' अढाईदिनका झोपडी ' म्हणून जी मशीद आहे तेंहि हिंदूंचें सर्वोत्कृष्ट असें मंदिरच होतें. तीच गत या विष्णुमंदिराची झाली. या मशिदीला हिंदु मंदिराचे स्तंभ आणून बसविले; हिंदुशिल्पकारांनीं तयार केलेल्या हिंदु-मंदिराच्या दगडांनींच भिंती नि छत उभारलें. यावर हिंदु शिल्प अत्यंत उत्कृष्ट कोरलेलें होतें. परंतु ते कोणाच्याहि ध्यानीं येऊं नये म्हणून त्या-वरून चुन्याचा गिलावा करून कुराणांतील म्हणी कोरल्या; परंतु मुस्लीमांचा हा प्रयत्न कालानें हाणून पाडला. आज सर्वत्रच विध्वंसनाचा हात फिरला असल्यानें मुस्लीमांनीं लपविलेल्या हिंदु शिल्पावरील खपले जागोजाग निखळून पडले असून आंतील अप्रतिम हिंदु कलेचे नमुने दृग्गोचर होतात.

ही कुतुब मशीद आणि तिच्या सभोवारचा टापू एका कालीं हिंदु राजांची राजधानी म्हणून प्रसिद्ध असे. ही राजधानी फार प्राचीन समजण्यांत येते. तोमार राजपुतांनीं स. ७८ मध्यें ही हिंदुराजांकडून जिंकून घेतली. याच्या भोवतालचा कोट आठव्या शतकांत महाराज अनंगपाल यानें बांधला. याचें राज्य हिमालयापासून विंध्यापर्यंत पसरलें होतें. या राजधानीच्या मध्यभागीं राजधानीला भूषणभूत असा स्तंभ महाराणी पृथ्वीराज यानें बांधला आणि तोच आज कुतुबमिनार नांवानें प्रसिद्ध आहे. हिंदूंना माननीय, पूजनीय, आदरणीय अशा वस्तूंचा नायनाट करावयाचा हें धोरण मूळ कुतुबशहानें जालीमपणें अंगिकारलें. तो हा पृथ्वीस्तंभ त्यांच्या नांवावर उभा राहिलेला कसा साहील ! महाराज पृथ्वीराज यानें आपल्या पत्नीला नित्य जमुनामय्याचें दर्शन व्हावें या हेतूनें तो बांधिला. पुढें कुतुबशहानें सन १२०० नंतर त्यावर आपला हात फिरवून मूळ स्वरूप पार बदलून टाकलें, त्यावर कुराण खोदण्यांत आलें. आज त्याची जमिनीपासून उंची सुमारें २५० फूट आहे. त्यावर चढण्यासाठीं ३०३ पायऱ्या आहेत. एकदां वीज पडून या मेघडंबरीची थोडी नासधूस झाली होती. आणि ती खालीं पडली ती आतांपर्यंत खालींच जमिनीवर असून स्तंभाच्या बाहेरच्या जागीं

ठेवण्यांत आली आहे. पृथ्वीस्तंभ आणि विष्णुस्तंभ हे जुन्या राजधानीचे अवशिष्ट अलंकार आहेत. *

## योगमायामंदिर

पृथ्वीस्तंभ ( कुतुबमिनार ), विष्णुस्तंभ ( लोहस्तंभ ) विष्णुमंदिर ( कुतुबमशीद ) यांनीं व्यापलेला भाग फार मोठा नि भव्य आहे. हा सर्व भाग ओलांडून मध्यंतरी आज असलेला रस्ता चालून पश्चिमेकडे सुमारें दोन फर्लांग गेल्यावर आपण आणखी एका महत्वाच्या नि पुराणप्रसिद्ध अशा ठिकाणीं येतो आणि तें स्थल म्हणजे योगमायामंदिराचें. हिंदुपुराणांत चौऱ्यायशी योगिनी सांगितल्या आहेत. त्यांतील प्रमुख देवतेचें हें एक आदिपीठ समजण्यांत येतें. कंस श्रीकृष्णाचा वध करण्यासाटीं टपला होता आणि त्यानें वसुदेवदेवकीला कारागारीं ठेवलें होतें. तेथे योगमाया जन्माला आली. असें सांगतात कीं तिचा वध करण्यासाठी कंस सिद्ध झाला असतां ती त्याच्या हातून निसटून या ठिकाणीं आली.

---

* ख्यातनाम कवि मैथिलीशरण गुप्त यांनीं आपल्या ' भारत भारती ' काव्यांत हा स्तंभ पृथ्वीराजानें आपल्या कन्येला यमुनादर्शन होण्यासाटीं बांधला असें म्हटलें आहे. कै. भारताचार्य चिंतामणराव वैद्यांनीं ' हिंदु भारताचा अंत ' या पुस्तकांत " विसलदेव चव्हाणानें आर्यावर्तांतील मुसलमानांस सरहिंदापर्यंत रेटीत नेले या विजया निमित्त हा विजयस्तंभ बांधण्याला प्रारंभ केला व पुढें सोमराज व त्याचा पुत्र पृथ्वीराज यानें तो पूर्ण केला असें म्हटलें आहे. " परंतु यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती हीच कीं, हा स्तंभ विजयस्तंभ असो वा यमुनास्तंभ असो तो हिंदु राजांनींच बांधिला हें निर्विवाद आहे. यांतील पहिले तीन मजले पृथ्वीराजाच्या वेळचे असून उर्वरित दोन मजले फिरोजशहाच्या कारकिर्दींत हिंदु शिल्पकारांनीं बांधले, असें श्री. द. धों. वझे दिल्ली, म्हणतात, तें मात्र बरोबर नाहीं. ही सर्व कारागिरी हिंदुसम्राटांच्या वेळचीच आहे.

या देवीचें मूळ मंदिर ख्रि. श. १५०० वर्षांपूर्वी युधिष्ठिराच्या काळांत बांधलें गेलें असावें असें म्हणतात. आज जें मंदिर उभे आहे तें १८२७ सालीं बांधण्यांत आलें. हें ठिकाण किल्लावजा असून चारहि बाजूला बुरूज आहेत. मंदिरांत अलीकडे अनेक दात्यांनीं सुधारणा केल्या आहेत. हिंदु मंदिराप्रमाणें गाभाऱ्याचें प्रवेशद्वार फार ठेंगणें आहे. या द्वारावर 'योगमाये महालक्ष्मि नारायणि नमोऽस्तुते' हा स्तुतिपर श्लोक कोरला आहे. देवीचें मंदिर दक्षिणाभिमुख आहे. मंदिराच्या मागच्या बाजूस यात्रेकरूंसाठीं धर्मशाळा असून जवळ पाण्याची विहीरहि आहे. या विहिरीच्या जवळ उभे राहून पश्चिमेकडे तोंड केलें असतां सुमारे चार फर्लांगावर दक्षिणोत्तर अर्ध-चंद्राकृती टेकडी दिसते. त्या जागीं महाराजा पृथ्वीराज यानें किल्ला बांधला.

६६-०८

## दिल्ली हिंदूंची

ज्या ठिकाणीं विष्णुमंदिर, विष्णुस्तंभ, पृथ्वीस्तंभ आहेत तो लालकोट नांवानें प्रसिद्ध होता आणि त्याचें क्षेत्रफळ २॥ मैलांचें होतें. पृथ्वीराजानें बांधलेल्या किल्ल्याचें क्षेत्रफळ सात मैल होतें. या किल्ल्याला दहा वेशी होत्या. त्यांपैकीं बदाऊन व रणजित हे दोन दरवाजे पडिक स्थितींतच, पण आज दिसतात. या किल्ल्याला अनेक हिंदु, जैन, बुद्ध मंदिरें, अनेक राजमहाल, उत्कृष्ट उद्यानें, शोभवीत होतीं. याच मंदिरांचा विध्वंस करून मुस्लिमांनीं आपल्या मशिदी उठविल्या.

दिल्लीस जाणारा मनुष्य हिंदूंची दिल्ली होती; त्यांच्या राजधान्या तेथें होत्या. हिंदूंनीं तेथून राज्यें केलीं. तेथून भारतीय संस्कृति पसरविली या गोष्टी विसरून मुस्लिम कौशल्याचींच स्तुतिस्तोत्रें गातो. परंतु मुस्लिमांचें नांवहि माहीत नव्हते त्या वेळीं हिंदु कलाकौशल्य किती उच्च कोटीस पोहोंचलें होतें आणि आज येथें ठायीं ठायीं मुस्लिमांचीं जीं स्मृतिचिन्हें दिसतात तीं हिंदूंच्या कलाकौशल्यावर कशीं उभारलीं आहेत याचें ज्ञान साधारण यात्रे-

करूला नसतें. पुराण्या दिल्लीचें हें वर्णन केलें आहे, आणि त्यांत खोटा अभिनिवेश नाहीं अशीहि लेखकाची दृढ समजूत आहे.

---

# ३. जुनी व नवी दिल्ली

'हिंदु साम्राज्याचें शक्तिपीठ' या नांवाचा दिल्ली नगरीसंबंधींचा पुराणेतिहासकालीन माहितीचा एक लेख लिहिला. तो लेख अनेक सज्जनांस आवडला असून कांहींनीं त्यासंबंधीं शंकाहि विचारल्या होत्या व त्यांचीं उत्तरेंहि त्या त्या वेळीं दिलेलीं आहेत. प्रस्तुत लेख हा पूर्णतया स्वतंत्र असला तरी त्या लेखाचा उत्तरार्ध म्हणतां येईल. त्या लेखांकांत दिल्लीच्या अखेरच्या हिंदु सम्राटाच्या अवशेषांवर स्मृतिसुमनांजली वाहिली. दिल्ली नगरी पाहतांना प्रेक्षक मुस्लीमांच्या कर्तबगारीनें मोहून जातो आणि हिंदु कर्तृत्व नि हिंदु वैभव, हिंदु कला नि हिंदुसंस्कृति यांवर मुस्लिमांनीं पुटें चढविली असल्यानें प्रेक्षकाच्या आज डोळ्यासमोर जें दिसतें त्यालाच बरें म्हणतो हें साहजिक आहे; परंतु तेथें आहे तें हिंदूंचें आहे, हिंदूंचें होतें, ही गोष्ट कालानेंच सिद्ध केलेली वाचकाच्या नि प्रेक्षकाच्या नजरेस आणावी हा यांतील प्रमुख हेतु.

## मुस्लीमांचें कलाकौशल्य

यावरून मुस्लिमांमध्यें कलाकौशल्य नव्हतें असें मात्र म्हणण्याचा लेखकाचा मुळीं सुद्धां हेतू नाहीं. मुसलमानांमध्यें धर्मवेड प्रखरतेनें होतें नि तें आहेहि; परंतु त्याबरोबर ते कलेचेहि भोक्ते होते ही गोष्ट दृष्टीआड करून कशी चालेल ! इंद्रप्रस्थाच्या आसमंत भागीं मुस्लीम राजांनीं जीं अनेकानेक नगरें वसविलीं त्यांचे अवशेष आज विद्यमान असून तेहि आपली करुणकथा सांगत असतातच. कुतुबच्या वायव्येस अल्लाउद्दीन खिलजीनें बांध-

लेलें सिरीनगर; कुतुबच्या पूर्वेस ग्यासुद्दिन तघलखानें रचलेली तघलकाबाद नगरी, दुसरा तघलक राजा महंमदशहा यानें उभारलेलें जहापनाह नगर, फेरोजशहा तघलकानें बांधिलेलें कुतुबच्या उत्तरेस आठ मैलांवरील फेरोजाबाद आणि नंतर शहाजहान बादशहानें बांधलेलें आज जुनी दिल्ली म्हणून प्रसिद्ध असलेलें नगर. या नगरांतील शिल्प त्याचप्रमाणें सफदरजंग थडगें निजामुद्दीन, जहांनआरा आणि हुमायून यांचीं थडगीं हीं ठिकाणें मुस्लीम शिल्पाचे अत्युत्कृष्ट नमुने म्हणून सांगतां येतील. सर्वच मुसलमानी राजे कलाकौशल्याचे भोक्ते होते. दिल्ली नगराखेरीजहि आग्रा, फत्तेपूरशिक्री, लखनौ, श्रीनगर या ठिकाणीं जगांत नांव दुमदुमेल अशा कलाकृति मुसलमान राजांनीं निर्माण करून आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेवलें आहे. असो.

हिंदुस्थानचा इतिहास उपलब्ध आहे तेव्हांपासून पाहिलें तरी सर्वांचेंच लक्ष या नगरीवर केंद्रीभूत झालें होतें. पुराणकालीं हिंदुस्थानावर आक्रमण करणारे लोक उत्तर दिशेकडून येत. हस्तिनापूर नि इंद्रप्रस्थ या पुराण्या राजधान्यांचा कीर्तिसौरभ फार प्राचीन कालापासून दिगंतीं दरवळून राहिला असल्यानें सहजच सर्वांचें लक्ष या राजनगरीवर रोखलें जाई आणि ज्याप्रमाणें घराचा उमरठा ओलांडून एकदा आंत प्रवेश केला म्हणजे अंतर्भागांत प्रवेश करणें सुलभ, त्याचप्रमाणें दिल्ली हातीं आली कीं हिंदुस्थानचे आपण चक्रवर्ति होऊं अशी कल्पना आणि ती तशी सत्यहि ठरलेली. अल्लाउद्दीन दिल्ली घेऊन दक्षिणेस अवघ्या ७८ हजार स्वारानिशीं येतो काय आणि अवघी दक्षिण पादाक्रान्त करतो काय? याचा अर्थ दिल्ली घेतली कीं हिंदुस्थान मुठींत आलें असा आहे. आणि याच कारणासाठीं या नगरीचें नामकरणंहि देहली — उमरठा असेंच यथार्थत्वानें प्राप्त झालें आहे.

'देहली'चें वर्णन सन्त तुलसीदासांनीं असें केलें आहे—

रामनाम मनि दीपधरू जीह देहली द्वार ।  
तुलसी भीतर बाहिरो जो चाहसि उजियार ॥

लेलें सिरीनगर; कुतुबच्या पूर्वेस ग्यासुद्दिन तघलखानें रचलेली तघलकाबाद नगरी, दुसरा तघलक राजा महंमदशहा यानें उभारलेलें जहापनाह नगर, फेरोजशहा तघलकानें बांधिलेलें कुतुबच्या उत्तरेस आठ मैलावरील फेरोजाबाद आणि नंतर शहाजहान बादशहानें बांधलेलें आज जुनी दिल्ली म्हणून प्रसिद्ध असलेलें नगर. या नगरांतील शिल्प त्याचप्रमाणें सफदरजंग थडगें निजामुद्दीन, जहांनआरा आणि हुमायून यांचीं थडगीं हीं ठिकाणें मुस्लीम शिल्पाचे अत्युत्कृष्ट नमुने म्हणून सांगतां येतील. सर्वच मुसलमानी राजे कलाकौशल्याचे भोक्ते होते. दिल्ली नगराखेरीजहि आग्रा, फत्तेपूरशिक्री, लखनौ, श्रीनगर या ठिकाणीं जगांत नांव दुमदुमेल अशा कलाकृति मुसलमान राजांनीं निर्माण करून आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेवलें आहे. असो.

हिंदुस्थानचा इतिहास उपलब्ध आहे तेव्हांपासून पाहिलें तरी सर्वांचेंच लक्ष या नगरीवर केंद्रीभूत झालें होतें. पुराणकालीं हिंदुस्थानावर आक्रमण करणारे लोक उत्तर दिशेकडून येत. हस्तिनापूर नि इंद्रप्रस्थ या पुराण्या राजधान्यांचा कीर्तिसौरभ फार प्राचीन कालापासून दिगंतीं दरवळून राहिला असल्यानें सहजच सर्वांचें लक्ष या राजनगरीवर रोखलें जाई आणि ज्याप्रमाणें घराचा उमरठा ओलांडून एकदा आंत प्रवेश केला म्हणजे अंतर्भागांत प्रवेश करणें सुलभ, त्याचप्रमाणें दिल्ली हातीं आली कीं हिंदुस्थानचे आपण चक्रवर्ति होऊं अशी कल्पना आणि ती तशी सत्यहि ठरलेली. अल्लाउद्दीन दिल्ली घेऊन दक्षिणेस अवघ्या ७।८ हजार स्वारानिशीं येतो काय आणि अवघी दक्षिण पादाक्रान्त करतो काय? याचा अर्थ दिल्ली घेतली कीं हिंदुस्थान मुठींत आलें असा आहे. आणि याच कारणासाठीं या नगरीचें नामकरणंहि देहली — उमरठा असेंच यथार्थत्वानें प्राप्त झालें आहे.

'देहली'चें वर्णन सन्त तुलसीदासांनीं असें केलें आहे—

रामनाम मनि दीपधरू जीह देहली द्वार !
तुलसी भीतर बाहिरो जो चाहसि उजियार ॥

( रामनाम रूपी दीपक जिव्हारूपी उमरठयावर-ठेवा म्हणजे अंतर्बाह्य तुम्ही प्रकाशित व्हाल. ) तुलसीदासजींनींहि उमरठा या अर्थानेंच देहली हा शब्द वापरला असून हें नांव पूर्णतः हिंदु आहे. असो.

## मुस्लीमांची सत्ता

पृथ्वीराजानंतर दिल्ली नगरींतील हिंदुगौरव नि सत्ता नष्ट झाली आणि त्या ठिकाणीं मुस्लीम सत्ता अवतीर्ण झाली. मुसलमानी सत्ता या राजनगरीवर स्थापन झाल्यापासून या नगरींत इतकें रक्त सांडलें आहे म्हणूनच या नगरीला रुधिरप्रिया, असें संबोधण्यांत येतें. मुसलमानी अमदानीचा सर्वच इतिहास रक्तरंजित व शोकजनक आहे. मुस्लीमांनीं धर्मद्वेषानें हिंदूंच्या रक्ताच्या सड्यांनीं ही भूमी जशी माखली तद्वतच राज्यलालसेनें वेडावून आपल्याच आप्तजनांच्या, बंधुवर्गांच्या माना चरचरा चिरण्यासहि त्यांनीं मागें पाहिलें नाहीं. मुसलमानांतील अकबर, जहांगीर, हे राजे सोडले तर बाकीचे रक्तपिपासू होते.

या नगरींत सन ११९३ ते १८०३ पर्यंत मुसलमानांनीं राज्य केलें. त्यांत ११९३ ते १५२६ पर्यंत पांच निरनिराळ्या वंशांनीं राज्य केलें. १५२६ ते १८०३ पर्यंत मोंगल वंश या नगरांत नांदला. या वंशाचा समूळ उच्छेद झाला १८५७ मध्यें. आज जुनी दिल्ली आणि लाल किल्ला म्हणून दिसतात त्यांची बांधणी केली शहाजहानानें. मोंगलांचे सर्वच राजे या नगरींत वास्तव्य करीत नसले तरी राजधानीचा मान त्यांनीं दिल्लीलाच दिलेला होता. अकबर बहुधा आग्र्याला वास्तव्य करी. शहाजहानाचें आग्रा हें तर प्यारें वास्तव्य-शहर असे. औरंगजेबाचें वास्तव्यहि अधूनमधून आग्र्याला असलें तरीहि राजधानी दिल्लीच असे. इतकेंच नव्हे तर मुस्लीम सम्राटांनीं आपलें वास्तव्य दिल्लीस न केलें तरी त्यांना राज्याभिषेक मात्र याच नगरांत होत असे ही गोष्ट ध्यानीं धरावयास पाहिजे. इंग्रजांनींहि हिंदी साम्राज्याच्या राजधानीचा मान याच नगरीला देतांना

केवढाले प्रचंड समारंभ, मिरवणुकी, दरबार केले नि मेजवान्या दिल्या ही गोष्ट तर अगदीं ताजी आहे. असें या नगरीचें माहात्म्य आहे. १८०३ पासून १९११ पर्यंत या नगरीला विधवेची कळा आलेली असली तरी नव्वद शंभर वर्षांनीं कां होईना त्या नगरीला राजधानीचा मान पुनः द्यावा लागलाच. अशी ही तिची दैवरेषा आहे !

पुराण काळीं दिल्ली नगरीला काय महत्त्व होतें, तेथील पृथ्वीस्तंभ ( कुतुबमिनार ), गरुडध्वज ( लोहस्तंभ ), विष्णुमंदिर ( कुतुबमशीद ), योगमायामंदिर, हीं हिंदूंचीं अवशेष स्मृतिस्मारकें कशीं होत हें मागील लेखांत सांगितलें. आतां या लेखांत इतिहासकालीन व विद्यमानकालीन वर्णन द्यावयाचें.

## चांदणी चौक

दिल्ली हें नांव उच्चारतांच तेथील प्रसिद्ध व भव्य जुम्मा मशिद व चांदणी-चौक चटकन नजेरसमोर येतो. या चांदणीचौकाच्या पूर्व टोकाला जैन मंदिर व पश्चिम दिशेला फतेपुरी नांवाची मशीद आहे. आणि या मंदिर-मशिदीमधील सुमारें चार फर्लांगाचा जो रस्ता त्यास चांदणीचौक असें म्हणतात. या रस्त्याला चांदणीचौक नांव पडण्याचें कारण असें कीं, पूर्वकालीं रस्त्याच्या दोहों बाजूंला पिंपळ व निंब यांचे वृक्ष असून रस्त्याच्या मधोमध पाण्याचा प्रवाह अखंड वाही, त्यामुळें सर्व रस्ता अत्यंत शीतल असे, म्हणून त्याला चांदणीचौक असें नांव पडलें. दिल्ली नगरांत हा रस्ता अत्यंत प्रमुख. इंग्रजांच्या ताब्यांत हें नगर आल्यावर त्यांनीं या रस्त्यावरील सर्व वृक्ष तोडून काढून पाण्याचा प्रवाहहि बंद केला. आतां त्यावर मोठें घडयाळवर व कारंजें मात्र दिसतें.

शहाजहान बादशहानें आजची जुनी दिल्ली नगरी, शहाजानाबाद नांवानें वसविली. सतत वीस वर्षें हें बांधकाम सुरू होतें. त्यानें जुम्मामशीद, लाल किल्ला—आजचा किल्ला, हीं ठिकाणेंहि बांधलीं. औरंगजेबाच्या वेळीं

या नगरांत तीस लक्ष लोकवस्ती होती असें सांगतात. दिल्ली नगरांतील या चांदणीचौकानें अनेक ऐतिहासिक घडामोडी अवलोकन केल्या आहेत. या रस्त्यावर रक्तमांसाचा चिखल झालेला व सहस्रावधि निरपराधी लोकांच्या कत्तली झालेल्या पाहिल्या आहेत. नादिरशहानें वीस हजार लोकांची कत्तल याच नगरींत केली. अनेक शीख वीरांना याच रस्त्यावर कंठस्नान घालण्यांत आलें व त्यांचें स्मारक गुरुद्वार तेगबहादुर या नांवानें अद्याप या रस्त्यावर खडें आहे. भाई परमानंदजी यांचे एक पूर्वज भाई मतिदास यांना त्यांच्या अलोट धर्मप्रेमाबद्दल याच ठिकाणीं डोक्यापासून करवतून काढलें. आणि १८५७ च्या क्रान्तियुद्धांत मेजर हॉडसन यानें मोगल राजपुत्रांना ठार मारून त्यांचीं प्रेतें याच रस्त्यावर आणून प्रदर्शिलीं. लॉर्ड हार्डिंज याची मिरवणूक ता. २१ डिसेंबर १९१२ रोजीं या रस्त्यावरून जात असतां याच चौकांत त्यांजवर कोणी बॉम्ब फेकला. असे अनेकविध देखावे या रस्त्यानें पाहिले आहेत.

हें जसें रस्त्याचें भयानक स्वरूप त्याचप्रमाणें दिल्ली नगरीच्या लक्ष्मीचें निवासस्थान म्हणूनहि याच रस्त्याला मान द्यावा लागेल. यावरील जैन मंदिर तर प्रसिद्ध आहे व तें फार प्रेक्षणीयहि आहे.

चांदणीचौकाइतकेंच महत्वाचें व सुंदर स्थान म्हणजे जुम्मा मशीद होय. जुनी दिल्ली व लाल किल्ला यांच्यामधील उंचवटयावर ही बांधली असल्यानें जणूं उन्नत मस्तक करून सर्व शहरावर ती देखरेखच करीत आहेसें वाटतें. ही बांधण्यास शहाजहानानें सन १६५० मध्यें प्रारंभ केला. व पुढें सन १६५८ मध्यें औरंगझेबाच्या कारकीर्दींत ती पुरी झाली. ही बांधण्यास पांच हजार गवंडी सारखे खपत होते. ही सर्व मशीद लाल दगडांनीं व शुभ्र संगमरवरांनीं बांधून काढलेली आहे. या मशिदीला १३० फूट उंचीचे दोन प्रचंड मिनार आहेत. ते चढून वर जाण्याला १३० पायऱ्या केलेल्या आहेत. या मशिदीला एकंदर तीन दरवाजे असून त्यांपैकी पूर्वाभिमुखी असलेला दरवाजा सर्वांत विशाल आहे. तीनहि बाजूंनीं सुंदर पायऱ्या बांध-

 ग्रं. १६८

लेल्या आहेत. या मशिदीची दुरुस्ती १८१७, १८५१ व १९०० या वर्षी करण्यांत आली. दिल्लीच्या आवतीभोवती पसरलेल्या रमणीय इमारतींप्रमाणेंच ही इमारतहि अत्यंत प्रेक्षणीय आहे. मोगल बादशहा प्रतिशुक्रवारीं येथे प्रार्थनेस येत. या मशिदींत ईदच्या दिवशीं एक उंट बळी दिला जाई. महंमद पैगंबर याच्या पायांतील पादत्राण येथें एका खोलींत ठेवण्यांत आलें आहे.

## मोगल आणि मराठे

मराठ्यांचा संबंध औरंगझेबापासूनच दिल्लीशीं आलेला असला तरी त्या कालीं मोगली सत्ता वरचढ होती. पुढे औरंगझेबानंतर जे मोगल बादशहा झाले त्यांच्याशीं मराठ्यांचा प्रथम बरोबरीच्या नात्याचा संबंध आला आणि अखेरीस तर मोगल बादशहा मराठ्यांचे अंकित म्हणूनच नांदले ते थेट दिल्ली पादाक्रांत होईपर्यंत, म्हणजे स. १८०३ पर्यंत. सुमारें पावशतक तर तेथें मराठे सत्ताधारीच होते; परंतु असें असूनहि मराठी सत्तेची तेथे नांव-निशाणीहि नाहीं याचें मोठें आश्चर्य वाटतें. शिंद्यांशीं लढून इंग्रजांनीं दिल्ली घेतल्यानंतर बायजाबाई शिंदे यांचे बंधु हिंदुराव घाडगे यांचें वास्तव्य कांहीं काल दिल्लीलाच होतें असें दिसतें आणि त्यांच्याच नांवानें आज तेथें हिंदु-राव हॉस्पिटल प्रसिद्ध आहे. याशिवाय नगराच्या पूर्व बाजूस किल्ल्याशेजारीं गौरीशंकराचें एक सुंदर मंदिर आहे तेंहि मराठ्यांचें आहे असें म्हणतात. परंतु हें मंदिरहि मराठी सत्ता तेथें असतांना बांधलेलें नसून इ. स. १८३० च्या सुमारास बांधलेलें आहे. याचाहि संबंध हिंदुराव घाडग्यांशीं नसेलच असें म्हणवत नाहीं. लाल किल्ल्यांत जो प्रचंड चित्रसंग्रह आहे त्यांत १८५७ च्या क्रांतियुद्धांत इंग्रजांनीं केलेल्या पराक्रमाचे अनेक देखावे आहेत; त्यांतच हिंदुराव यांचींहि दोनतीन चित्रें ठेविलीं आहेत; त्यावरून तो गृहस्थ मोठा शूर असावा असें दिसतें.

'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो' असें एका काळीं दिल्लीचें माहात्म्य वर्णिलें जात असे. परंतु शिवछत्रपतींनीं या समजुतीला धक्का देऊन मोगली सत्तेशीं

टक्कर देण्यास सुरुवात केली आग्र्यास प्रत्यक्ष जाऊन दिल्लीपतीची नाडीपरीक्षा जातीनें केली आणि मोगली सत्तेविषयीं जी एक धडकी देशांत भरली होती ती धुक्याप्रमाणें उडवून दिली. पुढें औरंगजेबानंतर तर ' मराठा बोले व दिल्ली हाले ' अशीच स्थिति उत्पन्न झाली. बाळाजी विश्वनाथानें खुद्द नगरांत जाऊन बादशहाच्या दरबारांतून चौथाई सरदेशमुखीच्या सनदा आणल्या आणि वस्तुतः त्याच क्षणीं मोगलांनीं मराठ्यांचें आधिराज्य मान्य केलें. यानंतर राघोबानें दिल्लीच काय पण लाहोर अटक येथपर्यंत आपले शागीर्द पेरून ठेवले. मराठ्यांपुढें मोगलच काय पण हिंदुस्थानांतील सर्वच लहानमोठे राजे नतमस्तक झाले आणि हें शल्य काढण्यासाठीं म्हणून कीं काय कांहीं मोगली सरदारांनीं अहमदशहास हिंदुस्थानावर स्वारी करण्यास आमंत्रण दिलें. या युद्धांत मराठ्यांना हार खावी लागली असली तरी अल्पावधींतच त्यांनीं आपलें आसन पुनः सांवरलें. सदाशिवराव भाऊंनीं तर खुद्द लाल किल्ला काबीज करून मोगली तख्तावरील छत काढून घेतलें. पुढें पानपतानंतर मोगल बादशहांस कोणीच त्राता नाहींसा झाला.

नादीरशहानें दिल्लींत अमानुष कत्तल करून अमूल्य असें मयूरसिंहासन नेलें. शिवाय कोट्यावधि रुपयांची लूट नेलीच. अहमदशहानें १७५७ मध्यें पुनः दिल्ली मनसोक्त लुटली. आणि पानिपतानंतर गुलाम कादर नांवाच्या एका रोहिला क्रूरकर्म्याच्या हातीं तेथील सत्ता गेली आणि तेथें 'त्यानें जे राक्षसी प्रकार केले त्यामुळें कोणाच्याहि अंगावर शहारे येतील. बादशहा शहाआलम याचे त्या अधमानें दोन्ही डोळे फोडून त्याच्या खांचा केल्या. राजस्त्रियांची अत्यंत हीन अशी विटंबना केली. या राक्षसाच्या हातून मराठावीर महादजी शिंदे यांनींच त्या अंध बादशहाची मुक्तता करून त्याचें शेष आयुष्य निर्वेध केलें. पानिपतानंतर मराठी सत्ता उत्तरेंतून नष्टप्राय झाली अशी प्रायः समजूत आहे, परंतु ती सर्वथा खोटी आहे. मराठ्यांनीं आपलें पूर्ववैभव पुनः प्राप्त करून घेतलें. सतलजपर्यंत आपला अंमल बसविला. पतियाळापर्यंत स्वाऱ्या नेल्या.

शहाअलमच्या राजवटीचें वर्णन आजहि लोकांच्या तोंडी पुढीलप्रमाणें आहे. “ अज दिल्ली ते पालम बादशाही शहा अलम ” म्हणजे दिल्लीपासून पालमपर्यंत शहाअलमची सत्ता आहे. पालम नांवाचें एक खेडें दिल्लीपासून दहा मैलांवर आहे. यावरून मराठयांच्या हातीं दिल्लीचा कारभार आल्यानंतर मोगली बादशाही नष्ट होऊन मराठी सत्ता तेथें स्थापन झाली असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अस्तु.

## लाल किल्ला

जुम्मा मशिदीनंतर महत्वाचें ठिकाण म्हणजे लाल किल्ला लागतो. या किल्ल्याचा इतिहासांशीं इतका संबंध आलेला आहे कीं त्याचें स्वतंत्रच वर्णन करावें लागेल व तें करण्याला पुरा स्थलावकाश नाहीं. हा किल्ला शहाजहान बादशहानें स. १६३९ ते १६४८ या दहा वर्षांत दोन कोटी रुपये खर्चून बांधला. हा यमुना तीरावर असून त्याची दक्षिणोत्तर लांबी ३००० फ़ूट व रुंदी १८०० फ़ूट आहे. त्याची तटबंदी यमुनेच्या बाजूला ६० फ़ूट उंच व जमिनीकडे ११० फ़ूट आहे. या किल्ल्याभोवती ७५ फ़ूट रुंद व ३० फूट खोलीचा प्रचंड खंदक असून सभोवार सुंदर बाग केलेली होती. आतां खंदक पार बुजवून टाकला असून सर्व ओसाड केलेलें आहे. किल्ल्यांतील राजवाड्यांतहि अनेक खून रक्तपात झालेले आहेत. दिवाण-इ-आम, दिवाण-इ-खास, नौबतखाना, शहाबुर्ज, हयातबक्ष बाग, नहर-इ-बिहिस्त, नंदनवनांतील प्रवाह इत्यादि ठिकाणें अत्यंत प्रेक्षणीय आहेत.

नंदनवन, दिवाण-इ-खास हा महाल तर फारच प्रेक्षणीय आहे. त्यांवरील छताच्या एका बाजूला ‘ जगांत कोठें नंदनवन असेल तर तें हें आहे, हें आहे, हेंच आहे ’ असें अरबींत उद्गार खोदले आहेत ते यथार्थ वाटतात.

शहाजहान बादशहा अत्यंत विलासी, धनबलसंपन्न आणि कलेचाहि भोक्ता असल्यानें त्यानें भूतलावर स्वर्गच जणूं उतरविला आहे. तेथील रंगमहाल, गुलाबजल विहार स्थलें इत्यादि सर्वच गोष्टी प्रेक्षणीय आहेत.

मोगल बादशहानें हरप्रकारच्या रत्नामध्यें, नाना प्रकारच्या रंगीबेरंगी सुशोभित वेलपत्त्या, त्यांत आकर्षकपणें बसविलेले पशुपक्षी — एक ना दोन कशाचें म्हणून वर्णन करावें? सर्वच अपूर्व. वेलपत्ती सोन्याची, त्यांत पांच माणकें बसविलेलीं, कमानीवर मोत्याच्या झालरी सुटलेल्या अशी लक्ष्मी हात जोडून उभी होती. आणि हें वैभव पाहूनच परस्थांचे डोळे फुटत. औरंगझेबापर्यंत मोगलांनीं लक्ष्मीला बंदिवान करून ठेवली; परंतु पुढें मोगली लक्ष्मीचे हालहाल झाले. ब्रिटिश अमदानींत तर गोऱ्या लष्कराचा तळच या भव्य नि सुंदर इमारतींत असे. भटारखानाहि तेथेंच. लॉर्ड कर्झननें या किल्ल्याची दुर्दशा पाहून तथून सैन्य उठविलें व त्याची वेगळ्या बराकींत सोय करून दिली म्हणून आज इतकें तरी दृष्टीस पडतें. किल्ल्यांतच मोतीमशीद, मुमताझ महाल हीं ठिकाणेंहि प्रेक्षणीय आहेत. या किल्ल्यानें वैभव जसें अपार भोगलें तसे त्याला दुर्दिनहि पाहावे लागले. इंग्रजांनीं १८५७ सालीं दिल्ली व किल्ला हस्तगत केला. हुमायुनाच्या थडग्यांत बादशहा बहादुरशहा लपून बसला होता त्यास सहकुटुंब कैद केलें. त्याची चौकशी दिवाण-इ-खासमध्यें जेथें तो न्यायाधीश म्हणून असावयाचा त्याच ठिकाणीं, तीस दिवस चालून त्यास अखेर रंगून येथें हद्दपार करण्यांत आलें!

किल्ल्याच्या बाहेर अनेक शोभिवंत इमारती पाहण्याजोग्या आहेत. त्यांत अशोक लाट, जंतरमंतर, सफदरजंगाचें थडगें, रोशनाराबाग इ. आहेत.

## इंग्रजांची सत्ता

इतिहासकालापासून आतांपर्यंत दिल्ली नगरी अनेकांचे हातीं गेली. लॉर्ड लेक यानें स. १८०३ सालीं दिल्ली शिंद्यांपासून लढून घेतली. त्याचवर्षी शिंद्यांशीं लासवारीची लढाई होऊन शिंद्यांनीं दिल्ली, आग्रा, मथुरा व दिल्लीच्या उत्तरेकडील प्रांतांवरील आपलें स्वामित्व सोडलें. सन १८०२ मध्यें बाजीराव पेशवा इंग्रजांचा मांडलिक झाला. तेव्हांपासून मराठी साम्राज्याला ग्रहण लागलें व उत्तरेकडील मराठ्यांचें राजकारणहि नामशेष झालें. १७५७ मध्यें म्हणजे प्लासीची लढाई झाल्यानंतर एका शतकांत इंग्रजांनीं

सर्व भारतवर्ष आपल्या सत्तेखालीं आणला. पुढें १८७७ सालीं लॉर्ड लिटन यानें दिल्लीस मोठा दरबार भरविला. सन १९०३ मध्यें लॉर्ड कर्झन यानेंहि दिल्लीसच दरबार भरवून ब्रिटिश सत्ता नि वैभव यांचें प्रदर्शन केलें आणि अखेरीस सन १९११ सालीं सरकारनें दरबार भरवून दिल्ली ही भारतीय साम्राज्याची राजधानी केल्याचें प्रसिद्ध केलें.

परंतु इंग्रजांनीं मोगलांच्या दिल्लीस मात्र राजधानीचा मान न देतां जुन्या दिल्लीच्या दक्षिणेस रायझाना व इतर खेडीं पसरलीं होतीं तो भाग नव्या राजधानीसाठीं पसंत केला. राजधानीची जागा लॉर्ड हार्डिंज यांनीं पसंत केली. हल्लीं ज्या ठिकाणीं व्हाइसराय यांचा भव्य प्रासाद उभा आहे त्याच्या नजीक प्रसिद्ध धर्मवीर गुरु तेजबहादुर यांची समाधि आहे आणि असें सांगतात कीं, स. १३९१ मध्यें तैमुरलंगानें जेव्हां दिल्लीवर हल्ला चढविला तेव्हां याच ठिकाणीं त्याचा तळ पडला होता आणि एक लक्ष हिंदूंचा वध करून त्यांच्या मुंडक्यांचे बुरूज रचविले ते त्यानें तेथूनच पाहिले. असो ही जागा पसंत केल्यानंतर नव्या राजधानीच्या उभारणीस सुरुवात झाली.

## नवी दिल्ली


आजची नवी दिल्ली हें या टापूंतील आठवें नगर होय. हें दक्षिणोत्तर असून या शहराच्या दक्षिण बाजूस व्हाइसरॉय प्रासाद, चिटणिसी खातें, दोन्ही लोकसभा, प्रिन्सेस चेंबर इत्यादि भव्य इमारती आहेत. हें नगर बांधण्यास २९ हजार मजूर सतत १८ वर्षे खपत होते. हे २९ हजार मजूर खुद्द नगर बांधणीच्या कामावरील. त्याखेरीज विटा पाडणारे, दगडाच्या खाणींत काम करणारे वेगळेच. या बांधकामास १५ कोटी खर्च झाले आहेत. यावरून त्याच्या भव्यतेची नि विस्ताराची कल्पना येईल. यांतील मुख्य इमारती फार भव्य सुंदर करण्यांत आलेल्या असून भरतपूर धोलपूर, जोधपूर, बडोदा, जैसलमीर, कोटा इत्यादि अनेक संस्थानांतून रंगीबेरंगी

संगमरवर मुद्दाम आणवून त्याचें बांधकाम केलें आहे. एकंदर एक लक्ष घनफूट संगमरवर उपयोगांत आणला असून इमारतीला विटा इतक्या लागल्या आहेत कीं त्या एकापुढें एक मांडल्या तर पृथ्वीला चार वेढे पडतील.


सरकारी इमारतीच्या उत्तर अंगाला शहर वसविण्यांत आलें आहे. सर्व शहराची मांडणी प्रमाणबद्ध, आकर्षक आहे. जागोजाग मोठमोठीं मैदानें व छोटयामोठ्या सुंदर बागा मधून मधून राखून ठेवल्या आहेत. या नगरांतील राजरस्तेहि भव्य असून त्यांची लांबीच सुमारें ५० मैल आहे. या रस्त्यांनाहि पृथ्वीराज, अशोक, अकबर, फेरोजशहा, पेशवे, शिंदे अशी नांवें देण्यांत आली आहेत. या नव्या दिल्लीच्या पश्चिम बाजूस रिज नांवाचा उंचवटा आहे. याला लागून रेडिंग रोड आहे. या रस्त्यावर हिंदु महासभा भवन, शे. बिर्ला यांनी बांधलेलें राधाकृष्ण मंदिर, बुद्ध मंदिर, काली मंदिर हीं हिंदु समाजाला पूजनीय वाटणारीं मंदिरें असून विद्यार्थ्यांसाठीं शाळाहि याच रिजवर आहेत. या सर्व मंदिरांना सुप्रसिद्ध दानशूर व हिंदुधर्माचे अभिमानी श्री. जुगुल किशोरजी बिडला यांनीं लक्षावधि रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. त्यांत हिंदुसभा भवन त्या शेजारील राधाकृष्ण मंदिर हीं इतकीं शोभिवन्त व भव्य आहेत कीं नव दिल्लींत त्यांच्याइतक्या सुंदर इमारती फार थोडया आहेत. हिंदुसभा भवन हें रिजवर असून त्याच्या एका बाजूस पश्चिम-पूर्व दिशेस शिंदे रस्ता व दुसऱ्या बाजूस पेशवे रस्ता आहे. या दोन्ही मंदिरांत प्राचीन हिंदुकला उत्कृष्ट रीतीनें प्रकट केलेली असून त्यासाठीं बिर्लाशेठजींनीं लाखों रुपये खर्च केले आहेत.

## नव्या दिल्लींतील इमारती

जुन्या व नव्या दिल्लींत अनेक सुंदर व प्रेक्षणीय इमारती आहेत. नव्या दिल्लींतील व तिच्या आवतीभोवती असणाऱ्या इमारतींचें थोडक्यांत वर्णन केलें. आतां नव्या दिल्लीकडे पाहूं. नव्या दिल्लींत अत्यंत मोठा चौक ' कॅनॉट सर्कस ' या नांवानें प्रसिद्ध आहे. याच्या मधोमध विस्तृत हरित-



दिल्लीची जुम्मा मशीद.



दिल्ली येथील मध्यवर्ति असेंब्लीचें सभागृह.

तृणांकित मैदान असून, सभोवार मोठमोठ्या इमारती आहेत. नव्या नगराचा मुख्य बाजार हाच. याशिवाय प्रेक्षणीय इमारती म्हणजे सरकारी. त्यांत हिंदी पार्लमेंटाची इमारत ही सुंदर असून वर्तुलाकार आहे. या इमारतीला २७ फूट उंचीचे १४४ स्तंभ आहेत; आणि या इमारतींत ले. असेंब्ली, स्टेट कौन्सिल व प्रिन्सेस कौन्सिल अशीं तीन वेगळालीं दालनें असून, यांत अनुक्रमें ४००, २०० व १२० सभासद बसण्याची योजना केली आहे. याशिवाय मध्यंतरी एक मोठा दिवाणखाना असून त्यांत प्रसंगीं राजदरबार भरविण्याची योजना आहे. या तीनहि सभागृहांशिवाय प्रत्येक सभागृहाला जोडून कमिटी रूम्स आहेत.

यच्या लगतच सेक्रेटॅरिएट ही इमारत आहे. तिच्यांत दक्षिण व उत्तर असे दोन विभाग केले असून, या दोनहि भागांत जमिनीपासून २१७ फूट उंचीचे दोन घुमट बसवले आहेत. यांच्या प्रवेशद्वारावर "Liberty will not descend to a people, a people must rase themselves to Liberty" Honour the State, the Root of Law and Weal" अशीं वाक्यें खोदलेलीं आहेत. सेक्रेटॅरिएटमध्यें सुमारें एक हजार स्वतंत्र भाग पाडले आहेत. त्यांच्या नुसती सज्जांची लांबीच ८ मैल भरेल. ही इमारत अत्यंत सुंदर केली असून, त्यांत पुराणांतील विविध प्रसंग, इंद्राच्या दरबारांतील पऱ्या, गायन, नृत्य, काव्य यांसंबंधींचीं चित्रें, एका महालांत—( कमिटी रूम 'बी'.) सहाहि ऋतूंचीं चित्रें चित्रिलीं आहेत. याखेरीज विद्या, शांति, युद्ध व न्याय यांचीं दिग्दर्शक चित्रेंहि रंगविलीं आहेत. एकांत चातुर्वर्ण्यदर्शक व हिंदुस्थानांत प्रत्येक प्रांताचें वैशिष्ट्यदर्शक चित्रें रेखाटलीं आहेत.

तिसरी महत्वाची इमारत म्हणजे व्हाइसरॉयाचा प्रासाद. ही इमारत जगांतील अत्यंत दर्शनीय इमारतींपैकीं एक आहे असें म्हणतात. त्यांतील भव्य स्तंभ, विस्तीर्ण दिवाणखाने, सहस्र—मुखांनीं उडणारीं कारंजीं, सदैव प्रफुल्लित असणारी बाग, सर्वच आकर्षक आहेत. या वाड्यानें ३३० एकर

क्षेत्र व्यापलें आहे. त्यांत ३४० महाल, २२७ प्रेक्षणीय स्तंभ, ३७ कारंजीं, १७ विजेचे पाळणे वगैरे सर्व सुखसोयी अद्यावत् आहेत.

सरकारी इमारतीकडे जाण्याचा मुख्य रस्ता पूर्वपश्चिम आहे. या रस्त्यावर उत्कृष्ट पुष्करणी असून, दिल्ली राजधानी झाल्यापासूनच्या व्हाइसरॉयांचे पुतळे या रस्त्यावर उभे केले आहेत. येथील देखावा फारच चित्ताकर्षक आहे. दिल्लीच्या इमारतींत एक गोष्ट दृष्टीस पडते, ती ही कीं, तेथील मोठमोठ्या सर्व इमारतींना लाल दगड वापरला आहे. त्या भागांत तो विपुल सांपडतो. पृथ्वीराजाचा ' लाल कोट ' लाल दगडाचा; शहाजहानाचा लाल किल्ला व जुम्मा मशीद लाल दगडांचीं; त्याचप्रमाणें नव्या इमारतींलाहि लाल दगडच विशेषेंकरून वापरला आहे.

दिल्ली ही अर्वाचीन भारताची राजधानी झाल्यामुळें तीस अखिल भारतीय महत्व प्राप्त झालें आहे आणि हिंदुत्वाला पोषक अशीं स्मृतिचिन्हें या आठ राजधान्यांच्या ७० मेल चौरसांच्या क्षेत्रफळांत असंख्य विखुरलीं असल्यानें हिंदुमात्रास या नगराबद्दल एकप्रकारची आत्मीयता वाटते आणि एवढ्यासाठीं जुन्या व नव्या दिल्लीचें दर्शन घडविण्याचा अल्पसा प्रयत्न येथें केला आहे.

---

# ४ श्रीक्षेत्र काशी येथील महाराष्ट्रीय समाज

उत्तर हिंदुस्थानांत मराठी सत्ता वृद्धिंगत होत गेली तीबरोबर महाराष्ट्रीयांच्या वसाहतीहि वाढत गेल्या. मराठी सत्तेच्या वृद्धीबरोबर महाराष्ट्रीयांची वस्ती विशेषेंकरून वाढली असेल तर ती शहाजीराजांच्या कारकीर्दींत द. हिंदुस्थानांत तंजावर वगैरे भागांत; नंतर पेशवाईमध्यें माळवा, बुंदेलखंड, मध्यप्रांत येथपर्यंत, महाराष्ट्रीयांच्या वसाहती झाल्या. शेवटचे रावबाजी ब्रह्मावर्तीं गेल्यानंतर त्यांच्याबरोबर बरींच महाराष्ट्रीय घराणीं तेथें

स्थायीक झालीं; परंतु सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर तेथील वस्ती उठू लागून आज ब्रह्मवर्तामध्यें ४१५ महाराष्ट्रीय घराणीं व तींहि अगदीं विपन्नावस्थेला गेलेलीं आढळतात. राजसत्तेचा आधार असल्याखेरीज परप्रांतीं वसाहती करणें व त्या टिकविणें केव्हांच घडत नाहीं.

## पुण्यक्षेत्र काशी

परंतु श्रीक्षेत्र काशीची स्थिति मात्र अशी नाहीं. पुरातन कालापासून पुण्यक्षेत्र म्हणून आसेतुहिमाचल गाजलेले, काशीस जावें नित्य वदावें, इतका काशीक्षेत्रीं जाण्याचा हिंदुमात्रास हव्यास, निदान माझीं हाडें तरी काशीस पडोत, अशी त्या पुण्यधामाविषयी धर्मभावना. हिंदुमात्रास काशीधामाबद्दल इतकें अलोट भक्तिपूर्ण प्रेम अनादि कालापासून आहे व आयुष्यांत एकदां तरी तेथील परमपावन जान्हवीचें स्नानपान होऊन सर्व पातकांचें विसर्जन करावे अशी भावना आजतागायतहि आस्तिक हिंदुस्थानांत आढळून येते. यामुळें असें हें एकच क्षेत्र आहे कीं, राजसत्तेचा पाठिंबा अगर आधार नसतांहि महाराष्ट्रीयांनीं तेथें सुमारें एक हजार वर्षांपूर्वींपासून वस्ती केली व नुसती वस्ती केली एवढेंच नाहीं तर आपल्या विद्वत्तेनें त्या पुण्यधामाचा महिमा वाढविला व तो लौकिक त्यांनीं आजतागायतहि टिकविला आहे. हिंदुस्थानांत वैदिक विद्वत्तेचीं जीं थोडीं केंद्रें समजलीं जातात त्यांत श्रीक्षेत्र काशी नगरीला आग्रमान दिला जातो व तेथील पंडितांच्या कसोटीस विद्वान पटला म्हणजे त्याचा गौरव सर्व देशभर होतो.

## आद्य महाराष्ट्रीय रहिवासी

अशा या क्षेत्रांत सुमारें एक हजार वर्षांपूर्वीं महाराष्ट्रीयांनीं प्रवेश करून आपल्या विद्वत्तेनें व सदाचारानें आपली छाप तेथें बसविली. सर्वांआधीं काशी क्षेत्रीं कोण महाराष्ट्रीय गेले हें आज ठामपणें सांगतां येणें कठीण असले तरी संवत ९३६ च्या सुमारास महाराजा यशपाल यांच्या वेळीं पंचगंगा येथें राहणारे वनकटे पुराणिक व धर्माधिकारी नांवाचीं दोन महाराष्ट्रीय

घराणीं तेथें होतीं. महाराज यशपाल यांनीं धर्माधिकारी घराण्याला षोडश संस्कारांचा संपूर्ण अधिकार दिला होता. पुराणिक व धर्माधिकारी हीं घराणीं एकमेकांचे पुरोहित आहेत. यावरून प्रथमतः हीं दोनच घराणीं तेथें गेलीं असावींत असा अंदाज आहे. धर्माधिकाऱ्यांच्या कुलांतच महिपति नांवाचे सत्पुरुष होऊन गेले. हे विद्वान्, तपस्वी, तेजस्वी व धर्मशास्त्रकोविद असल्यानें यशपालानें त्यांना षोडष संस्कारांचे सर्वाधिकार दिले. परंतु त्यांनी अंत्येष्टी संस्काराचा अधिकार दुसऱ्या एका कुलाला देऊन टाकला.

## अनंगपालाचा ताम्रपट

यानंतर दुसरें प्रसिद्ध व पुरातन घराणें म्हणजे श्री. कोंडभट पाठक यांचें होय. हे कोंडो पाठक इंद्रप्रस्थाचे महाराज अनंगपाल यांचे समकालीन असून अनंगपाल यांनीं कोंडो पाठक यांना काशीच्या सर्व तीर्थांच्या पौरोहित्याच्या अधिकाराचा ताम्रपट दिला. कोंडो पाठक यांजकडे नर्मदेच्या पलीकडील काशी, गया, प्रयाग आदि सर्वश्रेष्ठ क्षेत्रांच्या पौरोहित्याचा अधिकार व देवतीर्थ मंदिरादि संस्थानांत एकचतुर्थांश भागाचा अधिकार त्यांच्याकडे होता. परंतु कोंडो पाठक अत्यंत विरक्त असल्यानें त्यांनीं या अधिकाराचा फारसा उपभोग घेतला नाहीं व गंगाकांठच्या दक्षिणेचा हक्क त्यांनी गंगापुत्रांना ( पंडे ) देऊन टाकला. पंचवीसतीस वर्षांपूर्वी काशी येथील गंगापुत्रांनीं महाराष्ट्रीयांस या क्षेत्रांत वृत्तीचा हक्कच नाहीं असा वाद उपस्थित केला होता. हा वाद बराच रंगला व त्या वादांत महाराष्ट्रीयांतर्फे जो महत्त्वाचा पुरावा सादर करण्यांत आला त्यांत इंद्रप्रस्थींचे महाराज अनंगपाल यांच्या ताम्रपटाचा पुरावा दाखल करण्यांत आला होता. त्यावरून त्या क्षेत्रांत महाराष्ट्रीयांचा हक्क कायदेशीरपणें सिद्ध झाला.

## दिग्विजयी महाराष्ट्रीय पंडित

महाराष्ट्रीयांचा लौकिक यानंतर एकसारखा वाढतच गेला. विद्वत्ता, निस्पृहता या गुणांत महाराष्ट्रीयांचा हात धरणारा आर्यावर्तांत कोणी नाहीं

इतकें वैभव त्यांनीं आपल्या गुणांवर प्राप्त करून घेतलें. संवत १३४७ मध्यें श्री. मुद्गलाचार्य या महाराष्ट्रीय पंडितानें मणिकर्णिका घाटांवर मोठा यज्ञ करविला. त्यांत अग्रपूजेचा मान ज्ञानदेवीकर्ते ज्ञानेश्वर महाराज यांना तेथील सर्व ब्रह्मवृंदांनीं दिला होता. या गोष्टीस ऐतिहासिक आधार किती आहे हें सांगता येणें कठिण असलें तरी त्याकाळीं महाराष्ट्रीय पंडित किती इभ्रतीनें वागत होते ही गोष्ट प्रत्ययास येईल.

काशीच्या महाराष्ट्रीय पंडितांमध्यें शेष, भट्ट, पायगुंडे आदि दिग्विजयी पंडित घराणीं होऊन गेलीं. त्यांत भट्टवंश तर फारच प्रसिद्ध आहे. या भट्ट घराण्यांत श्रेष्ठ पुरुष श्री. नारायण भट्ट यांचा जन्म संवत १५७१ मध्यें झाला. अकबर बादशहाची यांच्यावर फार भक्ति असे. यांच्यासंबंधानें अशी एक दंतकथा रूढ आहे कीं, एकदा अनावृष्टीमुळें हाहाःकार उडाला असतां अकबरानें यांची प्रार्थना केली. तेव्हां नारायणभट्ट यांनीं श्रीशंकराची प्रार्थना केली व त्याबरोबर सर्वत्र पाऊस पडून आबादीआबाद झालें. स. १६०० च्या सुमारास नारायणभट्टांनींच राजेरजवाड्यांचें साहाय्य घेऊन श्रीविश्वेश्वराचें प्रचंड मंदिर बांधलें व त्यांत नर्मदेंतून आणिलेल्या लिंगाची स्थापना केली. आजच्या मंदिरापूर्वीचें मंदिर आज कार्मायकेल लायब्ररीजवळ जो उंचवटा आहे त्या जागीं होतें असें बनारस गॅझेटियरवरून दिसतें. हें जुनें मंदिर शहाबुद्दीन घोरी यानें संवत ११९४ मध्यें उच्छेदिलें. तेव्हां श्री. नारायणभट्टांनीं संवत १६०० मध्यें पुनः विश्वेश्वराची नव्यानें प्राण-प्रतिष्ठा केली.

नारायण भट्टावर राजा तोडरमल व इतरहि मुसलमान सरदारांची भक्ति होती. त्यांनीं केलेला नारायण भट्टी हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांच्या वंशांत रामकृष्ण भट्ट, शंकर भट्ट, दिनकर भट्ट, कमलाकर भट्ट, लक्ष्मण भट्ट, नील-कंठ भट्ट, विश्वंभर भट्ट ऊर्फ गागा भट्ट इत्यादि अनेक सुप्रसिद्ध विद्वान होऊन गेले. यांनीं संस्कृत वाङ्मयांत पुष्कळच भर घातलेली आहे. व्यव-हारमयूख, दिनकरोद्योत, निर्णयकमलाकर, निर्णयसिंधु, गागाभट्टी, भट्ट

चिंतामणी, शिवराजप्रशस्ति इत्यादि त्यांचे ग्रंथ सर्वमान्य झालेले आहेत.

तेथील स्थानिक महाराष्ट्रीयांचा लौकिक कस्तुरीपरिमलाप्रमाणें सर्व दिशा व्यापून राहिल्यानें दशदिशांकडून विद्यार्थिभृंग विद्यामृतपानासाठीं सोत्कंठतेनें या ठिकाणीं जाई. त्याचप्रमाणें आपल्या विद्येचें कौतुक काशीच्या पंडितांनीं करावें या आशेनें सर्व भारतवर्षांतून पंडितवर्ग तेथें लोटे. संवत् १६२७ मध्यें एकनाथमहाराजांनीं एकनाथी भागवत लिहिलें. त्यांच्या ग्रंथाच्या नगर-मिरवणुकी निघून त्यांचा जयजयकार झाला व त्यांजवर पुष्पवृष्टि झाली. संवत् १६४५ च्या सुमारास एकनाथांचे पुत्र पं. हरिशास्त्री तेथें गेले, त्यांनींहि तेथे दिग्विजय केला. याच सुमारास मधुसूदनसरस्वती नांवाचे महाराष्ट्रीय पंडित होऊन गेले. त्यांनीं केलेले मधुसूदनी, सिद्धान्तविवेक, अद्वैत-सिद्धिसंक्षेप, शारीर भाष्य इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

## शिवकालानंतर

संवत् १६८९ च्या फाल्गुन मासांतील शुद्ध पक्षांत श्रीसमर्थ रामदासस्वामी तेथें गेले. तेथील हनुमान घाटावर हनुमानाची मूर्ति नव्हती ती त्यांनीं स्थापिली व तेथें मठ स्थापन करून तो शिष्य रामचंद्र यांच्या स्वाधीन केला. श्रीशिवाजीमहाराजांनीं आपली आग्र्याहून सुटका करून घेतल्यानंतर ते दक्षिणेकडे परतले तेव्हां वाटेंत या क्षेत्रीं जाऊन गंगास्नान दानधर्म करून दक्षिणेंत गेले. शिवभारत परमानंदानें येथेंच सिद्ध केलें. शिवाजी-महाराज श्रीक्षेत्रीं गेले होते त्या वेळीं विश्वेश्वराचें मंदिर औरंगजेबानें विध्वंसिलें नव्हतें तें कार्य त्यानें मागाहून केलें. यांनंतर पेशवाईत या क्षेत्राशीं पेशव्यांचा अनेक कारणांनीं संबंध येऊं लागला. पेशव्यांच्या कार्याचा व्याप उत्तरेकडे वाढू लागला. तेव्हां अर्थातच उत्तरेकडील या प्रसिद्ध क्षेत्रीं त्यांचा व्यवहार होऊ लागला यांत नवल नाहीं. पेशव्यांचे गुरु नारायण दीक्षित पाटणकर ( कायगांवकर ) हे महान तेजस्वी, तपस्वी विद्वान पुरुष होते. त्यांनीं १७५१ च्या सुमारास काशीवास केला. उत्तरेकडील राजकारण

त्यांच्या सल्लामसलतीनें चाले. उत्तरदिग्गज शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, नागपूरकर भोसले यांचाहि संबंध या क्षेत्राशीं येऊ लागला. क्षेत्राला भूषण-भूत असे लांब लांब व सुंदर घाट या मराठे वीरांनीं बांधले. आपल्याला राहण्यासाठीं मोठमोठे भव्य वाडे मराठे सरदारांनीं बांधले. अनेक अन्नछत्रें उघडली व येणेंकरून महाराष्ट्रीयांचा लौकिक या क्षेत्रीं दुमदुमून सोडला. परंतु झाली नाहीं एक गोष्ट. काशीनगरचें पारतंत्र्य त्यांना दूर करतां आलें नाहीं ! विद्वत्तेच्या बाबतींत मात्र आपला लौकिक या क्षेत्रांतील महाराष्ट्रीयांनीं अबाधित टिकविला. बालसरस्वतीसारखीं रत्नें पुढील पडित कालांतहि चमकून गेलीं व आजहि पं. राजेश्वरशास्त्री, लक्ष्मणशास्त्री, वे. शा. सं. रटाटे यांसारखे विद्वान या क्षेत्रीं चमकत आहेत. स. १८५७ सालचें स्वातंत्र्ययुद्ध मोडल्यानंतर युद्धांत भाग घेणारे अनेक दाक्षिणात्य वीर छद्मवेषानें या क्षेत्राच्या पोटांत आश्रयार्थ येऊन राहिले. त्या वेळीं शिंदे, होळकर, गायकवाड प्रभृतींचीं अन्नछत्रें होतीं. त्यांनीं त्या वेळीं येतील तितक्या पांथस्थांना आपलीं द्वारें खुलीं ठेवलीं होती व त्यामुळें निराधार झालेल्या कित्येक आपद्ग्रस्त महाराष्ट्रीयांना या क्षेत्राचा आश्रय मिळाला व आपलें शेष आयुष्य त्यांना कंठता आलें.

## आजची स्थिति

पूर्वीं दळणवळणाचीं साधनें कमी असल्यानें महाराष्ट्रांतून काशीस जाणारा मनुष्य सहसा परत येण्याच्या बोलीनें तेथें जात नसे. तेथें जो मनुष्य जाई तो बहुधा तेथें कायमच वास्तव्य करी. त्या क्षेत्रीं अखेर व्हावी ही हिंदुमात्राची इच्छा या भावनेच्या बुडाशीं असल्यानें स्वराज्य नसतांना वाहतुकीचीं साधनें दुर्मिळ, मार्ग धोक्याचें असतांनाहि त्याक्षेत्रीं महाराष्ट्री-यांची वस्ती वाढली व कांहींना राजाश्रयहि मिळाला. परंतु कालांतरानें स्थिति पालटली. रामेश्वरचा मनुष्य एका आठवड्यांत काशीयात्रा करून सुखानें परत फिरतो, इतका प्रवास सुखकर झाला. पूर्वींइतकी धर्मश्रद्धा

राहिली नाहीं, राजाश्रयहि कमी कमी होत गेला. यामुळें केवळ यात्रेकरूंच्या-वर अवलंबून असणारीच वहुतेक महाराष्ट्रीय कुटुंबें असल्यानें त्यांचा चरितार्थ चालेनासा झाला. त्यामुळें आज केवळ भिक्षुकी वृत्तीवरच अवलंबून राहणाऱ्या महाराष्ट्रीयांची मोठी विपन्नदशा झालेलीं आहे. कित्येक घराणीं ७–८ शें वर्षांपासून आपलें घर करून तेथें राहिली असलीं तरी त्यांनीं आपली भाषा व संस्कृति ही कायम राखिली आहे. परंतु अलीकडे मात्र त्यांचें चरितार्थाचें साधन कमी होऊ लागल्याकारणानें महाराष्ट्रीयांची वस्ती कमीं कमी होऊ लागली आहे व ही गळती अशीच कायम राहिली तर कालांतरानें महाराष्ट्रीयांनीं संपन्नतेला आणलेल्या व आपल्या विद्वत्तेनें गाजविलेल्या या क्षेत्रांत महाराष्ट्रीय राहील कीं नाहीं याची शंका वाटते.

तद्देशीय हिंदूंना महाराष्ट्रीयांचा वरपगडा पाहवत नाहीं व महाराष्ट्रीयांचा या क्षेत्रांत उपाध्येपणाचा हक्कच नाहीं असा वाद कांहीं वर्षांपूर्वीं तद्देशीय ब्राह्मणांनीं उपस्थित केला होता. त्याच वेळीं महाराजा अनंगपालाच्या वेळचा ताम्रपट पुराव्यांत दाखल होऊन महाराष्ट्रीयांचा हक्क शाबीत झाला. पेशव्यांच्या बहुतेक सरदारांचे वाडे या क्षेत्रीं असत. परंतु अलीकडे पुष्कळांनीं ते विकून टाकले आहेत. अशा रीतीनें काशी येथील महाराष्ट्रीय समाज घटू लागला आहे. आजहि क्षेत्रांत जुन्या विद्येंत पारंगत अशीं घराणीं आहेत. त्याचप्रमाणें नव्याविद्येंतहि महाराष्ट्रीय पंडितांनीं उत्तम नांव संपादन केलें आहे.

---

## हिंदुविश्वविद्यालय

पूज्यपाद पंडित मदनमोहन मालवीयजी यांनीं जगांत श्रेष्ठ असें हिंदु विश्वविद्यालय उभारलें. त्याचें अंतस्थ वैभव वाढविण्याला महाराष्ट्रीय पंडितांचे हात लागले आहेत. डॉ. गोडबोले यांनीं हिंदुस्थानांत अतुलनीय अशा प्रकारचें उद्यमशास्त्र या विश्वविद्यालयांत यशस्वी करून दाख-

विलें आहे. प्रो. पुणतांबेकर, प्रो. राणे, प्रो. जोशी, प्रो. आळतेकर, प्रो. खापर्डे इत्यादि महाराष्ट्रीय पंडितांनीं अर्वाचीन विद्याक्षेत्रांतहि आपला प्रभाव काशीधामांत पाडला आहे.

इतर क्षेत्रांतहि महाराष्ट्रीय मंडळी मागें नाहींत. वृत्तपत्रीय क्षेत्रांत श्री. बाबूराव पराडकर यांचें नांव प्रख्यात आहे. श्री. पावगी यांनीं हितचिंतक छापखाना नमुनेदार चालविला आहे. गोविंदराव जोगळेकर हे वकील म्हणून प्रसिद्ध आहेत. सोहोनी मंडळींचा जरतारी कापडाचा कारखाना भूषणभूत आहे. याखेरीज आयडियल इन्स्टिटयूट ही संस्था महाराष्ट्रीय तरुणांनीं नव्यानेंच स्थापन केली असून ती अल्प कालांतच लोकप्रिय झाली आहे.

## नवी दृष्टी नाहीं

काशी क्षेत्रांत आपापल्या जमातीसाठीं वेगवेगळे समाज धर्मशाळा वगैरे बांधून सुखसोयी करीत असतात. त्याप्रमाणें आपणहि सर्व सोयींनीं युक्त असा महाराष्ट्रीयनिवास बांधावा अशी योजना तेथील एक प्रमुख कार्यकर्ते श्री. भाऊराव दामले यांनीं केली होती. परंतु असा निवास झाला तर आपल्या यजमानकृत्यावर पाणी पडेल अशा संकुचितभावनेनें तेथील बऱ्याच मंडळींनीं विरोध केल्यानें ही कल्पना त्यांना सोडून द्यावी लागली ! परंतु काशी येथील लहान अंधारी संकुचित घरें आज कोणाला पसंत वाटत नाहींत तेव्हां मोकळ्या जागेवर एखादें सुंदर भवन बांधल्यास त्यांत अनहित कोणाचेंच होणार नाहीं. उलट बृहन्महाराष्ट्रांतील महाराष्ट्रीयांत जास्त आत्मीयता मात्र उत्पन्न होईल. या गोष्टीचा विचार काशीनिवासी महाराष्ट्री-यांनीं अवश्य करावा.

## विश्वेश्वराचा विध्वंस

श्रीकाशी धामाची माहिती सांगतांना विश्वेश्वराचा उल्लेख न केल्यास रामावाचून रामायण सांगितलेसें होणार. शिवाय विश्वेश्वराच्या संस्थापनेचें जें

अनेक प्रयत्न झाले ते महाराष्ट्रीयांनींच केले असल्यानें त्याची थोडक्यांत येथें माहिती देत आहे. मुसलमान राजा शहाबुद्दीन यानें विश्वेश्वर मंदिराचा विध्वंस केल्यानंतर विश्वेश्वराची प्राणप्रतिष्ठा महाराष्ट्रीय पंडितानेंच केल्याचें वर सांगितलें आहे. हिंदुस्थानांत श्रेष्ठ अशीं कांहीं पुण्यक्षेत्रें गणलीं जातात त्यांत श्रीकाशीजींचें नांव अग्रेसर आहे. परंतु यासंबंधानेंहि दैवदुर्विलसित असें कीं, मुसलमानी सत्ता येथें रूढ झाल्यापासून व मध्यंतरीं मराठी सत्ता अत्यंत प्रबल झाली, आसेतुहिमाचल मराठ्यांचा दरारा बसला, तरी हें पुण्यक्षेत्र स्वधर्मीयांच्या हातीं कधींहि आलें नाहीं. मुसलमानांमागून मराठी सत्ता वैभवगिरीवर आरूढ असतांच इंग्रजांनीं चेतसिंगाच्या हातून हें पुण्यधाम आपल्या वशांत घातलें तें कायमचें. श्री. न. चिं. केळकर यांनीं ‘ साऱ्या पुण्यक्षेत्रांचें एकच नशीब ’ या आशयाचा एक लेख मागें पॅलेस्टाइनला उद्देशून लिहिला, त्यांत या क्षेत्राबद्दलहि त्यांनीं असेंच सत्यपूर्ण उद्गार काढले आहेत.

चेतसिंगाच्या हातून काशी घेतांना सुद्धां वॉरन हेस्टिंगची कशी तिरपिट उडाली हें दर्शविणारीं ‘ घोडेपर हौदा और हत्तीपर जीन, जान बचानेके लिए पले वारन हेस्टिंग ’ ही म्हण रूढ आहे. चेतसिंगानें हेस्टिंगचा पूर्ण पराजय केल्यानंतर त्याला जयाचा फायदा न घेतां आल्यामुळें काशीनगर सोडावें लागलें व काशीचा कारावास कायमच झाला. पेशव्यानींहि हीं धामें आपल्या सत्तेखालीं आणण्याचे प्रयत्न केले असतां तद्देशीय हिंदूनींच त्यांना विरोध केला असा प्रवाद आहे.

## विश्वेश्वराची स्थापना

औरंगझेबाच्या कारकीर्दींत त्यानें विश्वेश्वराचें मंदिर व वेणीमाधवाचें मंदिर तोडून त्या ठिकाणीं मशिदी उभारल्या व काशीचें नांव मुहम्मदाबाद हें ठेविलें. त्यानें ठेवलेलें नांव नष्ट झालें असलें तरी अखिल हिंदुमात्रास वंदनीय अशा मंदिराच्या मशिदी बनविल्या गेल्या त्या आज प्रत्येक हिंदु

अंतःकरणास वेदना देत उभ्याच आहेत. श्री. मल्हारराव होळकर यांनीं ज्ञानवापीजवळील विश्वेश्वराच्या मंदिरावर बांधलेली मशीद पाडून त्याजागीं पुनः मंदिर बांधण्याचा निश्चय केला होता. परंतु 'मंदीर बांधणें उत्तम पण मशीद पाडणें पाप, तेव्हां हें करणें चांगलें नव्हे,' असा उपदेश त्यांना करण्यांत आल्यानें त्यांना तो विचार सोडून द्यावा लागला, असें राजवाडे खंड तीन मध्यें ता. २७ जून १७४ च्या पत्रावरून दिसून येते. पुढें अहिल्याबाई होळकर ह्यांनीं मशीद न पाडतां ज्ञानवापींतून लिंग काढून पंचमंडपयुक्त मंदिर बांधलें. अशा रीतीनें महाराष्ट्रीयांनीं दुसऱ्यांदां विश्वेश्वराची प्राणप्रतिष्ठा केली. स. १८३९ सालीं पंजाब केसरी महाराणा रणजीत सिंह यांनीं मंदिराचें शिखर सोन्यानें मढवून दिलें.

## मुसलमानांचें धर्मवेड

धर्मक्षेत्रे व मंदिरांचें विध्वंसन हें मुसलमानांचें ध्येय पुराणेंच आहे. वर शहाबुद्दीन घोरी व अवरंगझेब यांनीं केलेलीं कृत्यें सांगितलीं; नंतर इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यावरहि मुसलमानांचें धर्मवेड मधून मधून डोकें वर काढतेंच- स. १८०९ मध्यें मुसलमानांनीं एका मारुतीच्या मंदिराचा विध्वंस केला. तेव्हां हिंदु एकत्र होऊन त्यांनीं प्रतिकाराची सिद्धता केली. तेव्हां डब्ल्यू. डब्ल्यू. बर्ड नांवाच्या मॅजिस्ट्रेटानें मुसलमानांच्या संरक्षणार्थ दोन इंग्रज कंपन्या आणल्या, त्यामुळें मुसलमान शेफारून त्यांनीं खुद्द विश्वेवर मंदिरावरच हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां हिंदुसमाजानें जिवावर उदार होऊन गायघाटावर लढाई दिली. त्यांत मुसलमान हरले. परंतु आपल्या नेहमींच्या वृत्तीप्रमाणें पळतां पळतां लाट भैरवाचें मंदिर भ्रष्ट करून लाट फोडिली. दुसरे दिवशीं त्याचा पुरा वचपा हिंदूंनीं मशिदीला आग लावून काढला. स. १८५७ मध्यें इंग्रज अधिकारी रामनगर, चुनार येथें गेले हें पाहतांच मुसलमानांनीं विश्वनाथमंदिरावर आपला झेंडा उभारण्याचा प्रयत्न केला तेव्हां रजपूत पलटणीनें त्यांना परास्त केले असें सांगतात.

स. १९३१ मध्यें एक मुसलमान मारला गेला हें निमित्त करून मुसलमानांनीं उठाव केला. बरीच मारामारी झाली. परंतु अधिकाऱ्यांनीं हाहि दंगा शमविला. स. १९३५ मध्यें बकरीदच्या दिवशीं मुसलमानांनीं विश्वनाथ-मंदिराजवळील ओव्यावर नमाज पडण्याचा घाट घातला व कांहीं गुडांनीं त्या जागेवर पदार्पण केलेंहि, परंतु त्यावेळचे कलेक्टर मि. पन्नालाल यांनीं मोठ्या दक्षतेनें शांतता राखून मुसलमानांच्या शिरजोर वृत्तीस आळा घातला. अद्यापिहि मुसलमानांची ही वृत्ति केव्हां जागी होईल कोणी सांगावे ?

शहीदगंज–प्रकरण सुरू झाल्यानंतर ज्ञानवापीजवळ मुसलमानांची एक सभा झाली. तींत मौलवी झाफरअल्लीखान व लाहोरचे फेरोजोदीन अहंमद यांचीं भाषणें झालीं. तींत त्यांनीं असे उद्‌गार काढले कीं, ज्या जागीं एकदां मशीद झाली व पुढें तेथील मशीद नष्ट झाली तरीसुद्धां त्या जागेचें पावित्र्य अभंगच राहतें. हेंच विधान आधाराला घेऊन श्री. सिंग नांवाच्या गृहस्थांनी त्याना सवाल केला कीं, असेंच जर असेल तर आमचें मूळ विश्वनाथाचें मंदिर पाडून त्यावर मशीद बांधिली आहे व अशीं हिंदुस्थानांत अनेक स्थळें आहेत तीं मुसलमान परत देण्यास तयार आहेत काय ? असा मर्मस्पर्शी प्रश्न विचारताच औरंगझेबानें मंदीर मुळीं पाडलेंच नाहीं. तें आहे त्याच जागीं होतें अशीं उत्तरें येऊं लागलीं.

अशा प्रकारचें आज काशीक्षेत्र व तेथील महाराष्ट्रीय समाज आहे. काशी धामाला हजारों वर्षांपूर्वींपासून महत्त्व प्राप्त झालें असून त्याच्या-भोंवतीं हिंदुभावना आकर्षित होतील अशा अनेक गोष्टी निगडित झाल्या असल्यानें हिंदु अंतःकरणांत त्याचें स्थान अढळच राहील.

# ५ आसाम

## हिंदुस्थानचा पूर्वोत्तर सीमाप्रांत

'आसाम' हें नांव ऐकतांच तेथील चहाचे मळे, तेथें हिंदी मजुरांस जनावरापेक्षांहि दुष्टपणानें राबविणारे तेथील मळेवाले यांचें भयानक व हृदयभेदी असें चित्र आपणापुढें उभें राहतें. चहाच्या मळ्यांच्या बाबतींत हा प्रकार खरा नसेल असें नाहीं. परंतु याखेरीज आसाममध्यें आपलेपणा उत्पन्न होण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. पुराणकालीं या प्रान्ताचा मुख्य भारताशीं अत्यंत दृढ असा संबंध जडला होता व पुराणांतरीं वाचण्यांत येणाऱ्या अनेक गोष्टी या भूमीवर प्रत्यक्ष घडल्या, ही गोष्टहि कमी आकर्षक नाहीं. नरकासुर, भगदत्त, बाण, त्याची कन्या उषा, रुक्मिणी-हरणाचा प्रसंग, बभ्रुवाहनअर्जुन-युद्ध, इत्यादि पुराणांत वर्णिलेले अनेक प्रसंग या भूमींत घडल्याच्या आख्यायिका आहेत.

याखेरीज दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हिंदु-संस्कृतीची तेथें झालेलीं जोपासना. मोंगलांच्या स्वाऱ्या होईपर्यंत राजकीय हेतूसाठीं परस्थांचा प्रवेश या भूमींत झालाच नसल्यानें हिंदु संस्कृतीचीं पाळेंमुळें या देशांत फार खोल गेलीं आहेत. लोक आचारशील, धार्मिक बुद्धीचे, आदर आतिथ्य करण्यांत दक्ष असे आहेत. जुन्या काळचा गृहस्थाश्रम कसा असावा याची कल्पना आसाममध्यें आपणास तात्काळ अनुभवास येते.

इंग्रज राजवटीचा अंमल जों जों जास्त बसत चालला तों तों त्याच्या अनुषंगानें अनेक बऱ्यावाईट गोष्टी तेथें हळूहळू शिरूं लागल्या आहेत व आज दिसणारें दृश्य कालांतरानें दिसेलच अशी खात्री कोण देणार? पण आज तरी इतरत्र पाहावयास सांपडत नाहींत अशा जुन्या गोष्टी तेथें अनेक पाहावयास सांपडतात, ही गोष्टहि कांहीं खोटी नव्हे.

हिंदुस्थानांतील इतर प्रांतांत दारिद्र्याची जी आग पेटली आहे तींत

आसाम प्रान्तहि तो एकाच कुंडांत पडला असल्यानें होरपळून जात आहे ही गोष्ट न सांगतां समजण्यासारखी आहे. परंतु अशी स्थिति असली तरी निसर्गानें त्या प्रान्तावर केलेली कृपा मात्र अवर्णनीय आहे. काश्मीर प्रांत हिंदुस्थानचें नंदनवन म्हणून प्रसिद्ध आहे व तें त्याचें स्थान कोणी हिरावून घेत नाहीं ही गोष्ट खरी; तथापि त्याच्या खालोखाल तरी आसामला मान द्यावाच लागेल, ही गोष्टहि निर्विवाद आहे.

आसाम प्रांत हिंदुस्थानच्या अगदीं पूर्वोत्तर टोकाकडील प्रांत असल्यानें बाहेर प्रान्तांतील लोकांचे त्या प्रांतांशीं संबंध दुरावले आहेत. परंतु हा प्रांत अस्सल संस्कृतीचा, एकाच हिंदु रक्तमांसाचा असल्यानें तो दूर असला तरी परका खास नाहीं. त्याची माहिती महाराष्ट्रीय वाचकांस व्हावी या हेतूनें ती पुढें दिली आहे.

## बाह्यस्वरूप

भारतवर्षाच्या उत्तर सरहद्दीचें संरक्षण करण्याचें कार्य गिरिराज हिमाचलानें पत्करलें आहे. परंतु हिमाचल एवढेंच एकच कार्य करून राहिला नाहीं. त्याच्या उतरणीवर जे अनेक देश पसरले आहेत ते अमृतोपमजलधारांनीं जलपूरित करून सुजलां, सुफलां, सार्थतेनें बनविण्याचें कार्यहि याच ऋषिवर्यांनीं पत्करलें असून त्याच्या पादपंकजावर भारताच्या उत्तर सीमेकडील प्रांत आराम करीत असतात. त्याच्याच उत्तर टोकाच्या एका देशाचें वर्णन या ठिकाणीं देण्याचें योजिलें आहे.

स. १९२६ सालीं राष्ट्रीय सभेचें ४१ वें अधिवेशन आसाममध्यें झालें. तन्निमित्त तेथें जाण्याचा योग आला होता. राष्ट्रीय सभेच्या धांदलींत व असलेल्या फुरसतीमध्यें त्या प्रान्ताची जी माहिती मिळाली ती वाचकांना देण्याचें योजिलें आहे.

आसाम प्रान्त म्हणजे सृष्टिसुंदरीचे अत्यंत आवडतें असें विलासस्थान आहे. हिमालयाच्या एकाखालीं एक अशा उतरत्या रांगा, त्यांतून वाह-

णाऱ्या अमृतप्रवाही, ब्रह्मपुत्रा, सरमा अशा नद्या, नेहमीं पर्जन्यवृष्टि होत असल्यानें सर्वत्र जिकडेतिकडे जणु हरितवसन लेवून नटलेली सृष्टिसुंदरी, पिकानें दाटलेलीं भाताचीं शेतें, फलपुष्पांनीं ओथंबलेल्या समृद्ध बागा, जागोजाग घनदाट अरण्यें, बांबू, केळीं व ताल आदि वृक्षांचे जागजागीं असलेले पुंज, हिमालयाच्या जटाभारांतून स्रवणाऱ्या असंख्य जलधारा, अशा प्रकारचा सृष्टिसखीच्या कृपेस सदैव पात्र झालेला हा संपन्न भूभाग पाहून मन हरपून गेल्याखेरीज राहत नाहीं. निसर्गाच्या या भूभागावर कांहीं विशेष प्रकारची कृपा आहे व सृष्टीचें हें खेळतें सौंदर्य पाहिलें म्हणजे मन क्षणभर कां होईना, जीवनकलहाच्या अनेक प्रकारच्या दगदगींतून क्षणमात्र तरी निवृत्त झाल्याखेरीज राहत नाहीं.

आसाम हिंदुस्थानचा पूर्वोत्तर सीमाप्रांत असून एका बाजूस बंगाल. खालच्या बाजूस ब्रह्मदेश व उत्तर बाजूस हिमाचल अशी त्याची रचना आहे. त्याचें हल्लींचें वर्णन देण्यापूर्वी त्याची पुराणकालाची थोडी माहिती येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं. कारण आज ज्याप्रमाणें आसाम हिंदुस्थानांतीलच एक भाग मानण्यांत येतो,. तसाच पुराणकालींहि समजण्यांत येत होता व हिंदुस्थानच्या राजकीय घडामोडीशी त्याचा संबंध फार जुना आहे हेंहि त्यामुळें ध्यानीं येईल.

## पुराणकालीन आसाम

पुराणकालीं या प्रांताचा उल्लेख प्रथम रामायणांत, व महाभारतादि पुराणांत आढळतो. त्यावेळीं तेथें नरक नांवाचा हिंदू राजा राज्य करीत होता. नरक हा विष्णूचा अवतार जो वराह त्याचा पुत्र होय. कालिकापुराणांत शोणितपुराचा राजा बाण हा नरकाचा परम मित्र होता असा उल्लेख आहे. हें शोणितपूर म्हणजे आजचें तेजपूर असें सांगतात. हा मोठा शिवभक्त होता. म्हणजे इतक्या प्राचीनकाळीं तेथें शैवसंप्रदाय रूढ होता हें दिसून येईल. नरकाचा पुत्र भगदत्त याचा महाभारतांत प्रामुख्यानें

उल्लेख आहे. भगदत्ताचा पुत्र वज्रदत्त हाहि शैवमतानुयायी होता. शिव व शक्ति यांची उपासना त्या काळीं तेथें रूढ होती. बाणाची कन्या उषा ही देवीची निस्सीमभक्त होती व तिच्या देवीचें मंदिर तेजपूर येथें आजहि दाखविलें जातें. या प्रान्ताच्या पूर्व टोकाला सादिया येथें एक चंडिकेचें मंदिर आहे. आज हें मंदिर ताम्रेश्वरी नांवानें प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं कृष्णानें रुक्मिणीहरण केलें अशी कथा रूढ आहे.

या प्रान्ताची अधिष्ठात्री देवता कामाख्या, ( कामाक्षी ) म्हणून सुविख्यात आहे. देवी दुर्गेची जीं ५१ पीठें प्रसिद्ध आहेत त्यांत या देवस्थानाला फार मोठें महत्व आहे. इ. स. च्या सातव्या शतकांत या प्रान्तांचा अधिपति कुमार भास्करवर्मा नांवाचा असून तो भगदत्ताचा वंशज असल्याचें वर्णन आहे. कुमार भास्करानें प्रसिद्ध चिनी प्रवाशी ह्युएनत्संग यांस निमंत्रण दिलें होतें. त्यावेळीं कामाख्या प्रान्तांत शैवमतानुयायीच लोक असत असें तो म्हणतो. या प्रान्ताला दुसरें नांव कामरूप असेंहि आहे. भगवान् श्री. शंकराचार्यांनीं इ. स. च्या ९ व्या शतकांत या प्रान्ताला भेट दिली व तेथील प्रसिद्ध शाक्त अभिनव गुप्त याला त्यांनीं जिंकलें. यानंतर १३ शतकापर्यंतचा इतिहास फारसा उपलब्ध नाहीं.

तेराव्या शतकाच्या अखेरीस ब्रह्मदेशांतून अहोम लोकांनीं स्वाऱ्या करून काचारी, चुतिया या लोकांना जिंकून ब्रह्मपुत्रेपर्यंत मुलूख हस्तगत केला. सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं कोच व अहोम यांमध्यें हा देश विभागला गेला होता. पहिल्या कोच राजानें कामाख्या देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, वंगांतून अनेक ब्राह्मण आणले व शक्तीची उपासना वाढविली. पुढें अहोम राजांनीं हिंदुधर्माचा स्वीकार केला. म्हणजे अनादि कालापासून ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यांत हिंदुधर्मच नांदत आहे, हें दिसून येत आहे.

स. १४४९ मध्यें आसामचा चैतन्यदेव नांवानें प्रसिद्ध असलेला शंकरदेव याचा जन्म झाला. यानें आसाममध्यें वैष्णवधर्माचा प्रसार केला. अखिल भारतवर्षांत त्यानें प्रवास केला. त्याच्या मनावर वैष्णवपंथाचा

अतिशय परिणाम होऊन त्यानें आसाममध्यें वैष्णवधर्म प्रसृत केला. त्याच्या पंथाला ' महापौरुषेय ' पंथ असें म्हणतात. पुढें पुढें या पंथांचा आसाममध्यें फार झपाट्यानें प्रसार होऊन शाक्तपंथानुयायी आसाम वैष्णवपंथी बनला.

## आसाममध्यें जाण्याचे मार्ग

आसाममध्यें जाण्याला हल्लीं दोन मार्ग आहेत. एक रेल्वेचा व दुसरा जलमार्ग. मुंबईहून कलकत्ता व कलकत्त्यामधील सियाल्दा स्टेशन-वरून आसाम—बंगाल रेल्वेमार्गें आसाममध्यें प्रवेश करतां येतो. मध्यंतरीं ब्रह्मपुत्रा नद लागतो. त्याच्या एका बाजूला अमिनगांव स्टेशन असून तेथें आगगाडींतून उतरावें लागतें. नद उतरण्यासाठीं रेल्वे कंपनीची स्टीमर असून तींतून पलीकडे पांडू स्टेशनवर पुनः रेल्प्रवास सुरू होतो. पांडू स्टेशनपासून गौहत्ती हें शहर ३।४ मैल दूर आहे. परंतु हिंदुस्थानांतून अनेक ठिकाणाहून येणाऱ्या प्रतिनिधींच्या सोयीसाठीं या पांडू स्टेशननजीकच राष्ट्रीय सभेनें चित्तरंजनपूर नांवाचें कॉंग्रेस नगर वसविलें होतें. या नगरासाठीं निवडलेली जागा अत्यंत रमणीय व सोयीस्कर अशी होती. पाण्डव वनवासांत असतांना त्यांनीं या ठिकाणीं कांहीं वेळ मुक्काम केला होता. यावरून या ठिकाणाला पाण्डु हें नामाभिधान प्राप्त झालें आहे. कॉंग्रेस नगर कामाख्या टेकडीच्या पायथ्यावर वसविण्यांत आलें असून जवळच ब्रह्मपुत्रेचा विशाल व अथांग असा प्रवाह वाहत जातो.

रेल्वे-रस्त्याखेरीज आसाममध्यें जाण्याला दुसरा म्हणजे जलमार्ग. बंगालमध्यें रेल्वे-रस्त्यापेक्षांहि जलमार्गानेंच जास्त दळणवळण चालतें. बंगालमधील रिव्हर सिस्टीम नमुनेदार आहे. त्या प्रांतांतून गंगा, ब्रह्मपुत्रा, कटक, दामोदर यांसारख्या मोठमोठ्या नद्या वाहत असून त्यांची पात्रें वाहतुकीला फार योग्य असल्यानें त्या मार्गानें दळणवळण जास्त होतें. परंतु हा मार्ग दगदगीचा व त्याला वेळहि जास्त लागतो. खेरीज परप्रांतीय माणसाला माहितीच्या अभावी व्हावा तितका प्रवास सुखकर होत नाहीं.

आसाम प्रान्ताचें एकंदर क्षेत्रफळ ६१००० चौ. मैल असून लोकसंख्या ऐंशी लक्ष आहे. यांपैकीं खास आसामी बोली बोलणारांची संख्या शें. २२ असून शें. ४४ लोकांची भाषा बंगाली व बाकीच्यांत उडिया, हिंदी व इतर डोंगरी लोकांच्या भाषांचा समावेश होतो.

आसाममध्यें बारा जिल्हे व एक मणिपुर संस्थान इतक्यांचा समावेश होतो. या बारा जिल्ह्यांत तीन डोंगरी जिल्हे आहेत. त्यांत खासी व जेन्तिया हे जिल्हे महत्त्वाचे गणले जातात. या जिल्ह्यांतच आसामची राजधानी शिलांग असल्यानें प्रांताचें मुख्य शहर म्हणून त्याला बरेंच महत्त्व आहे.

## खासी जिल्हा

खासी जिल्ह्यांत पाईन वृक्षांची समृद्धि आहे. त्या झाडांपासूनच टरपेंटाईन काढतात. ईस्ट इंडिया कंपनीला बंगालच्या दिवाणीचे अधिकार मिळाल्यानंतर स. १७६५ मध्यें त्या हक्काच्या जोरावर खासी जिल्हा तिनें कबजांत घेतला. स. १८२९ पर्यंत कंपनीचे व तेथील देशी राजांचे संबंध ठीक होते. परंतु १८२९ झाली नॉंगक्ला येथील लोकांनीं इंग्रजांविरुद्ध हत्यार उपसलें. तेव्हां १८३५ मध्यें सर्व राजांना इंग्रजांनीं आपल्या अंकित करून टाकलें; याचप्रमाणें जेन्तिया प्रान्ताच्या राजानें दोन ब्रिटिश प्रजाजनांना ठार मारल्याच्या आरोपावरून त्याला पदच्युत करून त्याला महिना पांचशें रुपये पेनशन करून दिलें. त्याचा त्यानें मरेपर्यंत म्हणजे १८६१ पर्यंत उपभोग घेतला. हिंदुस्थानांतील इतर प्रान्त इंग्रजांनीं ज्या प्रकारानें घेतले तेच प्रकार या ठिकाणीहि करण्यांत येऊन अल्प काळांतच आसाम एकरंगी झाला.

## खासीची लोकसत्ताकें

खासी नांवाचीं जीं संस्थानें आहेत तीं लहान प्रमाणांत लोकसत्ताक संस्थानेंच आहेत असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. तेथील राजाची निवड लोक करतात. त्यांना सीम्स ( Siems ) असें म्हणतात व त्याचा अर्थ राजा असा आहे. अशीं लोकसत्ताकें १५ आहेत. या राजाची लोकांनीं

निवड केल्यानंतर ब्रिटिश सरकारची त्याला मान्यता मिळावी लागते. त्या-खेरीज दुसरी लहान वीस संस्थानें आहेत. हल्लीं देशांत जी स्वराज्याची चळवळ सुरू झाली आहे, तीपासून हीं संस्थानेंहि अलिप्त नाहींत व आपल्या सर्व संस्थानांचें एकीकरण करावें अशी चळवळ तेथें सुरू आहे. त्यांचें एकीकरण करून सर्वांचे मिळून एक कौन्सिल निवडून त्यानें कारभार करावा, असे प्रयत्न सुरू आहेत. ते पुढेंमागें फलद्रूप होण्याचीं चिन्हेंहि आहेत.

खासी लोकांत जातिभेद नाहीं. सर्व लोक समानदर्जाचे मानले जातात. गरीब व श्रीमंत यांचा सामाजिक दर्जा सारखाच मानला जातो. एखाद्या मजुरालाहि आपला मुलगा पुढेंमागें ज्ञातीचा पुढारी होईल अशी उमेद असते. स्त्रिया पूर्ण स्वतंत्र आहेत. स्त्रीशिक्षणाची वाढ यामध्यें फार मोठी आहे. या ज्ञातीइतका स्त्रीशिक्षणाचा प्रसार हिंदुस्थानांत इतरत्र नाहीं.

## गौहत्ती

सृष्टीचें अत्यंत आवडतें असें हें स्थान ब्रह्मपुत्रेच्या दक्षिणतटाकीं बसलें आहे. गौहत्तीच्या दक्षिणभागीं अर्धचंद्राकार हिरव्यागार अशा टेकड्या पसरल्या असून खालीं ब्रह्मपुत्रेचा अखण्ड जलस्रोत वाहत असतो. ब्रह्म-पुत्रेच्या पात्रामध्येंच उमानंदा नांवाचें पवित्र देवस्थान असून हजारों यात्रे-करू तेथें दर्शनासाठीं बोटींतून हमेशा जात असतात. नगरच्या पश्चिमभागीं कामाख्या पर्वत ( टेकडी ) आहे. शाक्तपंथीय लोकांच हें यात्रेचें मोठें स्थान असून तंत्रशास्त्राचा उगम याच ठिकाणापासून झाला अशी आख्या-यिका आहे. अर्वाचिन गौहत्ती ज्या ठिकाणीं वसलें आहे त्याच ठिकाणीं पुराणांतरीं प्रसिद्ध असलेलें प्राग्जोतिषपुर होतें व तें नरकानें बसविलें असा उल्लेख कालिका पुराणांत व योगिनी यंत्रांत आढळतो. या नरकाचें राज्य कोरायोता नदीपासून ब्रह्मपुत्रेच्या पूर्वतटाकापर्यंत पसरलें होतें. पुढें श्रीकृ-ष्णाच्या हस्तें तो मरण पावला. त्याचा मुलगा भगदत्त याची कन्या भानु-मती इचा विवाह दुर्योधनाशीं झाला. महाभारतांत भगदत्ताचा उल्लेख

प्राग्जोतिषाधीश व कौरवांचा सुहृद म्हणून आहे. हा कुरुक्षेत्रावर चिनी व किरातांचें मोठें सैन्य घेऊन पांडवांशीं युद्ध करण्यासाठीं गेला असतां अर्जुनाकरवीं मारला गेला. यानंतरचा गौहत्तीचा इतिहास १६ व्या शतकापर्यंत उपलब्ध नाहीं. त्यावेळीं हें नगर कोचराज्यामध्यें समाविष्ट होतें व त्या शतकांत तेथील राजा परीक्षित यानें ब्रह्मपुत्रेच्या दुसऱ्या तटाकीं उत्तर गौहत्ती नांवाचें नगर वसविलें व कित्येक वर्षे ब्रह्मपुत्रेच्या दोन्ही तटाकची ही राजनगरी अत्यंत भरभराटीस आलेली होती. परंतु सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत औरंगझेबाचें सैन्य या प्रान्तावर चालून आलें. त्यांच्या व अहोम राजांच्या अनेक लढाया झाल्या. अखेरीस अहोमराजांनीं मुसलमानांचा पराभव करून त्यांना कामरूपच्या हद्दीबाहेर घालवून दिलें. या युद्धानन्तर गौहत्ती हीच राजधानी झाली. पुढें १७८६ मध्यें मुसलमानांनीं रंगपूर काबीज केलें, तेव्हां अहोम राजांनीं गौहत्तीच्या उत्तरेस सिपसागर या ठिकाणीं आपली राजधानी नेली. या राजधानीचे भग्नावशेष अद्यापीहि आसंमत भागांत विखुरलेले आढळतात. मुसलमानांशीं टक्कर देण्यासाठीं बांधलेला गौहत्तीच्या उत्तरेस मुभाई कोहा गड अद्यापीहि जीर्णावस्थेंत आढळतो. याखेरीज प्रचंड तट, मोठमोठ्या भव्य राजप्रासादांचें गलितावशेष चोहोंकडे पसरले आहेत. गौहत्तीच्या राजघराण्यानें विशाल व भव्य देवमंदिरें बांधिलीं. त्यांना मोठमोठ्या देणग्याहि दिल्या. या सर्व चिन्हांवरून गौहत्तीचें पूर्वकालीं वैभव फार मोठें असावें व तेथें राजलक्ष्मी मोठ्या प्रसन्नतेनें नांदत असावी, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

परंतु १९ व्या शतकारंभीं गौहत्तीच्या वैभवाला उतरती कळा लागली. पुढें १८२६ सालीं अहोमराजांकडून आसाम प्रांत घेतला गेला. परंतु तो १८७४ पर्यंत बंगालला जोडला नव्हता व तेथपर्यंत आसामची राजधानी गौहत्तीच होती व आजहि एका विभागाची ती राजधानीच आहे. ब्रिटिश राजवटी सुरू झाल्यानंतर ब्रिटिश राजवटीला साजेशा सुधारणा तेथेंहि झाल्या. तेथें कॉटन कॉलेज नांवाचें आसाममध्यें एकच असलेलें कॉलेज आहे.

आसाम प्रान्त अत्यंत मनोहर असून सृष्टीचें नटवें कोमल व नाजुक स्वरूप तेथें सर्वत्र बागडतांना दिसतें ही गोष्ट खरी असली, तरी क्वचित् प्रसंगीं ती असें रौद्रस्वरूप धारण करतें कीं, क्षणमात्रांत इकडचा पर्वत तिकडे करून भूप्रदेश गदगदां हालविते. जणूंकाय जगाच्या बाह्य वेशावर फसूं नका, बाह्य वेश सुंदर असला तरी अंतरंग तसें असतेंच असें नाहीं, असें जगाला शिकवींत असल्याचा प्रत्यय येतो.

आसाममध्यें धरणीकंप फार होतात. स. १८९७ सालीं झालेला धरणीकंप अत्यंत भयंकर स्वरूपाचा होता. त्या तडाक्यांत गौहत्तींतील सर्व इमारतींचा चक्काचूर झाला. हल्लीं शहरांत दिसतात त्या सर्व इमारती नव्याच आहेत व या भूकंपाच्या आपत्तीमुळेंच प्रायः कलकत्ता—मुंबईप्रमाणें भव्य इमारती तेथें फारशा नव्हे मुळींच नाहींत.

## कामाख्या

गौहत्तीची पश्चिम बाजू कामाख्या टेकडीनें संरक्षिली आहे. या टेकडीवर कामाख्या व भुवनेश्वरी या देवतांचीं देवालयें प्रसिद्ध असून तेथें यात्रेकरू बाराहि मास जात येत असतात. गौहत्ती शहरांतून टेकडीवर जाण्याचा रस्ता जरा सुगम आहे. परंतु आम्हीं पांडु येथें उतरलों असल्यानें तेथूनच टेकडीवर चढणें आम्हांस इष्ट दिसलें. इकडूनहि वर जाण्याचा मार्ग फारसा अवघड नाहीं. निदान महाराष्ट्रीयांस तरी तो तसा खास वाटणार नाहीं. या बाजूनें टेकडी चढूं लागतांच पायथ्याशींच एक बजरंगाची मूर्ति अधिष्ठित झालेली दिसते. समर्थ रामदास या प्रान्तीं गेले असतांना त्यांनीं ती स्थापना केली अशी माहिती तेथें लागली व हीच गोष्ट संभवनीय दिसते. एरवीं कामाक्षी व भुवनेश्वरी या शाक्तपंथीयांच्या आराध्यदेवता तेथें, हा रामदूत उड्डाण करून कशाला जाता ? परंतु श्रीसमर्थांनीं ठायीं ठायीं, श्री मारुतीरायांची स्थापना करून त्यांची उपासना वाढविली, तेव्हां त्या वायुपुत्रासहि समर्थांच्या इच्छेमागें धावावें लागलें.

टेकडीवरच बरीच वस्ती आहे. अर्थात् त्यांचें जीवन उभय देवतांवर अवलंबून असल्याखेरीज ते तेथें राहतात कशाला ! मुख्य देवता कामाख्या ( कामाक्षी ) व दुसरी भुवनेश्वरी यांचीं मंदिरें उत्तम व चांगलीं भक्कम अशीं बांधलीं आहेत. दोन्ही मंदिरापुढें मोठमोठे सभामंडप असून त्यांतून मुख्य गाभाऱ्याकडे जाण्याचा रस्ता आहे. परंतु सांगण्याची गोष्ट अशी कीं, सभामंडपांत फारच थोडा उजेड असतो. तोहि इतका अल्प कीं, मनुष्य ठेंचाळून पडूं नये इतक्याचपुरता. इकडीलप्रमाणें सभामंडपाच्या तीनहिं बाजू खुल्या मुळींच नसल्यानें जवळ जवळः अंधार अशी स्थिति व पुढें गाभाऱ्यांत हवेचा परिमाणूहि न जाईल इतका अंधार; अर्थात् नंदादीपाच्या प्रकाशांत काय दर्शन होईल तेवढेंच.

या दोन्ही देवता शाक्तपंथीयांच्या असल्याचें वर सांगितलेंच आहे. याचा अनुभव तेथें जातांच ताबडतोब येतो. सभामंडपापुढें एक सोपेवजा जागा असून तेथें देवीला देण्याच्या बळींचा वध करण्यांत येतो व हा प्रकार नेहमींच सुरूं असल्यानें रक्ताच्या थारळ्यांत पाय न पडेल अशी खबरदारी घेऊन मोठ्या सावधानतेनें व जागरूकतेनेंच जावें लागतें. देवीला हे असले नैवेद्य, हवा खेळण्याची सोय नाहीं, यामुळें नाकाला पदर लावल्याखेरीज सभामंडपांतून जातां येत नाहीं व तेथपर्यंतचीं मजल निर्वेध-पण गांठली व खुद्द मूर्तीचें दर्शन घेण्याइतका दम टिकला तर तेथील कोंडलेल्या हवेनें व भेसूर वातावरणामुळें कोणाचा दम टिकेल असें वाटत नाहीं. निदान आमचा तरी तसा न टिकल्याकारणानें मुठींत नाक धरून मोकळी हवा घेण्यासाठीं बाहेरचा रस्ता केव्हां गांठतो असें झालें !

## इतर प्रेक्षणीय स्थळें.

टेकडीवरून ब्रह्मपुत्रेचा व शहरचा देखावा फार सुंदर दिसतो. ब्रह्मपुत्रेच्या पात्रांतील उर्वशी खडक व त्यावरील श्वेत दीपस्तंभ, शुक्रेश्वर वाट व शुक्रेश्वराचें मंदिर इत्यादि देखावे मोठे चित्ताकर्षक आहेत.

ब्रह्मपुत्रेच्या कांठाकांठानें पूर्वेकडे जाऊं लागलें असतां सरकारी कचेऱ्या व युरोपियन वस्ती लागते. याच्या समोर ब्रह्मपुत्रेच्या पात्रांत उमानंद नांवाचें सुंदर छोटेखानी बेट आहे—याला अलीकडे गोऱ्या लोकांनीं मयूर-द्वीप–पीकॉक आयलन्ड–असें नांव दिलें आहे व लांबून पाहतां खरोखरीच एखादा मयूर आपलें पुच्छ पसरून उभा राहिल्यासारखें दिसतेंहि. या बेटा-वरच उमानन्देश्वराचें मंदिर आहे. महाशिवरात्रीच्या दिवशीं येथें फार मोठी यात्रा भरते.

गौहत्तीच्या उत्तरेस म्यु० हद्दीबाहेर बरीच जुनीं घराणीं आहेत. त्यांच्या पूर्वजांनीं गोहत्तीचें पूर्व वैभव पाहिलेलें होतें. जवळच अश्वक्रान्ता नांवाची एक टेकडी आहे. या ठिकाणीं श्रीकृष्ण रुक्मिणीचें हरण करून जात असतां त्यानें आपल्या रथाच्या घोड्यांना विश्रांती दिली अशी आख्यायिका आहे. या ठिकाणीं श्रीकृष्णाचें एक मंदीरहि आहे.

गौहत्तीच्या दक्षिण बाजूस सुमारें सात मैलांवर वशिष्ठाश्रम आहे. तेथें खासी डोंगरांच्या उतरणीवर संध्या, ललिता व कान्ता नांवाच्या तीन नद्यांचा संगम होऊन त्यांचा प्रवाह वराळू नांवानें गौहत्तीजवळच ब्रह्मपुत्रेला मिळतो. याखेरीज छत्रकार व नवग्रह या टेकड्याहि प्रसिद्ध असून तेथेंहि मंदिरें आहेत.

## शिलाँग.

आसामप्रांताची शिलाँग ही राजधानी असून ती फारच आकर्षक आहे. चोहोंकडे पाण्याचे धबधबे सारखे वाहत असतात. सुंदर वृक्षांच्या गर्द राया जागोजाग आहेतच. नानाप्रकारच्या वृक्षराजी पांथाचे श्रम तेव्हांच हरण करतात. शिलाँगच्या दक्षिणेस ६० मैलांवर चेरापुंजी नांवाचें ठिकाण आहे. त्या ठिकाणीं जगांत सर्वापेक्षां जास्त पाऊस पडतो असा लौकिक आहे.

## मणिपूर.

मणिपूर हें लहानसें हिंदु संस्थान आहे. पुराणांतरीं प्रसिद्ध असलेल्या बभ्रूवाहनाचें तें नगर हें असें म्हणतात. याच्या पूर्वोत्तर हद्दीवर असलेलें सादिया ही रुक्मिणीचा पिता भीष्मक याच्या विदर्भ राज्याची राजधानी आहे, अशी कथा तिकडे रूढ आहे. याखेरीज हिंडिंबासुराचें राज्य म्हणून जी जागा दाखवितात तेथें हल्लीं जंगल वाढलें आहे. त्यांत त्यांचें ठिकाण दिनापूर हें आहे. याखेरीज तेजपूर, पुराणांतल्या बाणराजाचें शोणितपूर हीं स्थळेंहि प्रेक्षणीय आहेत.

## आसाममधील मुख्य उत्पन्न.

हा प्रान्त चहाबद्दल मुख्यतः प्रसिद्ध आहे हें सर्वश्रुतच आहे. वशिष्ठाश्रमाकडे जातांना कांहीं चहाचे मळे दृष्टीस पडतात. हिंदुस्थानांतील इतर कच्च्या मालाची लूट जशी परस्थांनीं चालविली आहे, त्याचप्रमाणें येथीलहि उत्पन्नाची मुख्य बाब बव्हंशीं परदेशस्थांच्या हातीं आहे. आसामच्या चहांच्या मळ्यांत मजुरांना कशा प्रकारें वागविलें जातें याची हृदयद्रावक कहाणी देण्याचें हें स्थळ नसलें तरी भूमीच्या मालकांनाच आज पोटासाठीं दुसऱ्याचे गुलाम होऊन त्याच भूमीवर राबावें लागतें, ही वस्तुस्थितीहि कमी क्षोभकारक नाहीं. अलीकडे फारच थोडे चहाच्या मळ्याचे देशी मालक झाले आहेत; पण ते सागरांतील खड्यासारखे अत्यल्प आहेत.

या चहाचा हंगाम फेब्रुवारी–मार्चच्या सुमारास असतो. चहाच्या झाडावरील जो कोवळा पाला असतो तो अस्सल चहा म्हणून समजला जातो. हिंदुस्थानाच्या वांट्याला अर्थातच हा अस्सल माल येत नाहीं. दुसरीं जीं निबर पान असतात तो कमी प्रतीचा होय. त्याचा खप हिंदुस्थानांत होतो. बाजारांत विक्रीसाठीं जो चहा येतो तो मूळ स्वरूपांत येत नाहीं. प्रथम पानांची तोड करण्यांत येते. नंतर तीं पानें एका यंत्रांत घालून रसाळ अशी स्थिति येईपर्यंत दाबतात व तीं रसभरीत झालीं म्हणजे विस्तवावर ताप-

वितात व त्यानंतर तयार झालेलीं पानें चहा म्हणून डब्यांत भरून विक्रीसाठीं बाजारांत पाठविण्यांत येतात. चीन व जपानमध्यें जो चहा वापरतात तो वर दर्शविल्याप्रमाणें रसाळ केल्यानंतर भाजून न काढतां तसाच सुकवितात व त्याला ' ग्रीन टी ' असें म्हणतात.

आसाममध्यें चहाच्या खालोखाल उत्पन्न होणारा पदार्थ म्हणजे संत्री होय. या प्रान्तांत संत्र्यांचें पीक अतिशय मोठें, संत्रीहि खूप मोठीं व चविष्ट असतात. तेथील संत्र्यांना मुख्य बाजार कलकत्त्याचा आहे. हंगामाच्या दिवसांत यांची मोठी वाहतूक होते.

आसामप्रांतांत पर्जन्यवृष्टि भरपूर व नदीनालेहि नेहमीं तुडुंब वहात असल्यानें पाण्याचें दुर्भिक्ष नाहीं व देश एकंदरीनें सुपीक आहे. या देशाप्रमाणें शेतीला सुगम अशीं नैसर्गिक साधनें हिंदुस्थानांत अन्यत्र क्वचितच सांपडतील. शेती व बागाईत हे लोकांचे मुख्य धंदे आहेत. तांदुळ, चहा, गहूं व तमाखू हीं प्रमुख पिकें आहेत. दगडी कोळसा व पेट्रोलियम तेल हीं खनिज द्रव्येंहि या भूमींत सांपडतात.

या प्रांतांत गोपाळपारा व सिलहट या दोन जिल्ह्यांतच फक्त कायम धारापद्धति असून महाराष्ट्राप्रमाणेंच सारावसुली खास शेतकऱ्यापासूनच सरकार करतें. या प्रांतांत चहाचे मोठमोठे मळे आहेत; पण ते सर्व युरोपियनांच्या मालकीचे आहेत. हिंदी लोकांच्या मालकीची चहाच्या लागवडीची फारच थोडी जमीन आहे व तीहि अनेक लोकांत वांटली गेली आहे.

हातमागाचा धंदा आसाममध्यें फार जुना आहे व अद्यापीहि तो पूर्वीइतकाच चालतो. नवरी पाहतांना प्रथम तिला मागावर विणतां येतें कीं नाहीं, हें अद्याप पाहण्यांत येतें व हल्लीं असहकारितेच्या काळापासून तर हा धंदा जोराला लागला आहे. या प्रांतांत रेशमी व सुती कापड उत्तम तयार होतें.

या प्रांतांतील सुरमा खोऱ्यांतील लोकांचा द्रविडियन लोकांशीं पूर्वकालीं

बराच संबंध असावा असें दिसतें. कारण त्यांच्या बोलींत अनेक द्रविडियन शब्द रूढ झालेले आहेत.

आसामी लोक मध्यम उंचीचे, वर्णानेंहि बरे असून मांगोलियन पद्धतीचा थोड्या अंशानें चेहऱ्यावर छाप उमटलेला दिसतो. लोक फार साधे, सभ्य, प्रामाणिक, उदार, दयाळू, आदरातिथ्यकुशल असे आहेत. हिंदूंच्या संस्कृतीचा जिवंत अवशेष तेथें पूर्णत्वानें पहाण्यास सांपडतो. ते धर्मानें हिंदू आहेत व त्यांतील बहुसंख्य वैष्णवधर्मानुयायी–महापौरुषेय पंथानुयायी–असून इतर शक्तिपंथी आहेत.

पूर्वकालीं हा देश अत्यंत समृद्ध, लोक बुद्धिवान्, उद्यमशील असे होते. परंतु आज दारिद्र्यानें ग्रस्त झालेले व एकंदरींनें मागासलेलें आहेत व म्हणूनच एक आसामी कवि म्हणतो.

Where the grass is rich and green
Where the pastures beauteous seen
Lead us over such pleasant way
Chase all ills and woes away.

---

## ६ आमचे अज्ञात देशबांधव

भारतवर्ष हा एक देश नसून देशांचा समूह असलेला एक खंड आहे. अनेक भाषा, नाना धर्मपंथ, भिन्नभिन्न प्रकारचे आचार, वेगवेगळ्या प्रकारचें हवापाणी, विविध स्वरूपांनीं नटलेलें सृष्टिसौंदर्य इत्यादि अनेक गोष्टी पाहिल्या म्हणजे हा देशसमूह असलेला खंड कसा ही गोष्ट प्रत्ययास येते.

जमिनीच्या जागीं पाणी, पाण्याच्या जागीं पर्वत इत्यादि अनेक सृष्टिचमत्कार पृथ्वीतलावर होत आले, त्याचप्रमाणें इतिहासमहर्षींनींहि जगांत

अनेक घडामोडी करून आपलें लीलानाट्य जगास दाखविलें, ते सर्व प्रकार या प्राचीनतर भूभागावर झालेले आढळतात. त्यांपैकीं एक या ठिकाणीं निवेदन करण्याचें योजिलें आहे.

## परशुराम क्षेत्राची स्थापना

पुराणकालीं एकदा पृथ्वीवर अनर्थ माजला. राजे प्रजेवर जुलूम करूं लागले, प्रजेस कोणी त्राता नाहींसा झाला. तेव्हां श्रीपरशुरामानें अवतार घेऊन दुष्टांचें निर्दलन व सुष्टांचें संरक्षण केलें. आसुरीवृत्तीनें अत्याचारी झालेल्या क्षत्रियांचा एकवीस वेळा निःपात केला व अखेरीस सर्व पृथ्वीचें दान कश्यप मुनींना केलें. सर्व पृथ्वी दान केल्यानंतर स्वतःस राहाण्यास स्थल नाहींसें झालें तेव्हां त्यांनीं समुद्र हटवून तेथें आपली वस्ती केली आणि त्या स्थलास तेव्हांपासून परशुराम क्षेत्र असें नामाभिधान प्राप्त झालें आहे.

श्रीपरशुरामाच्या नांवावर ही दंतकथा रूढ आहे. तीप्रमाणें आजहि त्या परशुराम क्षेत्रांत त्यांनीं स्थापित केलेल्या चित्तपावन या ज्ञातिविशिष्ट समाजाचा आंतर्भाव होतो. परशुरामांनीं ही वसाहत केव्हां केली ही गोष्ट आज कालोदरांत विलीन झाली असल्यानें चित्तपावन समाजाचा आद्य इतिहासहि सुसंबद्ध रीतीनें सांगतां येणें शक्य नाहीं. परंतु जे कांहीं थोडे फार धागेदोरे आज उपलब्ध आहेत त्यांवरून एक गोष्ट मात्र निश्चित ठरतें कीं, चित्तपावन समाजाचें आद्य गृह म्हणजे परशुराम क्षेत्र हेंच होय व आज परशुरामक्षेत्राबाहेर जो चित्तपावन समाज पसरलेला आहे त्याचें मूळ ठिकाण परशुराम क्षेत्र हेंच आहे.

मुंबई इलाख्याच्या पश्चिम दिशेस रत्नाकर पसरलेला असून तो या भूमीचें सदैव पादप्रक्षालन करीत असतो. या समुद्र किनाऱ्याच्या बाजूनें रत्नागिरीपासून खालीं मलबारपर्यंत सुमारें ५० मैल रुंदीची निमुळती अशी दक्षिणोत्तर पट्टी पसरली आहे. व या पट्टीच्या पूर्वबाजूस सह्याद्रीनें

वराच संबंध असावा असें दिसतें. कारण त्यांच्या बोलींत अनेक द्रविडियन शब्द रूढ झालेले आहेत.

आसामी लोक मध्यम उंचीचे, वर्णानेंहि बरे असून मांगोलियन पद्धतीचा थोड्या अंशानें चेहऱ्यावर छाप उमटलेला दिसतो. लोक फार साधे, सभ्य, प्रामाणिक, उदार, दयाळू, आदरातिथ्यकुशल असे आहेत. हिंदूंच्या संस्कृतीचा जिवंत अवशेष तेथें पूर्णत्वानें पहाण्यास सांपडतो. ते धर्मानें हिंदू आहेत व त्यांतील बहुसंख्य वैष्णवधर्मानुयायी—महापौरुषेय पंथानुयायी—असून इतर शक्तिपंथी आहेत.

पूर्वकालीं हा देश अत्यंत समृद्ध, लोक बुद्धिवान्, उद्यमशील असे होते. परंतु आज दारिद्यानें ग्रस्त झालेले व एकंदरीनें मागासलेलें आहेत व म्हणूनच एक आसामी कवि म्हणतो.

Where the grass is rich and green
Where the pastures beauteous seen
Lead us over such pleasant way
Chase all ills and woes away.

---

# ६ आमचे अज्ञात देशबांधव

भारतवर्ष हा एक देश नसून देशांचा समूह असलेला एक खंड आहे. अनेक भाषा, नाना धर्मपंथ, भिन्नभिन्न प्रकारचे आचार, वेगवेगळ्या प्रकारचें हवापाणी, विविध स्वरूपांनीं नटलेलें सृष्टिसौंदर्य इत्यादि अनेक गोष्टी पाहिल्या म्हणजे हा देशसमूह असलेला खंड कसा ही गोष्ट प्रत्ययास येते.

जमिनीच्या जागीं पाणी, पाण्याच्या जागीं पर्वत इत्यादि अनेक सृष्टि-चमत्कार पृथ्वीतलावर होत आले, त्याचप्रमाणें इतिहासमहर्षींनींहि जगांत

अनेक घडामोडी करून आपलें लीलानाट्य जगास दाखविलें, ते सर्व प्रकार या प्राचीनतर भूभागावर झालेले आढळतात. त्यांपैकीं एक या ठिकाणीं निवेदन करण्याचें योजिलें आहे.

## परशुराम क्षेत्राची स्थापना

पुराणकालीं एकदा पृथ्वीवर अनर्थ माजला. राजे प्रजेवर जुलूम करूं लागले, प्रजेस कोणी त्राता नाहींसा झाला. तेव्हां श्रीपरशुरामानें अवतार घेऊन दुष्टांचें निर्दलन व सुष्टांचें संरक्षण केलें. आसुरीवृत्तीनें अत्याचारी झालेल्या क्षत्रियांचा एकवीस वेळा निःपात केला व अखेरीस सर्व पृथ्वीचें दान कश्यप मुनींना केलें. सर्व पृथ्वी दान केल्यानंतर स्वतःस राहाण्यास स्थल नाहींसें झालें तेव्हां त्यांनीं समुद्र हटवून तेथें आपली वस्ती केली आणि त्या स्थलास तेव्हांपासून परशुराम क्षेत्र असें नामाभिधान प्राप्त झालें आहे.

श्रीपरशुरामाच्या नांवावर ही दंतकथा रूढ आहे. तीप्रमाणें आजहि त्या परशुराम क्षेत्रांत त्यांनीं स्थापित केलेल्या चित्तपावन या ज्ञातिविशिष्ट समाजाचा आंतर्भाव होतो. परशुरामांनीं ही वसाहत केव्हां केली ही गोष्ट आज कालोदरांत विलीन झाली असल्यानें चित्तपावन समाजाचा आद्य इतिहासहि सुसंबद्ध रीतीनें सांगतां येणें शक्य नाहीं. परंतु जे कांहीं थोडे फार धागेदोरे आज उपलब्ध आहेत त्यांवरून एक गोष्ट मात्र निश्चित ठरतें कीं, चित्तपावन समाजाचें आद्य गृह म्हणजे परशुराम क्षेत्र हेंच होय व आज परशुरामक्षेत्राबाहेर जो चित्तपावन समाज पसरलेला आहे त्याचें मूळ ठिकाण परशुराम क्षेत्र हेंच आहे.

मुंबई इलाख्याच्या पश्चिम दिशेस रत्नाकर पसरलेला असून तो या भूमीचें सदैव पादप्रक्षालन करीत असतो. या समुद्र किनाऱ्याच्या बाजूनें रत्नागिरीपासून खालीं मलबारपर्यंत सुमारें ५० मैल रुंदीची निमुळती अशी दक्षिणोत्तर पट्टी पसरली आहे. व या पट्टीच्या पूर्वबाजूस सह्याद्रीनें

आपल्या शैलशुंडा पसरून दुर्गम अशी तटबंदी केली आहे. या सह्याद्रीच्या शाखा–विस्तारासच पश्चिम घाट अशी संज्ञा प्राप्त झालेली आहे. या भूभागाची रचना एका विशिष्ठ पद्धतीची आहे. भूमीची रचना, उद्भिज पदार्थ, नैसर्गिक सृष्टिसौंदर्य इत्यादि गोष्टी या सर्व पट्टींत एकसारख्या दिसून येतात.

## कोकणाची निसर्गरचना

तांबड माती, छोट्या छोट्या नद्या, नारळी, पोफळी, भात, काजू यांचें पीक इत्यादि गोष्टी या भागांत सारख्याच दिसून येतात. या टापूची अशी विशिष्ट परिस्थिति असली तरी या भागाच्या उत्तर भागाला म्हणजे खास रत्नागिरी जिल्ह्याला विपुलतेचें व सृष्टिसौंदर्याचें सुख लाभावें तसें लाभलें नाहीं. परशुरामक्षेत्रांत जी धान्याची निपज होते तीवर कटाकटी ४।६ महिने त्या भागांतील लोकांची गुजराण होते. परंतु लगत सावंतवाडी, गोमांतक, कारवार, द. कानडा, मलबार इत्यादि भागांत खालीं खालीं जावे तों ही स्थिति पालटून सृष्टी सदासर्वदा नटलेली, प्रसन्न वदनानें जणूं सदा हास्याचे फवारे सोडीत असलेली दिसते. रत्नागिरीच्या बाजूला सह्याद्रि जणूं-काय निद्रिस्त होऊन पसरलेला म्हणून अगदीं ठेंगणा तर खाली जावे तो गर्वानें मान ताठ करून आकाशगर्भाचा अंत पाहण्यासाठीं आपलीं शिखरें उंचच उंच करीत असावासा दिसतो. बाकी, हवा, पाणी, भूमिरचना यांत रत्नागिरीपासून मंगलोरपर्यंत सारखवटपणा पसरलेला आहे.

चित्तपावन समाजाचें मूल गृह रत्नागिरी जिल्हा असें मानण्यांत येतें. चित्तपावन या भूमींत केव्हां कोठून व कसे आले हा प्रश्न इतिहाससंशोधकांनीं सोडविण्याचा असल्यानें तो आपण बाजूला ठेवला तरी फार प्राचीन कालापासून चित्तपावनांचें तें निवासस्थान होतें ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे. पुढें इतिहासकालांत आपल्या गृहाचा त्याग करून अनेक कुटुंबें देशावर उतरलीं व सुदैवानें त्यांना योग्य संधि मिळून इतिहासांत अजरामर अशी

कीर्तीहि त्यांनीं संपादन केली. आजच्या इतकी इतिहासकालीं दळणवळणाचीं वा प्रवासाचीं साधनें मुबलक व सोईचीं नसतांहि देश व कोंकण यांचा संबंध अबाधित राहिला, तुटला नाहीं. म्हणून कोंकण व देश यांवरील चित्तपावनांचे आचार, विचार, भाषा, यांत विशेष फरक झाला नाहीं.

## परप्रांतांतील महाराष्ट्रीय

परंतु ज्या भागाला देश अशी संज्ञा आहे त्याशिवाय इतर प्रांतांत जे चित्तपावन गेले त्यांची मात्र तशी स्थिति राहिली नाहीं. उदाहरणार्थ, उत्तर हिंदुस्थानांत जे महाराष्ट्रीय गेले त्यांच्यांत भाषाबदल झाला राहणी बदलली. तोच प्रकार जास्त प्रमाणांत दक्षिण हिंदुस्थानांत गेलेल्या महाराष्ट्रीयांचा झाला. शहाजी राजांच्या वेळेपासून अनेक महाराष्ट्रीय कुटुंबें-ब्राम्हण व मराठे—दक्षिणेंत गेलीं. तेथें तीं स्थायिक झालीं. परंतु मराठेशाहीच्या अंताबरोबर त्यांचा मातृभूमीशीं जो संबंध तुटला तो कायमचा. त्यामुळें ते लोक आज महाराष्ट्रास पारखे झालि आहेत. तंजावर, कुंभकोणम्, बंगलोर, म्हैसूर इत्यादि भागांत हजारो महाराष्ट्रीय कुटुंबें आज नांदत आहेत. त्यांतील कांहीं " राव " या नांवानें संबोधिलीं जातात आणि अद्यापिहि त्यांच्यांत अपभ्रष्ट अशी मराठी बोली बोलली जाते.

कित्येक चित्तपावन घराणीं मद्रास इलाख्यांत अनेक पण वेगवेगळ्या ठिकाणीं स्थायिक झालीं आहेत व कित्येक तर तद्देशीय समाजाशीं एकरूप झालीं आहेत. कानडीमध्यें 'आरवत वकलु' म्हणजे ६० घराणी म्हणून एक समाज प्रसिद्ध आहे. त्यांत चित्तपावनांमध्यें असलेलीं अनेक आडनांवें भाषांतरित होऊन रूढ झालेलीं आहेत. उदाहरणार्थ, डोंगरे या मराठी आडनांवाचें रूपांतर 'त्यवरू' अँस झालेलें आहे. गोडबोले याचे 'शीनुडियवरू' असें भाषांतर झालेलें आहे. याचप्रमाणें दिवेकर यांचेंहि भाषांतर झालें आहे. यावरून कित्येक कानडी संशोधकांचें म्हणणें असें आहे कीं, चित्तपावनांत असणारीं ६४ घराणीं केव्हां तरी या प्रांतांत येऊन

स्थायिक झालीं असावींत व त्यांचीं भाषांतरित अशी कानडी आडनांवें पडलीं असावीं. संशोधकांनीं विचार करण्यासारखा हा प्रश्न आहे. तंजावर, मद्रास, बंगलोर हे भाग रेल्वेच्या मार्गावर असल्यानें त्यांचा संबंध अलीकडे येऊं तरी लागला आहे व जास्त चिकाटीचे प्रयत्न केल्यास निदान मातृभाषा तरी ते जिवंत ठेवूं शकतील.

## द. कानडांतील महाराष्ट्रीय

परंतु या भागापेक्षांहि अशा एका भागांत मी आपणास नेणार आहे कीं, निदान महाराष्ट्रीयांस तरी तो भाग आजतागायत अज्ञात व आपले इतके देशबांधव त्या भागांत असतील अशी कल्पनाहि नसलेला आहे. हा भाग म्हणजे मद्रास इलाख्यांतील द. कानडा ऊर्फ मंगळूर हा जिल्हा होय ! या भागांतील पुत्तूर या तालुक्यांत ४५ चित्तपावनांचीं घराणीं असून त्यांचीं आज ३०० कुटुंबें व एकंदर लोकसंख्या सुमारें दीड हजार आहे. या कुटुंबांनीं आपली मायभूमि सोडली तेव्हां ती गटानें सोडली असल्यानें त्यांना तद्देशीयांशीं विवाह वगैरे करण्याची आपत्ति न येतां ते आज तागायत आपली रक्तशुद्धि कायम राखू शकले. ही कुटुंबें या भागांत केव्हां आलीं ही गोष्ट आज कालोदरांत विलीन झाली आहे. खुद्द वसाहत करणारांच्या वंशजांनाहि त्याची फारशी माहिती नाहीं. आपणांस ७८ पिढ्यांइतकीच माहिती आहे असें ते सांगतात.

पोर्तुगीजांनीं अनन्वितपणें धर्मच्छल केला; त्यांच्या जुलूमास वैतागून आपले पूर्वज या टापूंत आले असावेत असा या लोकांचा समज आहे व वस्तुस्थितीहि अशीच असावीशी वाटतें. धर्मच्छलामुळें आपला मायदेव सोडून परमुलूख धरावा लागला यासंबंधीं इंग्लंडच्या इतिहासांत अनेक उदाहरणें घडून आलीं आहेत. धर्मरक्षणासाठीं आपल्या मायभूमीचा त्याग करतांना त्यांच्या हृदयांत कोणत्या भावनांचे कल्लोल उठले असतील, धर्माला कोणीच त्राता उरला नाहीं हें पाहून त्यांच्या अंतःकरणांत कसा विषाद

उत्पन्न झाला असेल या गोष्टी कुशल कादंबरीकार बहारींनें व हृदयास्पर्शी रीतीनें रेखाटील हें खरें असलें तरी सामान्य बुद्धीलाहि त्यांच्या मनोभावनांचा उद्रेक समजणें अशक्य नाहीं.

## जन्मभूमीप्रमाणें मिळालेला आधार

सुमारें तेरा–चौदाव्या शतकांत हे लोक या प्रांतीं आले असावे व तेहि समुद्रमार्गानें. कारण खुष्कीचा मार्ग त्या वेळीं आजच्या इतका सुलभ नव्हता व आजच त्या भागीं इतकीं घनदाट अरण्य, हरएक प्रकारचे वन्य पशू यांची समृद्धि आहे तर ज्या वेळीं मनुष्याचा पादस्पर्शहि त्या भागाला लागला नव्हता त्यावेळीं तो भाग दुर्गम असल्यास आश्चर्य काय ? अर्थात या लोकांचें आगमन समुद्रमार्गेंच झालें असावें. याच भागांत हे लोक उतरण्याचें कारण, त्यांना आपल्या मायभूमीसदृश अशीच ती भूमि आढळली हें होय ! मातेप्रमाणें त्या भूमीनें त्यांना आश्रय देऊन त्यांचें संगोपन तर केलेंच; परंतु आपल्या जन्मभूमीप्रमाणें जवळ समुद्र किनारा व हवा-पाणी, नारळी, पोफळी इत्यादि पिकांना योग्य अशी जमीन इतर परिस्थिति अनुकूल असें आढळतांच या निर्वासितांनीं आपलें आसन तेथें ठेवून ते तेथील कायम रहिवासी झाले.

चित्तपावनांच्या वस्तीप्रमाणेंच सुमारें दोन हजार कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबेंहि या भागांत नांदत आहेत. त्यांचाहि इतिहास वरीलप्रमाणेंच आहे कित्येकांच्या मतें शिलाहराच्या कालांत चित्तपावन या प्रांतांत उतरले असावे. परंतु त्या विधानास अद्याप पुरेसा आधार नाहीं. म्हणून पोर्तुगीजांच्या धर्मच्छलामुळेंच हे उभय समाज या भागांत आले असावेत असें म्हणणें ग्राह्य वाटते.

चित्तपावन व कऱ्हाडे बांधव समुद्रमार्गानें दक्षिण हिंदुस्थानांतील हल्लीं ‘ दाक्षिण कानडा ’ या नांवानें प्रसिद्ध असलेल्या भागांत आले असावेत असें सांगितलें. हा भाग व रत्नागिरीचा भाग यांत अनेक दृष्टींनीं सादृश्य असलें

तरी रत्नागिरी भागापेक्षां हा भाग नवा असावा असें भूस्तरशास्त्रदृष्ट्या स्पष्ट दिसतें.

## दक्षिण कानडाचा इतिहास

दक्षिण कानडा व उत्तर कानडा हे दोन जिल्हे असून आज उत्तर कानडा मुंबई इलाख्यांत मोडतो व दक्षिण कानडा मद्रास इलाख्यांत समाविष्ट झाला असला तरी स. १८७२ सालपर्यंत हे दोन्ही जिल्हे एकच होते. दक्षिण कानडा जिल्ह्याच्या उत्तरेस मुंबई इलाखा, पूर्वेस म्हैसूर व कुर्ग, दक्षिणेस कुर्ग व मलबार आणि पश्चिमेस अरबी समुद्र या त्याच्या मर्यादा आहेत.

आमचे चित्तपावन व कऱ्हाडे बांधव या प्रांतांत कधीं गेले असावे हें जसें आज निर्णायक सांगतां येत नाहीं त्याचप्रमाणें या प्रांताचा इतिहासहि फारसा उपलब्ध नाहीं. चिंगलपेठ जिल्ह्यांतील कांजीवरम्–कांची–येथील पल्लव घराण्याच्या ताब्यांत हा भाग होता असें शिलालेखावरून दिसतें. या पल्लवांची राजधानी विजापूर जिल्ह्यांतीड बदामी ( वातापी ) ही होती. त्यांच्यानंतर कदंब; कदंबा नंतर चालुक्य; नंतर होयसळबल्लाळ व त्याच्यानंतर चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धांत हा जिल्हा विजयानगरच्या सत्तेखालीं गेला. पुढें तालिकोटच्या लढाईनंतर येथील स्थानिक जैन राजा स्वतंत्र झाल्यानंतर सतराव्या शतकांत इक्केरीच्या लिंगायत वेंकटप्पा नायक यानें तें राज्य जिंकून घेतलें.

पुढें स. १७६६ मध्यें हैदरानें हा भाग जिंकून घेतला. व स. १७९९ मध्यें टिपू मारला गेल्यानंतर हा भाग इंग्रजांकडे गेला व तेव्हांपासून हा भाग इंग्रजांच्याच ताब्यांत आहे.

## जाण्याचा मार्ग

दक्षिण कानडा जिल्ह्यांत जाण्यास दोन मार्ग आहेत. एक खुष्कीचा व दुसरा समुद्राचा. मुंबईहून मंगलोरपर्यंत आगबोटीच्या प्रवासाला सुमारें

दीड ते पावणेदोन दिवस लागतात. दुसरा रस्ता आगगाडीचा. मद्रास व सदर्न मराठा रेल्वेवरील कडूर या रेल्वे स्टेशनवर उतरलें म्हणजे तेथूनहि मंगलोर भागांत जाण्यास मोटारी मिळतात. किंवा रेल्वेनेंहि मंगलोरास जातां येतें. परंतु तो रस्ता लांबीचा व मध्यें आगगाडी बदलावी लागल्यामुळें जास्त दगदगीचा आहे. मद्रास व सदर्न मराठा रेल्वेवर हरीहर या स्टेशनपासून म्हैसूर राज्यास सुरुवात होते. ब्रिटिश व म्हैसूर राज्य यांची सरहद्द तुंगभद्रा नदीनें विभागली आहे. अर्थात कडूर हें स्टेशन म्हैसूर राज्यांत असून कडूर हा जिल्हाहि आहे परंतु त्या गांवच्या नांवानें जिल्हा प्रसिद्ध असला तरी जिल्ह्याचें मुख्य ठिकाण चिकमंगलोर—छोटे मंगलोर—हें आहे.

## आदर्श राज्य म्हैसूर

कडूर स्टेशनावर दक्षिणकानडांत जाण्याला मोटारी मिळतात. मध्यंतरी मोठें शहर व जिल्ह्याचें ठिकाण चिकमंगलोर हें आहे. ब्रिटिश हद्द सोडतांच आपण एका समृद्ध व सौंदर्यपूर्ण अशा भागांत प्रवेश करीत असल्याची प्रतीति क्षणोक्षणीं येते. छोटीमोठीं टुमदार गांवें, बहुतेक ठिकाणीं विद्युद्दीपाची योजना, लहान खेड्यांतहि नळानें खेळविलेलें पाणी, ठिकठिकाणीं उघडलेलीं शालागृहें, दवाखाने या गोष्टी पाहिल्या म्हणजे आपण सुराज्यांत आहों असें वाटल्याखेरीज राहत नाहीं. चिकमंगलोर, मुडगेरी हीं म्हैसूर राज्यांतील ठकळ शहरें वाटेंत लागतात.

म्हैसूर राज्य म्हणजे संपन्नतेचें व सौंदर्याचें आगर. अनेक थोर पुरुषांनीं नानाप्रकारचीं लेणीं चढवून त्या राज्याच्या सौंदर्यांत भर टाकलेली व सुदैवानें सृष्टिमातेचीं कृपाहि त्यावर अमूप. महाराष्ट्रांत सह्याद्रीचीं शिखरें उघडीं वाघडीं, शीतोष्ण पर्जन्यादिकांशीं टकरा देत उभीं राहिलेलीं, कोठें विसाव्याला झाड ना झूड, आरामस्थल सांपडेल ही आशा क्वचितच; परंतु याच्या सर्वस्वी उलट स्थिति म्हैसूर व त्याच्या लगत असलेल्या दक्षिण कानडांतील सह्याद्रीच्या गिरिशिखरांची.

## सह्याद्रीचें रौद्र सौंदर्य

शेकडों वर्षे स्वैरपणानें वाढत असलेले गगनचुंबित प्रचंड वृक्ष. त्यांना वेतासारख्या अनेक बळकट लतांनीं दिलेलीं गाढ आलिंगनें, नानाप्रकारच्या वृक्षवेलींनीं घनदाट बनलेलीं अरण्यें, त्यांत हत्ती, वाघ, गवा, सांबर यांसारखीं श्वापदें व नानाप्रकारचें सर्प यांनीं त्या अरण्याला रौद्र भयानकपणा जास्तच आलेला, परंतु अशा भयानक अरण्यांतहि मनुष्यानें आपल्या बुद्धिचापल्यानें हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केलेला पाहिला म्हणजे मनुष्याच्या बुद्धीचें कौतुक वाटल्याखेरीज राहत नाहीं.

अशा प्रकारच्या घनदाट अरण्यांतून मनुष्यकृत असा सुंदर मार्ग आहे. चिकमंगलोरपासून खालीं उतरणारा 'चार–माडी' नांवाचा प्रचंड असा घाट आहे. कडूरपासून सुमारें साठपासष्ट मैल मोटारचा प्रवास आटोपल्यावर घाटाचा उतार सुरू होतो. त्या जागेपासून ब्रिटिश हद्द लागते व या ठिकाणीं मोटारी बदलाव्या लागतात. या जागेला ' गढी ' असें नांव आहे. चिकमंगलोरपासून निघाल्यानंतर डाव्या हाताला अत्यंत खोल अशा दऱ्या सर्वत्र पसरल्या असून त्या घनदाट अरण्यांनी भरगच्च भरलेल्या आहेत. त्यांतच कॉफीची लागवडहि मधून मधून आढळून येते. उजव्या हाताला उंचच उंच गगनस्पर्शी गिरिशिखरें, डाव्या बाजूला पातालाचा ठाव घेणाऱ्या खोल दऱ्या जणूंकाय निसर्गाचीं दोन भिन्न टोंकेंच, दर्शवीत असल्याचें, भासतें. खालीं पाहावें तों डोळे फिरून जातील इतकीं खोल अरण्यें, दुसरीकडे पाहावे तो घेरी येण्याइतक्या उंचीचीं गिरिशिखरें. या गिरिशिखरांतून रजतसदृश अशा जलधारा अरण्यगर्भांत उड्या टाकून लुप्त झाल्याशा दिसतात.

## चित्तपावनांचें मुख्य स्थान मुंढाजे

द. कानडांत चित्तपावनांची मुख्य वस्ती पुत्तुर तालुक्यांत मुंढाजे, कारकल, हत्यंगडी, बेलतंगडी या गांवीं असून कऱ्हाडे लोकांची वस्ती प्रामु-

ळ्यानें कासरगोड तालुक्यांत आहे. महाराष्ट्रीय समाजांतील चित्तपावन व कऱ्हाडे यांखेरीज महाराष्ट्रीय सारस्वतांची वस्तीहि या भागांत मोठी आहे. चित्तपावनांचें मुख्य केंद्र मुढाजे हें गांव आहे. हें गांव कद्दूर-मंगलोर रस्त्यावर असून तेथून मंगलोर पंचेचाळीस मैल आहे. मुढाजे या गांवीं ग्रामपंचायत असून मद्रास इलाख्यांत मुढाजेची ग्रामपंचायत नमुनेदार म्हणून समजण्यांत येते. या गांवच्या मधोमध मुढाजे ( मृत्युंजय ) नांवाची नदी असून गांव तिच्या दोन्ही तीरांवर बसला आहे. या नदीला वर बांध घालून तिच्या पाण्याखालीं दोन्ही बाजूच्या पोफळीच्या बागा भिजविण्यांत येतात. मध्यें नदी, तिच्या दोन्ही बाजूस पोफळीच्या बागा; एक बाग एकाच्या मालकीची, ती संपली कीं मग दुसऱ्याची. या बागांच्या वरच्या बाजूस राहण्याचीं घरें. अशीं गांवाची मांडणी असल्यानें गांवाचा विस्तार चार मैलांवर पसरला आहे. चित्तपावनांखेरीज इतरांच्या मालकीची जमीन मुढाजे येथें मुळींच नाहीं म्हटली तरी चालेल.

## अरण्यांतील वेलदोड्यांची लागवड

पावसाचें मान प्रतिवर्षीं दीडशें इंचांइतकें असल्यानें नदीला पाणी बारमहा मुबलक असते व त्या पाण्यावर पोफळीच्या बागा पोसल्या जातात. पोफळी, खेरीज काजू, आंबे, नारळ, फणस, नागवेलीचीं पानें, हरएक प्रकारच्या भाज्या, फळें, पुष्पें त्या भूमींत तयार होतात. मिऱ्यांचा व्यापार एका काळीं येथें फार मोठ्या प्रमाणांत चाले. अलीकडे तो कमी झाला आहे. पोफळीच्या खालोखाल दुसरें मोठें पीक वेलदोड्यांचे. दक्षिण कानडांत अरण्यें घनदाट, त्यांत वेलदोड्याच्या झाडांची लागवड मोठ्या प्रमाणांत झालेली आढळते. झाडांच्या मुळाशीं भुईमुगाच्या शेंगांप्रमाणें वेलदोडे येतात. ते तोडून घेण्याइतकीच कामगिरी मनुष्यास करावयाची असते. त्यासाठीं पेरणी खत इत्यादि गोष्टी करण्याची आवश्यकताहि नसते. अशा प्रकारचीं हजारों एकरांची प्रचंड अरण्यें चित्तपावनांच्या मालकीचीं आहेत.

त्यांत रानटी हत्तींचे कळप, अनेक जातींचे विषारी सर्प, रानडुकरांची समृद्धि अशा अनेक आपत्तींशीं झुंजून तेथून सोनें उत्पन्न करणारा आपला जातभाई पाहिला म्हणजे सहजच मनांत आदर व अभिमान उत्पन्न होतो.

## आचार, पेहेराव व भाषा

चित्तपावनांत एकंदर ६४ कुळें आहेत. त्यांपैकीं ४५ कुळांतील लोकांनीं एका गट्टानें या प्रांतांत वस्ती केली. त्यांत खाडिलकर, भिडे, फडके, मराठे, पटवर्धन, गोडबोले, गोगटे, गोखले, मेहेंदळे वगैरे अनेक उपनांवांचीं घराणीं आहेत. अनेक शतकें त्या प्रांतांत जाऊन राहिल्यानें तेथील कांहीं चालीरीति त्यास अंगीकाराव्या लागल्या. उदाहरणार्थ, पुरुषांच्या पेहेरावांत फरक झाला. मद्रासी माणसाप्रमाणें नुसती लुंगी नेसण्यांत त्यांचा कार्यभाग होतो. मद्रासी पद्धतीनें नांवें लिहिण्यांत येऊं लागलीं. या प्रांतांत कानडी व तुळु या व्यवहारांतील भाषा; घरांत मात्र मराठीला पुष्कळ जुळती व अल्पप्रयासानें समजेल अशी ' चित्तपावनी ' भाषा बोलण्यांत येते. मराठी भाषा शिकण्याची व्यवस्था नाहीं. तथापि आपण महाराष्ट्राच्या रक्ताचे, ती आपली मायभूमि हा अभिमान मात्र प्रखर आहे व म्हणूनच अद्यापि मराठी थोड्याबहुत प्रमाणांत वावरतांना आढळते. तेथील लोकांचें जीवन बव्हंशीं शेतकीवर अवलंबून असल्यानें व सुदैवानें सृष्टिमातेची कृपाहि त्यांजवर भरपूर असल्यानें अद्याप महाराष्ट्राइतका त्या भागांत शिक्षणप्रसार झाला नसला तरी लोक आदरातिथ्यकुशल आहेत. शिक्षणाकडे अलीकडे तेथील लोकांचें बरेंच लक्ष वेधलें असून पुढील पिढींत मंगलोर—भागांत अनेक विद्वान वकील—डॉक्टर चमकूं लागतील.

## लोकमान्यांचें स्मारक मंदिर

खुद्द मुढाजें गांव चित्तपावनांचें असल्यानें त्यांना पुणें हें आपलें मायघर वाटतें. पुण्याच्या चळवळीकडे ते कान देऊन असतात. शुद्ध पंचांग लोकमान्यांनीं काढलें व तेंच पंचांग येथेंहि रूढ झालेलें आहे. लोकमान्य

कैलासवासी झाले त्यांचीं अनेक ठिकाणीं अनेक लहानमोठीं व नाना प्रकारचीं स्मारकें झालीं. परंतु मुंढाजेसारख्या, लोकांच्या दृष्टीआड असलेल्या गांवीं लोकमान्यांचें स्मारकमंदिर असल्याचें ऐकून त्यांच्या भक्तांस सानंद आश्चर्य वाटेल ! या गांवीं " टिळक मंदिर " लोकांनीं वर्गणी जमवून बांधलें असून मंदिरापुढें विस्तृत अंगण आहे. त्यांत सुंदर विहीर बांधली आहे व खुद्द मंदिरांत ग्रामपंचायतीनें चालवलेला दवाखाना आहे.

## मातृभाषा जगवा

मद्रास इलाख्यांत महाराष्ट्रीयांची वस्ती मोठी, पण ती विखुरलेली. एका गटानें मोठी वस्ती असलेला भाग म्हणजे दक्षिण-कानडा. या भागांत चित्तपावन, कऱ्हाडे व सारस्वत या महाराष्ट्रीयांची वस्ती विपुल आहे व अपभ्रष्ट स्वरूपांत कां होईना पण अद्याप मराठी भाषा तेथें जीव धरून आहे. आपली मातृभाषा म्हणून तरी तिची अभिवृद्धि त्या प्रांतांतील महाराष्ट्रीयांनीं करावयास पाहिजे.

## तद्देशीय महाराष्ट्रीयांची अपेक्षा

अलीकडे दळणवळणाचीं साधनें फार सुलभ झालीं आहेत. त्यामुळें पूर्वींसारखा हा मुलूख अज्ञात राहिलेला नाहीं. पुण्याहून ता. १ रोजीं रात्रीं सदर्नमराठा मेलनें गाडींत बसले कीं ता. ३ रोजीं सकाळीं मनुष्य मुंढाजें येथें जाऊन पोहोंचतो. तेथील आपल्या बांधवांची इच्छा अशीं कीं पुनरपि आम्हांला आपणांत एकरूप करून घ्या. या गोष्टी दोन प्रकारांनीं साध्य होण्यासारख्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे मराठी भाषेचा प्रचार. हा वाढला म्हणजे आत्मीयता जास्त वाढेल व दुसरी गोष्ट परस्परांमध्यें शरीरसंबंध वाढविणें. ही गोष्ट साध्य होण्याला आज भाषेची मोठी अडचण आहे. महाराष्ट्रांतील मुली त्या भागांत दिल्या, तर त्यांना अगदीं चुकल्यासारखें होतें. भाषा भिन्न, आचार भिन्न, यामुळें त्या तेथील परिस्थितीशीं तत्काळ

समरस होऊं शकत नाहींत. भाषावृद्धीनें ही अडचण सहज दूर होण्या-सारखी आहे.

## महाराष्ट्र परिषद भरवा

चित्तपावन, कऱ्हाडे व सारस्वत असे महाराष्ट्रीयांचे तीन समाज या भागांत असून त्यांची वस्ती २०।२५ हजारापर्यंत आहे. त्यांनीं एखादी महाराष्ट्रीय परिषद मंगलोरसारख्या मध्यवर्ती ठिकाणीं भरविल्यास एकंदर परिस्थितीचा आढावा घेतां येऊन त्यांस आपलें महाराष्ट्रीयत्व टिकवतां येईल. आपल्या या बाजूस पडलेल्या देशबांधवांकडे महाराष्ट्राचें लक्ष वेधणें एवढाच या वर्णनाचा हेतु आहे.

---

# ८ द. कानडांतील चित्तपावन बंधु

" आमचे अज्ञात देशबांधव " या नांवाखालीं केसरींत दोन लेखांक प्रसिद्ध झाल्यानंतर तिकडील लोकस्थिति संबंधानें अनेक ठिकाणाहून माहिती विचारण्यांत येऊं लागली ती पुढील प्रमाणें आहे.

दक्षिण कानडा हा जिल्हा मद्रास इलाख्यांत असून जिल्ह्याचें मुख्य ठिकाण मंगलोर हें आहे. या जिल्ह्यांतील कार्कल व पुत्तूर या दोन तालुक्यांत मुख्यतः चित्तपावनांची वस्ती आहे. कुंदपूर तालुक्यांतहि एकदोन घराणीं आहेत, परंतु मुख्य वस्ती कार्कल व पुत्तूर या तालुक्यांतच आहे.

या लोकांचा मुख्य व्यवसाय सुपारीच्या बागा, नारळ, तांदूळ वगैरेचा. विद्येवर उदर निर्वाह करणारे लोक फार कमी आहेत. सांपत्तिक व प्राकृतिक वातावरण हें त्याचें कारण असावें. आचार व्यवहारांत महाराष्ट्रीय चित्तपावनांसारखेच आहेत. क्वचित कांहीं किरकोळ बाबतींत फरक असेल. एरवीं उपवास व्रतें, सण वगैरे सारखेच आहेत. पोषाकांत

मात्र जरा फरक झाला आहे. पण घरांत धार्मिक व सांस्कृतिक फरक पडलेला नाहीं. महाराष्ट्रीय ओंविबद्ध ग्रंथांचें पारायण बायकाहि करितात. अर्थात् अशिक्षित बायकांना हा लाभ घेतां येत नाहीं. परंतु दुसऱ्यानें वाचलेलें मात्र त्यांना समजतें. स्थलपरत्वें विशेष असें कोणतेंहि आचार या लोकांत शिरलेलें नाहींत.

येथील समाजाची सांपत्तिक स्थिति साधारणच आहे. याच जिल्ह्यांत शिशिल गांवीं चित्तपावनांची शंभर घराणीं असून मुख्य व्यवसाय सुपारीचा आहे.

चित्तपावनांच्या मालकीचीं ३।४ देवालयें आहेत. शाळा नाहींत. परंतु अलीकडे शिक्षणाचें महत्त्व पटल्यानें तिकडे आस्थेवाईकपणें लक्ष जाऊं लागलें आहे. 'मलेरिया' हा येथील स्वयंभू रोग आहे. मुख्यतः घाटाच्या पायथ्याशीं चित्तपावनांची वस्ती असल्यानें त्यांना या रोगांचा त्रास होतो. परंतु लोकजागृति चांगली होऊं लागली असल्यानें मलेरियाप्रतिबंधक उपायहि सुरू करण्यांत आले आहेत व त्यामुळें मलेरिया हटविण्यांत त्यांना यश मिळेल असें वाटतें.

शिक्षण, आरोग्य व इतर सार्वजनिक कार्यासाठीं या जिल्ह्यांतील मुंढाजी येथील पद्मनाभभट्ट खाडिलकर यांनीं हजारों रुपये खर्च केले असून त्याचा उपयोग सर्व लोकांना सारखा होत असतो. त्यांच्याचप्रमाणें तेथीलच दुसरे गृहस्थ श्री. नारायणभट भिडे यांनीं सार्वजनिक कार्यासाठीं पंचवीस हजार रुपयांचा ट्रस्ट केला असून त्याचा आरोग्य व शिक्षण या कार्याकडे विनियोग करण्यांत येत असतो.


हें लोक या भागांत केव्हां गेले असावेत याची माहिती तेथील लोकांनाहि नाहीं. परंतु चित्तपावनांचे प्रथमचें श्री. गोपालकृष्णाचें एक मंदीर आहे तें सुमारें तीनशें वर्षांपूर्वीचे असल्याचे कागद उपलब्ध आहेत. त्यावरून तीनशें वर्षांपूर्वीं चित्तपावन लोक या जिल्ह्यांत गेले असावेत असें

म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. येथें वसाहत करण्यांत आली ती एका गटानें न होता स्वतंत्र गटागटांनीं झाली. कारण श्री. भिडे यासारख्या कांहीं घराण्यांची परंपरा शृंगेरीकडेहि आहे व तुळपुळे यांचें घराणें कुंदपुराहून आले अशी दंतकथा आहे.


हे लोक समुद्रमार्गानेंच या प्रांतांत गेलेले आहेत. एकंदर चित्तपावनांची परिस्थिति, आचार विचार, वगैरेमध्यें एकसूत्रीपणा असल्यानें व इतरहि कारणांनीं पूर्वसंकेत झाल्याप्रमाणें ते या ठिकाणीं जाऊन राहिले असावेत आणि आपल्या कर्तबगारीनें व उद्यमशीलतेनें तेथील डोंगर फोडून त्या जागीं त्यांनीं सुंदर बागायती जमिनी शेंकडों एकर निर्माण केल्या व त्या आज हजारों लोकांना त्या आश्रयस्थान झाल्या आहेत.

या भागांत पुढील चित्तपावन घराणीं आज नांदत आहेतः— लोंढे, वेलणकर, दाते, फडके, जोशी, गोगटे, तुळपुळे, सहस्त्रबुद्धे, भिडे, बर्वे, बेंडे ( गोत्र विष्णुवृद्ध हिरण्यकेशी ) फाटक, ठोसर, डोंगरे, दामले, अभ्यंकर, पाळंदे, खरे, मेहेंदळे, भोगले, छत्रे, पुराणीक, नातू, आगाशे, करमरकर, गोवंडे, रानडे, चितळे, केळकर, साठे, भावे, पाटणकर, देवधर गोडबोले, शेंड्ये, बोडस, मराठे, काकतकर, काळे, गोरे, पटवर्धन, खाडीलकर, चिपळूणकर, ताह्मनकर, परांजपे, आठवले, गोखले, म्हसकर इ.


इतकी मोठी चित्तपावनांची एकत्र वस्ती महाराष्ट्राबाहेर अन्यत्र कोठेंहि नाहीं व त्यांची महाराष्ट्रास आतांपर्यंत विशेष माहिती नव्हती, अर्थात् दळणवळण नव्हतें; त्या प्रांताची माहिती अलीकडे उपलब्ध होऊं लागली आहे, तेथें मराठीचा अभिमानी असाच समाज आहे.



मदुरेच्या मंदिरांतील शिल्पकाम.



पृथ्वीस्तंभ दिल्ली.



श्री रामेश्वर मंदिरांतील कलाकुशलयुक्त प्रवेश–मार्ग.

# ९ दक्षिण भारताचें ओझरतें दर्शन

## भारताचें अभंगत्व.

उत्तरेस हिमाचल व दक्षिणेस कन्याकुमारी; पश्चिमेस कराची आणि पूर्वेस आसाम प्रांत या मानमर्यादेंत भारतवर्ष समाविष्ट झाला आहे आणि भारताच्या या चतुःसीमा फार प्राचीन कालापासून सर्वमान्य झालेल्या आहेत. त्या इतक्या कीं, नित्य प्रातःस्मरण करतांना भारताचें हें अखंडत्व नि अभंगत्व वाचेनें उच्चारलें जातें. " गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वति नर्मदे सिंधु कावेरी " इत्यादि भारतवर्षांतील महनीय व प्रमुख नद-नद्या त्याप्रमाणें अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, द्वारावति इत्यादि प्रमुख नगरें; त्याचप्रमाणें बारा ज्योतिर्लिंगें यांचें नित्य स्मरण एका मालिकेंत ओवण्याचें कारण भारताचें अभंगत्व दर्शविण्यापलिकडे अन्य काय असणार!

आणि असा हा आसेतु हिमाचलापर्यंत भारत पसरलेला अनेक अपूर्व अशा गोष्टींनीं नटलेला आहे. भारतांत अनेकानेक गोष्टींचें वैपुल्य आहे. भारताला, इतरांना नाहीं असा अपूर्व इतिहास आहे. नैसर्गिक संपदेनें तो नटलेला आहे. त्याचप्रमाणें मनुष्यकृत अनेक अलंकारहि त्याच्या अंगावर चढविण्यांत आले आहेत.

## भारताचें मनोहर दर्शन

पूर्वकालीं आजच्यासारखीं दळणवळणाचीं साधनें सुगम नव्हतीं; असें असूनहि यात्रेचा-धर्माचा-हेतु पुढें करून त्या निमित्तानें मनुष्यानें एकदां तरी भारतदर्शन करावें, असाच हेतु भारतचरित्रगानाचा असावा आणि तें दर्शन झालें कीं, देहाचें परमसार्थक झालें असें मानण्याची मनुष्यप्रवृत्ति सहजच उत्पन्न झाली. हें भारताचें दर्शनहि आहेच तसें मनोहर. हिमगिरीचा भव्यपणा व त्यांतील निसर्गरमणीय शोभा हीं पाहिल्यावर मनुष्याचें मन

सुप्रसन्न होतें. त्याचबरोबर मनुष्याला आपल्या क्षुद्रतम व्यक्तित्वाचीहि जाणीव होते.

उत्तर भारतांत भारतीयांना वंद्य अशीं अनेक पुण्यक्षेत्रें, तीर्थें व पवित्रतर नद-नद्या आहेत. पंचगंगांनीं तो भूभाग सुजल व सुफल करून सोडला आहे. दिल्ली येथील हिंदु-मुसलमान राजांचें शिल्पोत्तेजन, आग्रा येथील कारागिरीचें परमोच्च धाम ताजमहाल, इत्यादि आल्हादकारक अनेक नयनानंदकारीं दृश्यें तेथें आहेत. उत्तरेकडून खालीं उतरत चाललों व विंध्यमेखला उल्लंघिली म्हणजे आपण मनुष्य कलाकृतीच्या अत्यंत उच्च अशा स्थानाप्रत येतों आणि तीं स्थानें म्हणजे अजिंठा व वेरुळ हीं होत. उत्तरेस ताजमहालाची नाजूक कलाकृति आहे. त्याचप्रमाणें दक्षिण भारतांत मनुष्य किती भव्य व विशाल कलाकृति निर्माण करतो याचे अनेक नमुने दृष्टीस पडतात परंतु वेरुळ व अजिंठा यांतील कलाकृतीला ज्ञात जगांत तोड असेल असें वटात नाहीं.

## दक्षिण-पथदर्शन

परंतु या ठिकाणीं मला त्यांची प्रशस्ति गावयाची नसून वाचकांना दक्षिण भारताचें दर्शन घडवावयाचें आहे. निसर्गाची अमूप कृपा उत्तर भारतावर झाली आहे. त्याचप्रमाणें दक्षिण भारतावरहि त्याचा पूर्ण वरदहस्त आहे. त्याच्या कृपेंतून सुटला एकटा एक महाराष्ट्र. नद-नद्यांनीं महाराष्ट्रांत जन्म घ्यावा, पण त्याचा तादृश लाभ महाराष्ट्राला न होतां दुसऱ्यांना व्हावा असाच हा योग आहे. कृष्णा, गोदावरी व तुंगभद्रा या नद्यांनीं मद्रास प्रांत सुसंपन्न करून सोडला; पण त्यांच्याने आपल्या माहेरचें ऋण मात्र फेडतां आलें नाहीं ! स्त्रियांचा ओढा माहेरपेक्षां सासरकडेच जास्त असतो, असेंच नव्हे कां ? असो.

दक्षिण भारतामध्यें म्हणजे जो भाग आज प्रायः मद्रास प्रांतांत मोडला जातो, त्यांत भारतीयांना वंदनीय, दर्शनीय व आदरणीय अशीं अनेक

स्थानें आहेत. या भागांत तीर्थक्षेत्रें इतकीं खेचून भरलेलीं आहेत कीं, इतर सर्व भारतांत जितकीं तीर्थक्षेत्रें असतील तितकीं एका मद्रास प्रांतांत आहेत, असें म्हणणें फारसें अतिशयोक्तींचें होणार नाहीं. पंच-कामाक्षी म्हणजे आसाममधील गौहत्तीजवळील कामाक्षी, व दक्षिणेंतील मदुरेची मीनाक्षी यांचें नातें प्राचीन काळापासूनच सुप्रसिद्धच आहे. बारा ज्योतिर्लिंगापैकीं 'श्रीरामेश्वरम्' याच भागांत आहे. आद्य श्रीशंकराचार्यांचा मुख्य मठ व जन्मभूमि याच भागांत; त्याचप्रमाणें वैष्णवपंथी रामानुजाचार्यांची भूमीहि याच प्रांतांत. आणि म्हणून अखिल भारतांतील यात्रेकरूंचा ओघ या भागाकडे एकसारखा वाहत असतो.

## सुसंपन्न दक्षिण भारत.

मद्रास प्रांतावर सृष्टिमातेचा वरदहस्त पूर्णपणें आहे. सृष्टीमातेनें त्यावर कृपा केली व त्याचेंच अनुकरण मनुष्यानेंहि करून, कलाकौशल्यपरिपूर्ण अनेक भव्य नि विशाल मंदिरें उभारून मानवी अलंकारानें हा भूप्रदेश सुशोभित केला. या प्रांतांतील अधिष्ठात्री देवता कावेरी ही होय. या प्रांतांत पांड्य, चोल व नंतर जे मराठे राजे झाले त्यांनीं या नदीस अनेक कालवे काढून भूभाग इतका जलपूरित करून सोडला आहे कीं, या प्रांतांत पाण्याचें दुर्भिक्ष कधींच नाहीं असें सांगतात. असा हा रम्य नयनमनोहर, भूप्रदेश आहे.

## महाराष्ट्र व मद्रास.

मद्रास प्रांतांत प्रवेश केल्याबरोबरच आपण दुर्भिक्षग्रस्त महाराष्ट्र सोडून एखाद्या संपन्न प्रांतांत प्रवेश करीत असल्याची जाणीव उत्पन्न होते. जिकडे तिकडे कालव्याचें पाणी खेळविलें असल्यानें पिकें प्रतिवर्षीं तीन तीन काढण्यांत येतात. त्यामुळें सर्वच प्रदेश सदैव हिरवागार असा असतो. या प्रांतांत मुख्य पीक भाताचें व त्याच्या खालोखाल भुईमुगाचें असलें तरी


ज्वारी, बाजरी व तूर हीं धान्येंहि थोडीं फार निघतातच. नारळी व केळी यांच्या बागा तर सर्वत्र पसरलेल्या. मनुष्य कितीही दुःखित असला तरी निसर्गाचें हें प्रफुल्ल सौंदर्य पाहतांच त्याचें भान हरपून गेल्याखेरीज राहत नाहीं.

महाराष्ट्रीयांना या प्रांताबद्दल एक विशेष प्रकारची आस्था वाटली पाहिजे. चेर, पांड्य, चोल व नायक राजांची सत्ता लुप्त झाल्यानंतर बऱ्याच मोठ्या भागावर मराठी सत्ता, इंग्रजी सत्ता स्थापित होईपर्यंत गाजत होती. आणि आजहि शहाजी व व्यंकोजी यांच्या वेळीं त्या प्रांतांत स्थायिक झालेलीं झालेलीं शेंकडों महाराष्ट्रीय घराणीं तिकडे नांदत आहेत. दैवदुर्विपाकामुळें तंजावरची मुख्य सत्ता कोसळली, त्याबरोबरच, त्या राज-घराण्यावर अवलंबून असलेलीं घराणींहि विपन्नावस्थेंत सांपडलीं यांत नवल नाहीं. अशीं घराणीं आजहि तंजावर, मदुरा, कुंभकोणम्, बंगलूर इत्यादि ठिकाणीं आहेत. परंतु दळणवळणाच्या अभावीं तीं तत्प्रांतियांत इतकीं एकरूप झालेलीं आहेत कीं, त्यांतील महाराष्ट्रीय सांगूनहि ओळखणें कठीण.


## श्रीरामेश्वर-दर्शन.

आम्ही मद्रासेहून एकदम श्रीरामेश्वरम् येथें गेलों. श्रीरामेश्वर हें सर्व-ख्यात क्षेत्र आहे. प्रत्यक्ष श्रीरामचंद्रांनीं त्याची स्थापना केली, अशी कथा रूढ आहे. ही 'अढळ नगरी' म्हणून सुप्रसिद्ध आहे. मद्रास प्रांतांत जीं अनेक प्राचीन मंदिरें आहेत त्यांत हें प्राचीनतम मंदिर म्हणून समजलें जातें. विशाल, भव्य व कलाकौशल्ययुक्त असें हें मंदिर असून मद्रास प्रांतांत जीं अनेकानेक भव्य मंदिरें नि त्यांच्या प्रवेशद्वारीं अस्मानाला टेक-णारीं गोपुरें बांधिलीं आहेत, तीं या श्रीरामेश्वर-मंदिराच्या नमुन्याप्रमाणेंच बांधिलीं गेलीं आहेत, हें ध्यानीं घेण्यासारखें आहे.

हें मंदिर जितकें प्राचीन तितकेंच भव्य व कलाकौशल्यानें ओतप्रोत भरलेलें आहे. या मंदिरासंबंधानें प्राच्यविद्यासंशोधक मि. फर्ग्यूसन म्हणतात,



श्री बृहदीश्वराचें मंदिर, तंजावर.



श्री मीनाक्षीचें मंदिर, मदुरा.

" द्रविडियन कलाकौशल्य पूर्णत्वाला गेल्याचा नमुना म्हणून मला एखादें मंदिर निवडण्यास सांगितलें तर मी श्रीरामेश्वरन् मंदिराचीच निवड करीन."

या मंदिराला एका आंत एक अशा तीन प्रदक्षिणा आहेत व त्याची लांबी पांच हजार फुटांपेक्षां निःसंशय जास्त येईल. पहिली प्रदक्षिणा ओलांडून आंत गेलें म्हणजे दुसरीहि तशीच भव्य व तशीच अगदीं आंतलि. बाहेरच्या प्रदक्षिणेची वाट जरा नादुरुस्त झाली असून ती पुनः बांधण्याचें काम सुरू आहे. आणि हें काम इतकें मोठें व खर्चाचें आहे कीं तें कधींकाळीं पूर्ण होईल तें होवो ! परंतु या प्रांतांतील 'चेट्टीयर' या संपन्न व्यापारी जातीनें तें अंगावर घेतलें असल्यानें, आज ना उद्यां तें पुरें होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

श्रीरामेश्वराचें मंदिर उत्तराभिमुखी आहे. या मंदिराच्या तटाला चार दिशेला प्रचंड गोपुरें आहेत; व अंतर्भागांत प्रदक्षिणेच्या वाटेवरील खांबापासून वरील छत व इतर भाग अनेक पौराणिक चित्रांनीं खोदून काढला आहे. चित्र खोदलें नाहीं असा या मंदिरांत भागच नाहीं. या मंदिरांत श्रीरामेश्वराच्या खालोखाल महत्त्वाचें मंदिर म्हणजे पार्वतीचें. येथें अनेक उत्सव होतात; त्यांत 'शिवपार्वतीविवाह' हा फार मोठ्या प्रमाणांत होतो.

## मंदिरावर सरकारी देखरेख

मद्रास प्रांतांतील मंदिरासंबंधानें दोन शब्द येथें सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. हिंदुस्थानांत, मंदिरांना अवाढव्य उत्पन्नें असणारा एकच प्रांत म्हणजे मद्रास प्रांत हा होय. प्रत्येक देवस्थान म्हणजे एक संस्थानच आहे. तेथील वहिवाटदार अगर पुजारी यांना कल्पनेबाहेर द्रव्य मिळूं लागल्यानें त्याचा स्वाभाविक जो परिणाम व्हावयाचा तो होऊन ते प्रमत्त झाले. तेव्हां सरकारनें देवस्थानचा कायदा करून सर्वच देवस्थानें आपल्या ताब्यांत घेतलीं. त्यांवर पंच नेमले. मंदिराचे खर्च बांधून दिले. यामुळें यात्रेकरूंची कुचंबणा होईनाशी झाली. देवस्थानें सुधारलीं. तेथें

स्वच्छता नांदूं लागली. मंदिरांच्या दुरुस्त्या होऊं लागल्या. सर्वच प्रांतांतील मंदिरांची अशी सुधारणा झाली.

श्रीरामेश्वरम् येथील पूजेचे मालक महाराष्ट्रीय ब्राह्मण आहेत. महाराष्ट्रीय ब्राह्मणाशिवाय इतरांना देवाची पूजा करण्याचा अधिकार नाहीं. त्यांच्यांत पाळ्या ठरल्या असून पाळीप्रमाणें पूजा करण्यांत येते. महाराष्ट्रीयांना हा हक्क फार प्राचीन काळापासून मिळाला आहे. परंतु येथील महाराष्ट्रीय मायदेशापासून दूरावले असल्यानें त्यांचे विवाहसंबंध तेथें जीं महाराष्ट्रीय घराणीं स्थायिक झालीं आहेत त्यांच्याशींच होतात व त्यांत कोंकणस्थ, कऱ्हाडे व देशस्थ असा भेदभाव मानला जात नाहीं.

## रामेश्वर बेट

श्रीरामेश्वर हें एक बेट आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं नावेंतून रामेश्वरीं जावें लागे. परंतु अलीकडे पुलांनीं हें बेट जोडलें गेलें आहे. हें बेट फार लहान आहे. वस्ती ५ हजारावर नाहीं व उपजीविकेचीं सर्व साधनें पर ठिकाणांवर अवलंबून आहेत. मुख्य रामेश्वर-मंदिराखेरीज गंधमादन पर्वत म्हणून एक टेकडी आहे. रामायणांत या टेकडीचा उल्लेख आहे. रामेश्वर मंदिराच्या मागेंच बंगालचा उपसागर आहे. तेथें यात्रेकरू स्नान करून मग श्रीरामेश्वराचें दर्शन घेतात.

## महोदधि व रत्नाकर

श्रीरामेश्वराहून धनुष्यकोटी हा सुमारें तीन तासांचा रस्ता आहे. या ठिकाणीं अरबी समुद्र व बंगालचा उपसागर यांचा संगम झाला आहे. अर्थात् महोदधि ( बंगालचा उपसागर ) व रत्नाकर ( अरबी समुद्र ) यांचें स्नान करण्यानें मिळत असलेलें पुण्य यात्रेकरू कां दवडील ! श्रीरामेश्वर व धनुष्यकोटी येथें तंजावर राजघराण्याचीं अन्नछत्रें आहेत. अहिल्याबाईचेंहि एक अन्नछत्र श्रीरामेश्वरीं आहे.

## त्रिवेंद्रम्

श्रीरामेश्वराहून आम्हीं सकाळच्या गाडीनें निघून मदुरेस गेलों व तेथून दुपारीं ५॥ च्या गाडीनें त्रिवेंद्रम् येथें जाण्यास निघालों. त्रिवेंद्रम् येथें सकाळीं सहाला पोहोंचलों. म्हणजे मदुरेपासून त्रिवेंद्रमला जाण्यास तेरा तास लागले. त्रिवेंद्रम् ही त्रावणकोर राज्याची राजधानी आहे. तेथें जाण्याचा रस्ता पश्चिम घाट म्हणून प्रसिद्ध असलेल्या सह्याद्रीच्या फाट्यांवरून गेला असल्यानें अनेक बोगदे काढावे लागले आहेत. हा सर्वच भूप्रदेश अत्यंत रमणीय आहे.

त्रिवेंद्रम् ही त्रावणकोरची राजधानी म्हणून जशी प्रसिद्ध आहे, तशीच श्रीअनंतशयनांचें-- श्रीपद्मनाभस्वामींचें मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. अनंतशयन म्हणजे शेषशायी भगवान्. ही देवता त्रावणकोरच्या राजघराण्याची कुलदेवता आहे त्यामुळें अर्थातच या मंदिराचें महत्त्वहि फार आहे.

## श्रीपद्मनाभस्वामी.

त्रावणकोर हें संस्थान हिंदुस्थानच्या दक्षिण सीमेचें टोंक असून पश्चिम घाटांच्या उच्च भिंतींनीं मद्रास प्रांतापासूनहि तें अलग झालेलें आहे. अरबी समुद्र याचें सदैव पादप्रक्षालन करीत असतो. प्राचीन कालापासून हें संपन्न राज्य म्हणून प्रसिद्ध आहे. या राज्यांत अनेक नद्या व कालवे असल्यानें हा प्रदेश केवळ नंदनवनाप्रमाणें वाटतो. त्रिवेंद्रम् येथील श्रीपद्मनाभस्वामींचें मंदिर प्रमुख आहे. मंदिराजवळ एक विशाल तळें आहे. या मंदिराचें बांधकाम द्रविडयुगी आहे. श्रीपद्मनाभस्वामी म्हणजे श्रीशेषशायी भगवानाची मूर्ति, ही फार विशाल असून एका प्रस्तर शेषावर श्रीभगवान विष्णु आराम करीत आहेत व लक्ष्मी पादसंवाहन करीत आहे. अशी ही भव्य मूर्ति आहे. ही निद्रिस्त मूर्ति सुमारें वीस फूट लांब तरी असावी. आम्ही गेलों तो वैकुंठ एकादशीचा दिवस असल्यानें शेंकडों ब्राह्मण श्रीविष्णुसहस्रनामाचीं आवर्तनें करीत बसले होते. मंदिर अत्यंत स्वच्छ ठेवण्यांत आलें आहे.

## दरबारचें उदार धोरण.


त्रावणकोर राज्यांत ख्रिस्ती वस्ती जास्त. त्यांचें आक्रमण फार होऊं लागलें व देशांत अस्पृश्यतानिवारणाची चळवळहि निघाली. त्याबरोबर त्रावणकोर दरबारनें आपल्या राज्यांतील सर्व मंदिरें हरिजनांना मोकळीं केलीं. त्याचा परिणाम फार अनुकूल होऊन त्यांचा विधर्माकडे जाण्याचा कल कमी होऊं लागला. इतकेंच नव्हे तर आज प्रत्यहीं कित्येक पूर्व हिंदु स्वधर्मांत आपखुषीनें येऊं लागले आहेत. ही दूरदृष्टि सर्वत्र राखण्यांत आली तर हरिजनांची एक मोठी तक्रार दूर केल्यासारखें होणार आहे.

त्रिवेंद्रम् हें राजधानीचें ठिकाण अत्यंत रमणीय आहे. स्टेशनजवळ तेथील आजचे प्रधान सर सी. पी. रामस्वामी यांच्या षष्ठ्यब्दपूर्तिनिमित्त जमविलेल्या निधींतून एक प्रशस्त व सुखसोयींनीं युक्त अशी धर्मशाळा बांधिली आहे. तिचा अनावरणसमारंभ ने. ना. श्रीनिवासशास्त्री यांच्या हस्तें झाला. या धर्मशाळेंत रोज दर खोलीस चार आणे ते एक रुपयापर्यंत लहानमोठ्या खोल्या भाड्यानें मिळतात. तेथें स्नानाची वगैरे उत्तम सोय आहे. तेथील व्यवस्थापकास आगाऊ कळविल्यास भोजनाचीहि व्यवस्था करतां येतें.

त्रिवेंद्रम हायकोर्ट, कॉलेज, राजवाडा, झू, रंगविलास वाडा, (आर्ट गॅलरी) अक्वेरियम् इत्यादि स्थळें प्रेक्षणीय आहेत. तेथील 'बीच' फार मोठा व सुंदर आहे. प्रवाशानें वरील धर्मशाळेंत स्नान वगैरे करून सकाळीं आठ वाजतां मोटार करावी. सर्व मद्रास प्रांतांतच जेवणाचे हाल कोठेंहि मुळींच होत नाहींत ! जिभेचे फार चोचले नसले म्हणजे झालें ! फराळ करावा व तेथून कन्याकुमारीला जाण्यस निघावें. कन्याकुमारीला दुपारीं १२ वाजतां जातां येतें.



श्रीरंगम् देवालयांतील विस्तीर्ण प्रवेश-मार्ग.



त्रिचनापल्ली—अत्युच्च टोकावरील श्रीगणेश—मंदिर.

## भारताची दक्षिण सीमा

त्रिवेंद्रम् ते कन्याकुमारी हा सर्व रस्ता टार रोड आहे व त्रिवेंद्रमपासून थेट कन्याकुमारीपर्यंत सुमारें ५०–५५ मैलांचा रस्ता असून त्याच्या दोहों-बाजूंनीं केळी–नारळींच्या बागा घनदाट लागल्या आहेत व बागा जशा घनदाट तशीच वस्तीहि अशी कीं, कोणतें गांव संपलें व दुसरें कोठें सुरू झालें हेंहि समजत नाहीं. जणूं आपण एखाद्या वृक्षाच्छादित राजपथा-वरूनच जात आहोंत असें वाटतें. थेट कन्याकुमारीपर्यंत ही स्थिति आहे.

कन्याकुमारी म्हणजे हिंदुस्थानच्या दक्षिणेचें टोंक. यापलीकडे हिंदुस्थानचा भूभाग नाहीं. या ठिकाणीं पश्चिमेचा अरबी समुद्र, पूर्वेचा बंगालचा उपसागर व दक्षिणेस पसरलेला हिंदी महासमुद्र असा त्रिसागरांचा संगम झाला आहे. कन्याकुमारीचें मंदिर दक्षिणाभिमुखी आहे. येथील शिल्पहि द्रविडियन पद्धतीचें आहे. मंदिर प्रांतांतील मंदिराच्या मानानें फार विशाल नसलें तरी महाराष्ट्रीय दृष्टीला तें भव्य वाटण्याजोगें मोठें आहे. त्रावणकोरच्या ताब्यांतील हें मांदिर असल्यानें येथेंहि हरिजनांस प्रवेश आहे.

प्रत्येक देवाचा कोठें तरी पुराणाशीं लागाबांधा जोडण्याचा आपला रिवाज आहे. त्याचप्रमाणें येथील देवीचाहि संबंध स्कंद–पुराणाशीं जोडला आहे. शिवपार्वतीच्या इतर कथांप्रमाणेंच हीहि कथा आहे. येथील शिवभक्त कुमारिकेला बाणासुरानें मागणी घातली, तींत बाणासुराचा वध कुमारीनें केला. तेव्हां देव प्रसन्न झाले आणि त्यांनीं तिची येथें स्थापना केली. मंदिरासमोरच समुद्रसंगमावर छोटा घाट आहे. तेथील पाणी इतकें स्वच्छ आहे कीं, चूळ भरण्याचा मोह सहज व्हावा. घाटासमोरच प्रचंड शिलाखंड आहे. त्यावर उभे राहून भारतवर्षाकडे पाहिल्यास अनेक भावना उचंबळूं लागतात. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं ब्राह्मणदांपत्यास जेवण घाला, अशी पंडयांची मागणी असते. या ठिकाणीं कुमारिका जेवणास घालून पुण्य जोडण्याची गळ घालण्यांत येते ! या ठिकाणीं अनेक धर्मशाळा व सरकारी रेस्ट हाउस असल्यानें यात्रेकरूंची उत्तम सोय होते.

स्नान, दर्शन, कॉफीपान वगैरे सर्व आटोपून एकदीड वाजतां निघून साडेतीन–चारला परत त्रिवेंद्रमला प्रवासी येऊं शकतो. वाटेंत 'नगर कॉईल' या नांवाचें संस्थानांत आरोग्याबद्दल प्रसिद्ध असलेलें गांव लागतें. परत आल्यावर नगर पाहून रात्रीच्या गाडीनें निघून सकाळीं दहा वाजतां मदुरेस परतलों.

त्रावणकोर राज्य संपन्न आहे. सागवान, हस्तिदंत, मिरी, काथ्या व नारळ यांचें मुख्य उत्पन्न आहे. त्रिवेंद्रम येथून आम्ही मदुरेस आलों. दक्षिण हिंदुस्थानांत श्रीरामेश्वराच्या खालोखाल किंबहुना बरोबरीनें मदुरेची मिनाक्षी प्रसिद्ध आहे.

## मदुरा–मिनाक्षी

मदुरेला 'उत्सवनगर' असेंच म्हणतात. पांड्यांची ही सुप्रसिद्ध राजधानी असून ग्रीक व रोमन साम्राज्यें वैभवगिरीवर असतांना त्यांच्याशीं येथून मोठा व्यापार चाले. खिस्ती शकापूर्वीपासून पांड्य राजे येथें राज्य करीत होते ते सतराव्या शतकापर्यंत. सतराव्या शतकांत विजयानगरच्या आधिपत्याखालीं तें राज्य गेलें. मदुरेचा इतिहास अविस्मरणीय व मोठा भाग्यकाल दर्शविणारा आहे. हें नगर विद्येचें केंद्र व कवि विद्वानांचें आश्रयस्थान म्हणून प्रसिद्ध होतें. येथें कांहीं काळ मराठ्यांचा सुभा होता. त्यांचे वंशज अद्यापि तेथें आहेत;

मदुरा येथील सुप्रसिद्ध मीनाक्षी–मंदिर हें नगराच्या मध्यभागीं आहे. हें सर्व मंदिर करड्या रंगाच्या संगमरवरांनीं बांधलें असून चौफेर प्रशस्त तटबंदी आहे व चारहि बाजूला चार भव्य दरवाजे असून त्यावर अत्यंत विशाल व प्रेक्षणीय अशीं उंचच उंच गोपुरें आहेत. हें सर्व मंदिर दगडांनीं बांधलेलें असून त्यांत नक्षीकाम केलें नाहीं अगर मूर्ति खोदल्या नाहींत अशीं तसूभरहि जागा सांपडणार नाहीं! पुराणांतरींच्या अनेक कथा व मीनाक्षीसंबंधीं प्रचलित लोककथा यांचा जणुं कांहीं चित्रमय

इतिहासच सर्व भिंतीवर खोदला आहे.

## हिंदु राजाची सत्ता

पुराणांतरीं प्रसिद्ध असलेल्या चेर, चोल व पांडय या राजघराण्यांनीं येथें राज्य केलें. सीलोनचा प्रथम राजा विजय हा येथील पांडय राजाचा जांमात होता. मेगॅस्थिनीसनें ( खि. पू. ३२० ) येथील राजांचें वर्णन केलें आहे व एका पांडय राजानें खिस्तपूर्व २७ मध्यें रोमचा राजा ऑगस्टस यांजकडे आपले वकीलहि पाठविले होते. दाक्षिणेंत मुसलमानांनीं स्वाऱ्या केल्या, त्यांत मलीक कफूर यानें मदुरा नगरी जिंकली व मुस्लिम संप्रदायाप्रमाणें येथील मीनाक्षीमंदिर पाडून नष्ट केलें. परंतु या नगरावर इस्लामी सत्ता फार काळ टिकली नाहीं. विजयानगरनें हें नगर जिंकून घेतलें व पुनः पांड्यराजांच्या स्वाधीन केलें.

## मंदिराचा पुनरुद्धार.

पुढें नायक राजे झाले व त्यांनीं हल्लींचें शहर पुनः बांधून मूळ योजनेंप्रमाणें मीनाक्षीमंदिरहि बांधलें. नंतर या बांधकामांत सतत १२० वर्षें सारखी भर पडत होती व त्या कामीं कोटयावधि रुपये खर्च झालेले आहेत. हें मंदिर द्रविडियन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून दाखविण्यांत येतो. देवाचे हिरे, मोतीं व सोन्याचें दागिने कित्येक कोटींचे आहेत. या ठिकाणीं दहा नायक राजांनीं राज्य केलें; तें सर्वच कलाकौशल्याचें व विद्येचे भोक्ते असल्यानें या नगरींचें वैभव एकसारखें वाढतच गेलें. यांतील तिरुमल नायक हा मोठा कीर्तिवान राजा होऊन यानें १६२३ पासून स. १६५९ पर्यंत राज्य केलें. यानें मीनाक्षीला लक्षावधि रुपयांचें उत्पन्न करून दिलें. प्रतिवर्षी देवीला सहा लक्ष रुपयांचें उत्पन्न आज आहे.

या शहराची लोकसंख्या आज सुमारें दोन लक्ष असून म्युनिसिपालिटीचें उत्पन्न पंधरा लक्षांचें आहे. या शहराला दक्षिणेकडील मँचेस्टर म्हणतात.

येथें कापडाच्या मोठमोठ्या गिरण्या असून येथील जरतारी माल फार प्रसिद्ध आहे.

## मीनाक्षी-मंदिर.

मीनाक्षी-मंदिराचा विस्तार फार मोठा आहे. मंदिराच्या आवारांत खुद्द मीनाक्षी-मंदिर, सुंदरेश्वर नांवाचें शंकराचें मंदिर व सुब्रह्मण्यम् अशीं तीन मंदिरें आहेत. यांतच एक सहस्रस्तंभी दिवाणखाना आहे. याची रचना अशी कुशलतापूर्वक केली आहे कीं, कोठूनहि पाहिलें तरी स्तंभांची ओळ एका रेषेंत दिसावी. सरकारी नियंत्रण असल्यानें मंदिरें स्वच्छ ठेविलीं जातात. येथील शिल्प अत्यंत प्रेक्षणीय आहे. या मंदिरांत अठरा पुराणांतील कथा कागदावर कुशलपणें विविध रंगांत चित्रून तें चित्रफलक मंदिराच्या भिंतीवर डकविले आहेत.

मीनाक्षी-मंदिराखेरीज नगरांत तिरुमल नायकाचा राजवाडा प्रेक्षणीय आहे. या वाड्यांत नेहमींप्रमाणें डिस्ट्रिक्ट जज्ज वगैरे सरकारी कचेऱ्या आहेत. येथील प्रशस्त स्तंभ व कारागिरी पाहून पूर्वकालीन वैभवाबद्दल मनांत आदर व अभिमान उत्पन्न झाल्याखेरीज राहत नाहीं.

## श्रीरंगम्

मदुरेहून रात्रीं अकरा वाजतां निघून पहाटें पांच वाजतां श्रीरंगम् स्टेशनवर उतरलों. श्रीरंगम् येथें मुंबईच्या व्यंकटेश्वर समाचारच्या मालकांची धर्मशाळा आहे. तेथें उतरून प्रातर्विधि करून कावेरीवर स्नानास गेलों. कावेरीला चांगला प्रशस्त घाट आहे. पात्रहि चांगलें रुंद आहे. तेथें स्नान करून श्रीरंगमच्या दर्शनास गेलों. श्रीरंगम् किंवा श्रीरंगनाथ हें भगवान विष्णूचें नांव आहे व त्याचें हें मंदिर आहे. वैकुंठ एकादशीचें इकडे मोठें माहात्म्य असतें. त्यानिमित्त येथें पंधरा-तीनवार उत्सव सुरू असतो. आम्हीं गेलों तेव्हां हा उत्सव सुरू होता. या उत्सवांत देवालयांतील अनेक देवदेवतांच्या

मूर्ती पालख्यांतून मिरवत श्रीरंगनाथाच्या भेटीस जातात. आम्ही गेलों तेव्हां ही गर्दी उसळली होती. तरीहि श्रीरंगम्‌चें दर्शन आम्हांस घडलें. ही मूर्ति शेषशायी भगवानाची आहे. तिकडील बांधणीप्रमाणें मंदिराभोंवतीं अनेक प्राकार आहेत. पहिल्या प्राकारांतून आंत शिरतांच श्रीगरुडाची एक भीमकायमूर्ति हात जोडून बैठक मारून बसलेली आढळली. या प्रांतांत मूर्ति काय व मंदिरें काय त्यांत लहानपणा कसा तो नाहींच. एकेक भव्य व अजस्त्र काम पाहून मनुष्य भांबावूनच जावा असलें प्रचंड काम ! या मंदिराचें बांधकाम खिस्तशकापूर्वीचें आहे असें सांगण्यांत येतें.

शिवाय दक्षिण हिंदुस्थानांत जे अनेक हिंदु राजे झाले त्यांनीं आपापल्या वेळीं येथील बांधकामांत भर घातली ती वेगळीच. या मंदिराच्या सभोंवतीं श्रीरंगम् गांव वसलें आहे.

## त्रिचनापल्ली.

त्रिचिनापल्लीपासून अवघ्या तीन मैलांवर श्रीरंगम् हें गांव आहे. मध्यें आहे फक्त कावेरी. पुण्यास जसें पुणेंनगर व शिवाजीनगर त्याप्रमाणें. येथें फक्त कावेरीचें पात्र अत्यंत विशाल असल्यानें दोन स्वतंत्र नगरें झालीं आहेत. आतां पुलांनीं तींहि दोन्ही नगरे जोडलीं गेलीं आहेत. श्रीरंगम् येथून टांग्यांतून त्रिचिनापल्ली येथें जाण्यास निघालों. वाटेंत एक मैलावर जंबुकेश्वरम् नांवाचें शंकराचें एक प्रेक्षणीय मंदिर आहे. शिल्पकलेंत हें मंदिर श्रीरंगापेक्षांहि सरस आहे. तटामागें तट असे तीन तट व आंत श्रीशंकराचें मंदिर. इकडील सर्वच मंदिरांची रचना किल्ल्याप्रमाणें असतें. आंत हजारपांचशें माणसें सहज छपून बसुन शत्रुसंहार निर्वेधपणें करूं शकतील इतकीं तीं विशाल असतात व ही कल्पना जंबुकेश्वर-मंदिर पाहतांच मनांत आल्याखेरीज रहात नाहीं.

## इतिहासख्यात नगर.

हें मंदिर पाहून झाल्यावर आम्ही त्रिचिनापल्लीच्या मार्गाला लागलों. हें

नगर इतिहासख्यात आहे. प्राचीन चोल राजांची ही नगरी होती. पुढें पुढें हातबदल होतां होतां अर्काटच्या नवाबांकडे हें नगर गेलें. मद्रास इलाख्यांत हें नगर तिसऱ्या क्रमाचें आहे. लोकसंख्या सुमारें दीड लक्ष आहे. श्रीरंगम् जंबुकेश्वर हीं पाहून कावेरी, नदी ओलांडून त्रिचिनापल्लींत प्रवेश करतांच आपणांस एक उंचच उंच शिखर दिसूं लागतें. कावेरीच्या उजव्या किनाऱ्यावर व त्रिचनापल्लीच्या डाव्या बाजूला लागून शाळूंकेप्रमाणें मध्येंच सुमारें तीनशें फूट उंचीचा एक सुळका आलेला आहे. त्यावर एक शंकराचें व अगदीं वर टोंकाला श्रीगजाननाचें अशीं दोन मंदिरें आहेत. हें शिवमंदिर पल्लव राजांनीं अकराव्या शतकांत बांधलें. शिखरास असलेल्या गजाजनाच्या मंदिराकडे जाण्यास सुमारें २–२॥ शें बांधलेल्या पायऱ्या चढून जावें लागतें. हें गणेशमंदिर अगदीं साधें असलें तरी इतक्या उच्च स्थानावर गेल्यानंतर वाऱ्याच्या शीतल लहरींनीं श्रमपरिहार होऊन एका बाजूला पसरलेलें त्रिचनापल्ली व दुसऱ्या बाजूचें श्रीरंगम् हीं नगरें पाहून मन प्रसन्न होतें.

## मराठ्यांची राजधानी तंजावर

त्रिचिनापल्लीहून निघून दुपारीं अडीच वाजतां तंजावर या मराठ्यांच्या दक्षिण हिंदुस्थानच्या राजधानीस गेलों. हें नगर त्रिचिनापल्लीपासून तीस मैल दूर आहे. सर्व मद्रास इलाख्यांत तंजावर प्रांत अत्यंत संपन्न, ' ग्रेनरी ऑफ दि ईस्ट ' म्हणून प्रसिद्ध. या जिल्ह्यांत तांदुळ अलोट पिकतो. व तो बहुतेक लंकेंत जातो. या नगरावर चोल राजांची सत्ता होती व तेराव्या शतकांत चोल राजा राजराजेश्वर यानें तेथें अत्यंत भव्य अशीं मंदिरें बांधिलीं. तेथील सुप्रसिद्ध बृहदीश्वर मंदिर त्यानेंच आपल्या देखरेखीखालीं बांधिलें व त्या सभोंवार प्रशस्त व भक्कम अशी तटबंदीहि त्यानेंच बांधिली.

या मंदिरापुढें प्रचंड नंदी आहे. त्याची लांबी सोळा फूट व उंची बारा फूट असून तो सर्व एका शिळेपासून तयार केलेलाआहे. मुख्य मंदिराच्या

चढुथऱ्यावर राजघराण्याचा साग्र इतिहास खोदला आहे. पुढें या ठिकाणीं मराठी सत्ता स्थापन झाल्यानंतर त्यांनींहि या मंदिराच्या वैभवांत अनेक प्रकारें भर घातली व मंदिराच्या डाव्या बाजूला एका शिलामंडपाच्या भिंती-वर मराठी राजांनीं आपला साद्यंत इतिहास कोरून ठेवला आहे. इति-हासाचार्य राजवाडे यांनीं अत्यंत प्रयत्नानें त्याचे ठसे घेऊन तो साद्यंत लेख प्रसिद्धहि केलेला आहे.

## इत साहजी है, उत साहजहाँ

मराठ्यांनीं या नगरांत राहून समुद्रतीरापर्यंत प्रदेश आपल्या सत्तेखालीं आणला व त्यांचें वैभव एका काळीं इतकें वाढलें कीं, राधामाधव विलास-चंपूकारांनीं ' इत साहजी है, उत साहजहाँ, ' असें त्यांचें वर्णन केलें आहे. उत्तरेस शहाजहान बादशहा तर दक्षिणेस शहाजी महाराज असें गौरवपर उद्गार जयराम कवीनें काढले; परंतु एवढें वैभव भोगणारा राजवंश आज कोठें आहे? तंजावरचा राजवाडा जसा भग्नावशेष होऊन आपल्या दुर्दैवी दैवाच्या लीला पाहत नित्य झिरपत आहे; त्याचप्रमाणें तंजावरचा राजवंश निस्तेज, निष्प्रभ व निर्बल होत्साता ब्रिटिशांनीं दिलेल्या अन्नावर आज जगत आहे ! कालमहिमा म्हणतात तो हा ! !

## कलेचे भोक्ते मराठी राजे

येथील सर्वच मराठी राजे जरी शूर नसले तरी विद्येचे व कलेचे भोक्ते मात्र होते. त्यांनीं केलेला सरस्वतीमहालांतील ग्रंथसंग्रह फार अपूर्व असून त्यांत सुमारें वीस हजार हस्तलिखित ग्रंथ आहेत ! या राजांच्या प्राचीन दरबार हॉलमध्यें तेथें होऊन गेलेल्या राजपुरुषांचीं तैलचित्रें अद्याप जतन करून ठेविलीं आहेत. याप्रमाणें बृहदीश्वर-मंदिरांतील म्यूझियममध्येंहि तेथील मराठा राजपुरुषांचीं चित्रें रंगविलेलीं आढळतात !

## मंदिर–नगर

तंजावर येथून सायंकाळीं पांच वाजतां निघून सायंकाळीं सात वाजतां आम्ही कुंभकोणम् या शहरीं गेलों. या शहराचें नांवच मुळीं 'मंदिरनगर' म्हणून प्रसिद्ध आहे. हें शहरहि कावेरी किनाऱ्यावरच वसलें आहे. या नगरांत चोवीस प्रसिद्ध मंदिरें आहेत. तेथें श्रीशंकराचार्यांचा मठहि आहे. या मंदिरांत मुख्य मंदिर श्रीरामस्वामींचें आहे. रामस्वामी म्हणजे श्रीरामचंद्र कोदंडाधरी राम. रात्रींच्या वेळीं रस्त्यांतून मंदिराकडे दृष्टिनिक्षेप केला असतां आंत हजारों काजवे चमकावे असा देखावा दिसतो. इतका मंदिराचा अंतर्भाग लांब आहे व जसजसें अंतर्भागांत जावें तों तों मंदिराची विस्तृतता नजरेस पडूं लागते. या नगरांत माघीचा मोठा उत्सव असतो व तो फार प्रेक्षणीय असतो, असें सांगतात. परंतु उत्सवच कशाला, नित्यच तेथें इतके दीप लागतात कीं, आपणांस तो दीपोत्सवच वाटावा! येथील श्री विश्वनाथाचें मंदिरहि प्रेक्षणीय आहे. येथील मंदिरें पाहून आम्ही रात्रीं दहा वाजतां मद्रासेस जाण्यास निघालों.

सर्व मद्रास प्रांतांत इतकीं तीर्थ–क्षेत्रें–मंदिरें आहेत व तींहि अशी कीं, नास्तिकांचें मनहि आकर्षण करून घेतील! कलाकौशल्ययुक्त व देवस्थानेंहि अत्यंत संपन्न, सदैव कोणत्या ना कोणत्या तरी निमित्तानें उत्सव सुरू व मुलुख सामान्यतः संपन्न अशी स्थिति असल्यानें मद्रास प्रांत स्वाभाविकच धर्मशील असावा यांत आश्चर्य नाहीं व तसा तो आहेहि. सरकारनेंहि देवस्थानांवर नियंत्रण घातल्यानें त्यांची एकंदर स्थिति निर्विवादपणें सुधारली आहे.

येथील मंदिरें भव्य, विशाल, सुंदर व आमूलाग्र अनेक प्रकारच्या नक्षी–कामांनें युक्त असल्यानें अत्यंत प्रेक्षणीय आहेत. भव्यतेंत व सौंदर्यांत या मंदिराची तुलनाच होणें शक्य नाहीं. व मुलूखहि संपन्न व नयनमनोहर असल्यानें शक्य असेल त्यांनीं भारताच्या या दक्षिण भूभागाचें दर्शन घ्यावें या हेतूनें हें ओझरतें दर्शन घडविलें आहे.

---

# १० कराची येथील मराठी वसाहत

मराठी साम्राज्याच्या ऐन उत्कर्षाच्या काळांत महाराष्ट्रीय वीरांनीं आसेतुहिमाचल आपला यशोदुदुंभि गाजविला व अखिल भारतवर्षभर राजकाज निमित्तानें ठिकठिकाणीं महाराष्ट्रीय वसाहतींहि निर्माण केल्या. परंतु वसाहती संस्थापनेनंतर त्यांच्या पाठीमागें राजसत्तेचा आधार लागत असतो तो नाहींसा झाल्याबरोबर ठिकठिकाणीं पसरलेल्या महाराष्ट्रीय वसाहती महाराष्ट्रास आज जवळ जवळ पारख्या झाल्या आहेत. उत्तर हिंदुस्थानांत आज जेथें मराठी संस्थानें आहेत त्या ठिकाणीं महाराष्ट्रीय अद्याप दृग्गोचर होतात परंतु जेथील मराठी संस्थानें बुडाली त्या प्रांतांतील महाराष्ट्रीय तत्प्रांतीयांशीं एकरूप होऊन गेल्याची उदाहरणें बुंदेलखंड व तंजावर या प्रांतांतील देता येण्यासारखी आहेत.

कोणत्याहि प्रकारच्या शासनसंस्थेच्या पाठिंब्याच्या अभावीं वसाहत करणे कठीण व त्यांत अशा वसाहती करण्याची प्रवृत्ति महाराष्ट्रीयांत मूळचीच कमी. हिंदुस्थानांत गुजराथी व मारवाडी समाज मात्र असे आहेत कीं ते सत्त्व न सोडतां स्वावलंबनावर कोठेंहि वस्ती करूं शकतात.

मराठीसाम्राज्य हिंदुस्थानभर पसरवितांना मराठी घोडेस्वारांनीं सर्व हिंदुस्थान पददलित केला. परंतु राजपुतान्यापुढें पसरलेल्या रुक्ष निर्जल व निर्मनुष्य अशा कच्छच्या रणामुळें मराठ्यांची दृष्टी सिंधप्रांताकडे वळली नाहीं ! आठव्या शतकांत सिंधमधील हिंदु सत्तेचा पाडाव होऊन जी इस्लामी सत्ता तेथें स्थापन झाली ती ब्रिटिशांची दृष्टी ह्या टापूकडे वळेपर्यंत कायम होती.

हिंदुस्थानांतील सर्वांत प्रबल अशी मराठ्यांची सत्ता नष्ट झाल्यानंतर इतर बारीकसारीक राजेरजवाडयांकडे इंग्रजांची दृष्टी वळून त्यांस त्यांनीं राजसंन्यास देण्याचा सपाटा सुरू केला व तीच पाळी सिंधच्या अमिरांवर येऊन त्यांचा पाडाव करण्यासाठीं इंग्रजांनीं तेथें मराठी पलटणी नेल्या व

अशा रीतीनें सुमारें ९० वर्षांपूर्वी मराठ्यांचे पाय प्रथम कराचीला लागले आणि इंग्रजांच्या राजवटींत महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रीयांची अशी मोठ्या प्रमाणावर तेथें वसाहत झाली.

याखेरीज महाराष्ट्राचा कराचीशीं दुसऱ्या एका प्रकारानें संबंध जोडला गेला. इ. स. १८५७ मध्यें उत्तर हिंदुस्थानांत स्वातंत्र्य संपादना प्रीत्यर्थ जो मोठा यत्न झाला त्याची झळ दक्षिणेंत कोल्हापूर संस्थानला लागून त्यावेळच्या कोल्हापुरच्या महाराजांचे बंधु चिमाजी आप्पा महाराज यांचा बंडाशीं संबंध आहे असा संशय इंग्रजसरकारास येऊन त्यांनीं चिमामहाराजांची उचलबांगडी करून त्यांस कराची बंदरांत आणून ठेवलें, ते आमरान्त तेथेंच होते. त्याजबरोबर साहजिकपणें कांहीं मराठी कुटुंबें तिकडे गेलीं. चिममाहाराजांची समाधी कराचीस असून तिच्या प्रीत्यर्थ दरसाल सुमारें ५०० रुपये कोल्हापुर दरबार खर्च करीत असते असें समजतें.

सिंध प्रांत इंग्रजांच्या हातीं आल्यावर कराची बंदराच्या वाढीकडे त्यांनीं लक्ष दिलें. हिंदुस्थानांत आज मुंबई बंदराखालोखाल कराची बंदराला महत्त्व आहे व कालांतरानें कराची बंदर मुंबई बंदराचा अव्वल दर्जा हिसकावून घेईल अशीं चिन्हें दिसत आहेत. आज कराचीला बिनतारी तारेचें स्टेशन व विमानतळ हीं असून आगें मागें युरोप व आशिया यांच्या दळणावळणाचें हें केंद्र होणार ही गोष्ट निर्विवाद आहे.

कराचीची वाढ होऊं लागताच महाराष्ट्रीय लोक नोकरपेशानें तेथें जाऊं येऊं लागले व आजहि तेथें ३०।३५ वर्षें नोकरी करीत असलेले महाराष्ट्रीय आहेत. कराची शहराची वाढ होत असतांना तेथें वसाहत करणारांना सरकारनें मोफत जागा व दुसऱ्याहि सवलती देऊं केल्या परंतु महाराष्ट्रीय मनुष्य देशांतरीं कोठेंहि मुलुखगिरीवर गेला तरी त्याचें सर्व लक्ष आपल्या जन्मभूमीकडे असतें. यामुळें महाराष्ट्रीयांची वस्ती कराचीस पुष्कळ असतांहि त्यांना स्वतःच्या मालकीचें घर नाहीं. अर्थातच ज्या शहराची वाढ व

जोपासना त्यांनीं; केली त्या शहरांत त्यांना केवळ भाडोत्री म्हणून राहावें लागत आहे.

कराचीची प्रथम पाहणी महाराष्ट्रीयांनींच केली व त्यावेळचे कराची म्युनिसिपालिटीचें दप्तर मोडींत असल्याचेंहि सांगण्यांत येतें. शिक्षण खात्यांत सर्वच महाराष्ट्रीय असत व सर्वांत जुने महाराष्ट्रीय एज्युकेशनल इन्स्पेक्टर श्री. नारायण जगन्नाथ हे तेथें अतिशय लोकप्रिय होऊन गेले व त्यांच्या नांवाचे ' नारायण जगन्नाथ हायस्कूल ' आज तेथें सुविख्यात आहे.

कराची येथें महाराष्ट्रीय वस्ती १५-२० हजार असावी. त्यांत रत्नागिरी, सावंतवाडी व सातारा या टापूंतील लोक आहेत. मराठा समाजांत जागृति बरीच असून ' सिंध–मराठा ' नांवाचे वृत्तपत्र तेथें निघत असतें. त्याचे संपादक श्री. सावंत यांच्या खटपटीनें 'मराठा एज्युकेशन सोसायटी' स्थापन झाली असून नगर म्युनिसिपालिटीनें संस्थेस मोफत जागाहि दिली आहे. तेथें संस्थेची सुंदर व प्रशस्त इमारतहि अलीकडे झाली आहे. याखेरीज मराठी मोफत वाचनालय व ग्रंथसंग्रहहि आहे.

तेथें मुलांच्या मराठी शाळा सहा व मुलींच्या तीन आहेत. या एकाच गोष्टींवरून तेथील मराठी वस्तीची कल्पना येईल. परंतु एवढी मोठी वस्ती असूनहि कोणाच्या मालकीचें घर नाहीं. मागें मिळालेल्या सवलतीचा फायदा न घेतल्या कारणानें जेथें वस्तुतः मराठी वस्ती दिसावयाची तेथें पारशी व बोहरी यांच्या प्रशस्त नि भव्य इमारती दृष्टीस पडत आहेत. या गोष्टीची जाणीव होऊन तेथील ब्राह्मण सभेनें स्वतःची इमारत बांधण्याचा उपक्रम केला आहे.

कराची शहर अगदीं नव्यानेंच वसत असल्यानें त्याची रचना उत्तम प्रकारें करण्यांत आली आहे. रस्ते एकसारखे सरळ व प्रशस्त आहेत. मुंबईच्या सर्व सुखसोयी तेथें असून मुंबईपेक्षां विशेष म्हणजे वस्तींतील मोकळेपणा हा होय. शहरांतील प्रमुख रस्ता बंदर रोड. याची लांबी सुमारें

सहा मैल असून दोहों बाजूस भव्य दुकानें लागून राहिली आहेत. याच रस्त्यावर दक्षिणाभिमुखी ‘ गुलामहुसेन खालिकादिना हॉल व लायब्ररी ’ आहे. शहरांत सार्वजनिक अशी मोठी इमारत हीच असून व्याख्यानें वगैरेसाठीं फार सोयीची आहे. याच इमारतींत रस्त्याकडे तोंड केलेला लोकमान्यांचा संगमरवरी अर्ध पुतळा बसविण्यांत आला आहे.

महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्रीयांच्या ज्या वसाहती आहेत त्यांत कराची ही पश्चिम टोकाची वसाहत जरी नवी असली तरी महत्त्वाची व आपलेपणाची जाणीव पदोपदीं देणारी आहे. कराचीचें पुढील वाढतें महत्त्व लक्षांत घेऊन महाराष्ट्रीयांनीं या वसाहतीकडे उपेक्षेनें न पाहतां भावी महत्त्वाचा फायदा घेण्याकडे दृष्टी ठेवावी.

REFBK-0006604
REFBK-0006604

# प्रवास वर्णनें.

चित्रशाळेनें प्रसिद्ध केलेलीं प्रवासवर्णनें वाचून आपल्या ज्ञानांत भर टाका व आपली प्रवासाची लालसा वाढवा.

| | किंमत | ट. खर्च |
|---|---|---|
| माझा प्रवास | १–४–० | ०–२–० |
| आफ्रिकेचा प्रवास | ०–८–० | ०–१–६ |
| म. गांधींची विलायत यात्रा | ०–८–० | ०–१–६ |
| माझ्या हिमालयांतील यात्रा | १–०–० | ०–२–० |
| बद्रिकेदार–यात्रा–वर्णन | ०–१०–० | ०–२–० |
| रामेश्वर–यात्रा–वर्णन | ०–५–० | ०–१–० |
| आमची म्हैसूरची सफर | ०–५–० | ०–१–० |
| माझा काश्मीरचा प्रवास | ०–८–० | ०–१–३ |
| कलकत्ता–वर्णन | ०–२–० | ०–१–० |
| रायगड किल्ल्याचें वर्णन | ०–६–० | ०–१–६ |
| काश्मीरची तोंडओळख | ०–४–० | ०–१–० |
| तुम्हांला हिमालयांत जायचें आहे काय ? | १–८–० | ०–२–३ |

मॅनेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें २.